
UNIVERSAL LIBRARY
OU_196149
UNIVERSAL LIBRARY



कै. रा. ब. बापूरावदादा किनखेडे, नागपुर.

बालोद्यान प्रेस, पुणें.

नागपूर विश्वविद्यालय.

रावबहादूर बापूराव दादा किनखेडे व्याख्यानमाला.

पुष्पगुच्छ

इसवी सन १९३८

# "वैदिकधर्म आणि षड्दर्शनें

अथवा

# चार विद्या व सहा शास्त्रें."

( या विषयावर )

व्याख्याते:—आहिताग्नि शंकर रामचंद्र राजवाडे, बी. ए.

यांचीं व्याख्यानें.

प्रकाशकः
नागपूर विश्वविद्यालय

मुद्रकः
शं. ब. सहस्रबुद्धे, बी. ए.,
६८९ सदाशिव पेठ, बालोद्यान प्रेस,
पुणें नं. २



आहिताग्नि शंकर रामचंद्र राजवाडे, पुणें.

बालोद्यान प्रेस, पुणें.

॥ श्री ॥

# व्याख्यान १ लें

**नमो ब्रह्मणे नमोऽस्त्वग्नये नमः पृथिव्यै नम ओषधीभ्यः।**
**नमो वाचे नमो वाचस्पतये नमो विष्णवे महते करोमि ॥**

**ॐ शांतिः शांतिः शांतिः**

उपस्थित श्रोतृवृंद, बंधुभगिनी,

आज या ठिकाणीं व्याख्यानाचा जो सुयोग आलेला आहे त्या दिवसाचें आपल्या हिंदुधर्मांत फार महत्त्व आहे. तो पुण्य दिवस समजला जातो. आज वैकुंठचतुर्दशीचा दिवस आहे. आपल्या हिंदु पुराणांमध्यें श्रीभगवान् विष्णु हे चार महिने शेषशायीवर शयन करतात आणि नंतर जागृत होऊन आज ते वैकुंठाला जातात अशी कल्पना आहे. तोच आजचा हा वैकुंठचतुर्दशीचा दिवस होय. ही जी विष्णूची जागृति त्या पुण्य दिवशीं व्याख्यानाचा योग ज्या निमित्तानें आला आहे तेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. ज्या महाभागाच्या नांवानें या विश्वविद्यालयांत हें पारितोषिक दिलें जातें त्यांचा आज जन्मदिन आहे. सत्पुरुषाच्या जन्मदिनाला आपल्या धर्मांत मोठें महत्त्व दिलें जातें. म्हणून याच दिवशीं मुद्दाम त्यांच्या स्मरणार्थ ही व्याख्यानमाला या विश्वविद्यालयांत सुरू करण्यांत आली आहे. वैकुंठचतुर्दशी हा श्रीविष्णूच्या जागृतीचा दिवस म्हटला म्हणजे हें प्रतीकहि लक्षांत घेण्यासारखें आहे. विष्णु हा वैदिक देव आहे. वेदांत हा कोणत्या स्वरूपाचा देव आहे तें पाहण्यासारखें आहे. विष्णु हा वेदांतील सूर्यदेव होय. सूर्याचें प्रतीकच विष्णु आहे. पुनः याला महान् विष्णु म्हटला आहे. आरंभीं आपण जो मंत्र म्हटला

तो आश्वलायनसूत्रांतील आहे. त्यांत या महान् विष्णूला नमस्कारपूर्वक नमन केलें आहे. हा मंत्र लक्षांत घेण्यासारखा आहे.

**नमो ब्रह्मणे नमोऽस्त्वग्नये नमः पृथिव्यै नम ओषधीभ्यः।**
**नमो वाचे नमो वाचस्पतये नमो विष्णवे महते करोमि ॥**

या मंत्राचा दुसरा पाठ ‘ बृहते करोमि ’ असा आहे. हा संपूर्ण मंत्र विश्वाच्या उत्क्रांतीला धरून व त्याचा अध्यात्माशीं संबंध जोडून बनलेला आहे. मूळ जें ब्रह्म तें अव्यक्त आहे. त्याला प्रथम नमस्कार केला आहे. अव्यक्त ब्रह्माचें जगांतील पाहिलें व्यक्त रूप म्हणजे अग्नि. त्या अग्नीला येथें नमस्कार केला आहे. हा अग्नि म्हणजे आपण नित्य पाहतों तो लौकिक अग्नि नव्हे. अग्नि हा शब्द गति या अर्थानें येथें आला आहे. मूळ अव्यक्त ब्रह्माला जी पाहिली गतिवाचकता आली तें पहिलें जगद्रूप; त्यालाच अग्नि हें नांव येथें दिलें आहे. म्हणून ब्रह्मानंतर त्याला नमन केलें आहे. जगतांत आपण मानव; मानवांचा जन्म पृथ्वीवर झाला म्हणून त्या पृथ्वीमातेला नमस्कार केला आहे. मानवाचें अन्न ओषधि वनस्पतींत आहे म्हणून ओषधींना नमस्कार केला. मानवाचा मोठेपणा वाचेमध्यें आहे म्हणून त्या वाक्देवतेला व त्या वाचेचा अधिष्ठाता जो वाचस्पति त्यालाहि येथें नमस्कार केला आहे. शेवटीं या मंत्रांत महान् विष्णूला नमस्कार केला आहे. मूळ अव्यक्त ब्रह्माचा अर्थ निराळा. येथें विष्णु हा शब्द त्याच्या व्यापन-कर्माला धरून आलेला आहे. हें विष्णुरूप वेदांत सूर्य या अर्थानें आलेलें आहे. हें सूर्याचें व्यापनकर्म वेदांत ‘ आ प्रा द्यावा पृथिवी अंतरिक्षं सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ’ या मंत्रांत दाखविलें आहे. हा सूर्य तिन्ही लोकांना म्हणजे पृथ्वी, द्यु व अंतरिक्ष यांना व्यापून राहतो. तो संपूर्ण जगतांतील स्थावर व जंगम पदार्थांचा धारणकर्ता आहे. सूर्य या तीन लोकांना तीन पादांनीं व्यापतो. उदयाचे वेळीं त्याचें पहिलें पाऊल, मध्यान्हीचे वेळीं त्याचें दुसरें पाऊल व

अस्तमानाचे वेळीं त्याचें तिसरें पाऊल असें त्याचें वर्णन आहे. या तीन पादांनीं तो तीन लोकांना व्यापतो म्हणून तो विष्णु म्हटला आहे.

अशा विष्णूचा आज जागृतीचा दिवस. आपलें राष्ट्रहि आतां जागृत होत आहे. ही जागृति नाना तऱ्हेनें हल्लीं पाहिली पाहिजे. युरोपांत ' रेनान्सस 'चा काळ म्हणजे युरोपच्या जागृतीचा काळ. पूर्व-पश्चिमेच्या संयोगांत हा रेनासन्स होतो. प्राचीन काळीं क्रूसेडच्या लढायामुळें पूर्वेचा आणि पश्चिमेचा संयोग होऊन युरोपांत हा काळ आला. हल्लीं पूर्वपश्चिमेच्या संयोगांत हा काळ हिंदुस्थानांत आला आहे. म्हणून हल्लीं जुन्या विद्या पण त्या नवीन दृष्टीनें पाहण्याचा काळ आलेला आहे. अशी नवीन दृष्टि येणें हाच ज्ञानाचा खरा मार्ग आहे. आपली ही व्याख्यानमाला विष्णूशीं म्हणजे वेदांतील सूर्याशीं संबद्ध आहे. वेदांचा आणि सूर्याचा संबंध वेदांत निरनिराळ्या रीतींनें दाखविला आहे. सूर्याचा तीन वेदांशीं, जगताशीं व मानवसमाजाला धरून मनुष्याशीं संबंध कसा आहे तो वेदांत दाखविला आहे.

प्रथम वेदांचा ( तिन्ही ) आणि सूर्याचा संबंध ' ऋग्भिः पूर्वाह्णे दिवि देव ईयते । यजुर्वेदे तिष्ठति मध्ये अह्नः । सामवेदेनास्तमये महीयते । वेदैरशून्यस्त्रिभिरेतिसूर्यः । ' या ऋचेंत दाखविला आहे. सूर्य हा पूर्वाह्णाच्या वेळीं ऋग्वेदाबरोबर चालतो. माध्याह्नाच्या वेळीं तो यजुर्वेदाबरोबर असतो. सामवेदाबरोबर तो अस्तमानाच्या वेळीं महीयत्वाला जातो. असा तो तिन्ही वेदांबरोबर नित्य असतो. असा हा जो सूर्य तो अंतरिक्षाला व्यापून शिवाय तिन्ही वेदांबरोबर चालणारा आहे. सूर्य हा शब्द सूः व यः या दोन शब्दांपासून बनला आहे. सूः = प्रसवणें व यः = गमन करणें. तो प्रसवणारा व गमन करणारा आहे. जो प्रसवतो आणि गमन करतो तो सूर्य. अव्यक्त परमेश्वरानें हें जगत् प्रसवलें. जगत् हा शब्द गम् धातूपासून झालेला आहे. जगत् म्हणजे गतिमान् वस्तु. अव्यक्त ब्रह्माचें व्यक्तरूप म्हणजे सूर्य. अशी ही आध्यात्मिक

कल्पना सूर्याशीं, विश्वाशीं व तीन वेदांशीं जोडून या ठिकाणीं दाखविली आहे.

पुढें भौतिक नियमांचा तीन वेदांशीं संबंध जोडून दाखविला आहे. Physical law किंवा Law of motion ज्याला आपण म्हणतों त्यांत जीं तीन तत्त्वें तीं 'ऋग्भ्यो जाताॅ सर्वशो मूर्तिमाहुः। सर्वागतिर्याजुषी हैव शश्वत्। सर्वं तेजः सामरूप्यॅ ह शश्वत्। सर्वॅहेदं ब्रह्मणा हैव सृष्टम्' या ऋचेंत दाखविलीं आहेत. सर्व मूर्ति ऋग्वेदापासून निर्माण झाल्या; सर्व शश्वत् गति यजुर्वेदापासून निर्माण झाली; सर्व शश्वत् तेज सामवेदापासून निर्माण झालें आणि हें सर्व ज्या ब्रह्मानें हें जगत् निर्माण केलें त्यापासूनच झालें. ज्यापासून हें जगत् त्यापासूनच हे वेद निर्माण झाले. हीं जीं तीन तत्त्वें — मूर्ति, गति व तेज — येथें सांगितलीं आहेत त्यांचा उलगडा अर्वाचीन भौतिक शास्त्राप्रमाणें करतां येतो. ऋग्वेदापासून मूर्ति, यजुर्वेदापासून शश्वत् गति, सामवेदापासून शश्वत् तेज यांचा उलगडा आपणांस थोडक्यांत करतां येण्यासारखा आहे. आपलें हें जगत् सर्व मूर्तिमान् आहे. तें नाना मूर्तींनीं बनलेलें आहे. तें व्यक्त भावांत आलेलें आहे. तें साकार आहे. त्या जगतापलीकडील जें, तें अव्यक्त, अमूर्त व निराकार आहे. मूर्ति म्हणजे साकार पदार्थ. मग तो पदार्थ 'अणोरणीयान् महतो महीयान्' केवढाहि असो, ते सर्व साकार पदार्थ म्हणजे मूर्ति म्हटल्या आहेत. या सर्व मूर्ति ऋग्वेदापासून निर्माण झाल्या. ऋग्वेदाचा संबंध मूर्तीशीं जोडून दिला. पण येवढ्यानें जगताचें कार्य झालें नाहीं. नुसत्या बैठ्या मूर्ति उपयोगाच्या नाहींत. मूर्तीला मूर्तित्व, जातित्व जें येतें तें तिच्या हालचालींत येतें. आपण सर्व येथें मानवमूर्ति बसलों आहोंत. यांत दहापांच दगडाच्या मानव-आकाराच्या हुबेहूब मूर्ति आणून ठेवल्या, तर बाहेरून येणारास एकदम सर्व मानवच वाटतील. पण कांहीं वेळानें व्याख्यान संपल्यावर माणसें तीं माणसें व दगड ते दगड हें त्याच्या प्रत्ययास येईल. व्याख्यान संपल्यावर आपणा मानवांत गति दिसेल. आपण हालूं, बोलूं, चालूं लागूं

पण जे दगड ते तसेच बैठे राहतील. बाहेरचा जो आकार तो आंतल्या गतीनें युक्त पाहिजे. गतीवांचून मूर्तीला मूर्तित्व, जातित्व, नांव वगैरे कांहीं देतां येणार नाहीं. म्हणून पुढें लगेच मूर्तीला गति देण्याकरितां दुसरा वेद निर्माण झाला. म्हणून ' सर्वा गतिर्याजुषी हैव शश्वत्.' जगतांतील अमुक मूर्ति आपण झाड, दगड, पशु, मानव वगैरे म्हणतों तें त्यांतील गतीच्या योगानें होय. पण येवढ्यानेंहि जगताचें कार्य झालें नाहीं. तर त्या मूर्तीच्या ठिकाणीं तेज आलें पाहिजे. गतिमान् मूर्ति तेजस्वी झाली पाहिजे. आज हिंदुस्थानांत आपण तेहेतीस कोटी मानवमूर्ति आहोंत. पुढील गणनेंत चाळीस कोटी होणार आहेत म्हणतात. ह्या सर्व मानवमूर्ति मानवकर्मांनीं म्हणजे ' आहार निद्रा भय मैथुनंच ' वगैरे कर्मांनीं युक्त आहेत. पण त्यांत तेजस्वी किती म्हणून प्रश्न केला तर त्याचें उत्तर 'अनामिका सार्थवती बभूव' असेंच येईल. पूर्वी भोजराजाच्या वेळीं ' पुरा कवीनां गणनाप्रसंगे ' उत्तम कवि कोण कोण आहेत म्हणून गणना करण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं कविकुलगुरु जो कालिदास त्याच्या नांवानें करंगळी मिटली; पण पुढें त्याच्या जोडीला दुसरें तितक्या योग्यतेचें नांवच आठवेना. कालिदास एकें कालिदास अशी स्थिति प्राप्त झाली म्हणून ' अनामिका सार्थवती बभूव ' पुढील बोट तसेंच अनामिका राहिलें. अनामिका म्हणजे करंगळीच्या पुढील बोट वा जिला नांव नाहीं ती असे दोन अर्थ आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत आज इतके लोक आहेत पण त्यांत तेजस्वी किती आहेत म्हणून विचारलें तर एकहि नाहीं असें म्हणण्याचीच पाळी येईल. मानवव्यक्तींतील गति तेजस्वितेला गेली कीं त्या व्यक्तीची पूर्णता होते. म्हणूनच गतिमान् मूर्तीला तेज देण्याकरितां ' सर्वं तेजः सामरूप्यंऽ ह शश्वत् ' असा सामवेद पुढें आला. ... ... याप्रमाणें ऋग्वेदापासून मूर्ति, यजुर्वेदापासून गति, सामवेदापासून तेज हीं तीन तत्त्वें निर्माण झालीं. ज्या ब्रह्मदेवानें हें जगत् निर्माण केलें त्यानेंच हे तीन वेद व त्याबरोबर हीं तीन तत्त्वें निर्माण केलीं असें येथें म्हटलें आहे.

जगत् उत्क्रांतींत चालतें. मानवांत रूपोत्क्रांति समाप्त झाली. मानवांतच तेजास्विता पूर्णतेला जाणारी आहे. ही मानवाची तेजस्विता पूर्णतेला जाण्यांत जगताचीहि उत्क्रांति पूर्ण होणारी आहे. असा हा मानव कसा आहे ? तो वनस्पति व पशुसृष्टीपेक्षां निराळा आहे. तो समाजांत वास करतो. Man is a sociable animal असें आरिस्टॉटल्नें म्हटलें आहे. आपला हा येथें समाज बसलेला आहे. समाजांतच मानवाला पूर्णता येते. जनावरांत युनिव्हर्सिट्या, व्याख्यानमाला वगैरे कांहीं नाहींत. कारण तेथें समाजच नाहीं. मानवसमाजांतच या सर्व गोष्टी चालतात. मानव हा समाजांत चालणारा आहे तसा समाजहि मानवाला घेऊन चालणारा आहे. म्हणून ज्या शक्तीनें व गुणानें मानव चालतो त्याच शक्ति व तेच गुण समाजाला लागतात. जसा मानव पुरुष तसाच त्याचा समाज. त्यालाहि विराट् पुरुषच म्हटला आहे. मानवाचें जीवित कोणकोणत्या शक्तीनें चालतें ? तर तें तीन शक्तींनीं चालतें. त्या तीन शक्ति म्हणजे प्रज्ञाबल, बाहुबल व धनबल या होत. या तीन बलांनीं जी व्यक्ति युक्त असते तिची जीवितयात्रा सफल होते; अन्यथा होणें शक्य नाहीं. समजा, प्रज्ञा आहे पण शरीर कुबड्या घेऊन चालणारें आहे व जवळ द्रव्यहि नाहीं तर त्याचा संसार बरोबर होणार नाहीं. शरीर गलेलठ्ठ आहे जवळ द्रव्यहि आहे पण डोक्यांत अक्कल मुळींच नाहीं तरीहि त्याचा संसार बरोबर चालणार नाहीं. तिसरें, जवळ द्रव्य आहे, प्रज्ञा आहे पण शरीर सदा रोगी तरी त्याचाहि संसार नीट चालणार नाहीं. सारांश, व्यक्तीची जीवितयात्रा चालण्यास या तिन्ही बलांची आवश्यकता आहे. येथें या बलांत subjective and objective असे दोन भाग आहेत. शरीर व प्रज्ञा हीं दोन बलें मानवदेहाला धरून आहेत. मानवाचीं इंद्रियें व बुद्धि बलवान् पाहिजेत. हीं अहंरूप झालीं. बाहेरचें सर्व जगत् हें इदंरूप आहे. हेंच धन म्हटलें आहे. सर्व जगत, किंबहुना आपणास जें जें उपयोगी तें तें सर्व धन या सदरांत येतें.

हीच हल्लींची wealth होय. अशा प्रज्ञाबल, बाहुबल व धनबल या तिन्ही बलांत अहं-इदंची पूर्णता, मानवाची पूर्णता व समाजाची पूर्णता आहे.

समाजाच्या द्वारांच मानवाची उन्नति होणारी आहे. समाजाला बल या तीन शक्तींनीं प्राप्त होतें. या ज्या प्रज्ञाबल, बाहुबल व धनबल वगैरे तीन शक्ति यांनीं समाज पूर्णतेला जातो. समाजाचे तीन घटक व या तीन बलांचे प्रतिनिधि म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे तीन वर्ण होत. हे तीन वर्ण तीन बलांनीं युक्त असतात. त्यांना उद्देशून 'ऋग्भ्योजातं वैश्यं वर्णमाहुः । यजुर्वेदः क्षत्रियस्याहुर्योनिम् । सामवेदो ब्राह्मणानां प्रसूतिः । पूर्वे पूर्वेभ्यो वच एतदूचुः' ही तिसरी ऋचा आली आहे. ऋग्वेदापासून वैश्यवर्ण झाला असें म्हणतात. यजुर्वेद ही क्षत्रियाची जननी आहे असें म्हणतात. सामवेदापासून ब्राह्मण जन्मले व हें पूर्वीच्यांनीं जें पूर्वीच्यांना सांगितलें तें आम्ही सांगतों असें हे ब्रह्मवादी म्हणतात तें लक्षांत घेण्यासारखें आहे. असा या तीन वर्णांचा, तीन वेदांशीं संबंध या ऋचेंत दाखविला आहे. मानव पूर्णतेला जाण्यास या तीन बलांनीं युक्त अशा समाजांतच असला पाहिजे. अशीं हीं तीन तीन तत्त्वें तीन तीन वेदांशीं मोठ्या युक्तीनें जोडून येथें दाखविलीं आहेत.

वेदांचा धर्म काय आहे हें यापुढें पाहावयाचें. हा वेदांचा धर्म म्हणजे चार वेदांत सांगितलेला धर्म होय. हा वेदांचा धर्म व षड्-दर्शनें यांचा संबंध काय आहे तें आपणांस पाहावयाचें आहे. वेदांबद्दल वैदिकांची दृष्टि कोणत्या स्वरूपाची आहे तें आपण पाहिलें पाहिजे. वैदिक लोक वेदांना अपौरुषेय मानतात. ही भाषा लक्षांत घेण्यासारखी आहे. ह्या क्लृप्त्या फार बुद्धिमान् लोकांनीं काढलेल्या आहेत. त्यांचीं प्राचीन प्रमाणें हल्लींच्या काळीं आपणांस पटणार नाहींत. परंतु त्यांनीं जे सिद्धांत मांडले आहेत ते अबाधित आहेत. ते हल्लींच्या परिभाषेंत सांगतां येतात. वेद अपौरुषेय आहेत. म्हणजे ते पुरुषकृत नाहींत. इतकेंच प्राचीन मीमांसक सांगतात. ते कोणकृत हें ते सांगत नाहींत. त्यांनीं सिद्धांत

अकरणरूपानें मांडला आहे. अशा अकरणरूप सिद्धांताला (Negative Proposition) पुराव्याची (Proof) जरूर नसते. ते वेद कोणकृत हें जर सांगत नाहींत तर आपण त्याची कल्पना हल्लींच्या काळीं केली पाहिजे. येथें दोन कल्पना संभवतात. त्यांतील एक रास परमेश्वर-कृत अशी असूं शकेल. व दुसरी निसर्ग (Nature) कृत असूं शकेल. जे परमेश्वर मानणारे आहेत ते परमेश्वरकृत म्हणतील, त्यांत त्यांना समाधानहि होईल. पण न मानणारे असतील त्यांची वाट काय ? बरें ज्यांनीं परमेश्वरकृत मानले — इतर धर्मांत त्यांचे धर्मग्रंथ परमेश्वरकृत मानले आहेत — त्यांची दैना विचारूं नका. त्यांना जर कोणीं विचारलें कीं, परमेश्वर कोणत्या स्वरूपांत तुमच्याजवळ आला, तो कोणत्या भाषेंत तुमच्याशीं बोलला, गद्यांत बोलला कीं पद्यांत बोलला, तारस्वरांत बोलला कीं मंद्रांत बोलला; सांग काय तें, बाप दाखव नाहींतर श्राद्ध कर; तर ते काय उत्तर देतील ? परमेश्वर मानणें ठीक आहे. पण तो सांगणें फार अवघड काम आहे. म्हणून ती कोटी सोडली तर दुसरी कोटी राहिली ती निसर्गाची होय. हल्लीं आपण परमेश्वर वगैरे कांहीं ऐकणार नाहीं. मीमांसकहि तुम्हांला परमेश्वर माना वगैरे कांहीं सांगत नाहींत. आम्हांला देव नको असला तरी वेद पाहिजे आहेत. तुम्ही आम्ही सर्व हल्लीं निसर्ग मानतों. त्या निसर्गांत वेद सिद्ध झाले असें म्हटलें म्हणजे निसर्ग कसा आहे तें पाहिलें पाहिजे. निसर्ग उत्क्रांतींत चालतो. हल्लींचें युरोपी सर्व ज्ञान उत्क्रांतींत चालतें. युरोपांत हल्लीं सर्व ज्ञानांत उत्क्रांति (evolution) भरून राहिली आहे. आपणहि म्हणूं कीं, वेद हे उत्क्रांतिसिद्ध आहेत. परमेश्वरानें ते केलेले असोत वा निसर्ग-कृत असोत, ते माणसानें केलेले नव्हेत हें खास. हल्लीं उत्क्रांतीचा नियम शास्त्रज्ञ काय सांगतात ? उत्क्रांतीचा नियम असा आहे कीं, ज्या वेळीं ज्या गोष्टीची जरूर निसर्गांत भासते त्या वेळीं ती तेथें निर्माण होते; उगाच निर्माण होत नाहीं. आल्फ्रेड् रसेल् वॅलेसचा यावर ग्रंथ आहे.

हा डार्विनचा अनुयायी होता. डार्विनिझम्वरहि याचा ग्रंथ आहे. तो म्हणतो, सृष्टींत मानव एकाएकीं निर्माण झाला नाहीं. सृष्ट्युत्क्रांतींत मानवाचा जन्म फारच अलीकडचा आहे. त्याचा जन्म दोन तीन लाख किंवा फार तर दहा पांच लाख वर्षांतला आहे. पृथ्वीला निर्माण होऊन किती कोटी वर्षें झालीं याबद्दल शास्त्रज्ञांचें अनुमानच आहे. तिची निर्मिति होऊन अगणित कोटी वर्षें झालीं. तीवरील जीवकोटीला निर्माण होऊनच वीस कोटी वर्षें झालीं असें शास्त्रज्ञ सांगतात. जीवकोटींत तीन पर्याय आहेत; ते वनस्पति, प्राणि व मानव हे होत. वॅलेस् म्हणतो, प्रथम सृष्टींत नाना वनस्पति, नाना फुलें व फळें, त्यांचे नाना रंग निर्माण झाले; पशु, पक्षी, त्यांचे नाना मधुर आवाज व रंग निर्माण झाले; व शेवटीं या सर्वांचें गुणग्रहण ( appreciation ) करणारा असा मानव निर्माण झाला.

उत्क्रांतींत जेव्हां वेदांची जरूरी निर्माण झाली तेव्हां ते झाले असें आपण म्हणूं. कारण वेद म्हणजे ज्ञान. वेद हा शब्द विद् = जाणणें ह्या धातूपासून झाला म्हणून वेद म्हणजे ज्ञान. हें ज्ञान उत्क्रांतींत केव्हां निर्माण झालें ? तर ज्या वेळीं तींत ज्ञानवान् मानवप्राणि निर्माण झाला, त्याचें जीवित ज्ञानावर चालावें अशी स्थिति प्राप्त झाली, त्या वेळीं मानवाला या परीची जरूर म्हणून वेद निर्माण झाले. वेद मानवाला लागूनच निर्माण झाले. त्यांतला अर्थ कोणीएका मानवानें आणला नाहीं. सर्व मानवांच्या ठिकाणीं ध्वनि जसा एकदम स्फुट झाला असेल हें जसें सृष्टींत घडून आलें, त्याप्रमाणेंच वेद हे सर्व मानवांच्या ठिकाणीं एकदम निर्माण झाले. ते प्रथम एकाला ज्ञात झाले मग त्यानें ते दुसऱ्याला, त्यानें तिसऱ्याला सांगितले असा प्रकार झाला नाहीं. अशा वेदांतून निघालेला धर्म हा कोणा विशिष्ट व्यक्तीनें उपस्थित केलेला म्हणजे Personal धर्म नाहीं. वेद हे अनेकांनीं ग्रथित केलेले, सर्वांच्या कल्याणाचे असे आहेत. म्हणजे ते करून न केल्यासारखे आहेत.

भगवद्गीतेंत जसें ' तस्य कर्तारमपि मां विध्यकर्तारमव्ययम् ' म्हणजे त्याचा मी कर्ता असूनहि अकर्ता आहे असें म्हटलें आहे, त्याप्रमाणें वेदांची रचना आहे. कारण वेदांतच मीं कक्षीवानानें ही ऋचा केली पण ती प्राचीनांच्या नमुन्याबरहुकूम केली अशीं वर्णनें आहेत. तुकारामहि ज्या वेळेला आपल्या भरांत येतो त्या वेळेला ' काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें, परि त्या विश्वंभरें बोलविलें ' असें म्हणतो त्याप्रमाणें वेदांची ऋषिकृत रचना आहे. म्हणजे ऋषि ऋचेचा कर्ता आहे, तींतील अर्थाचा नाहीं. तो अर्थ प्राचीनच चालत आलेला असतो. जी अंत:शक्ति—स्फूर्ति—असते ती हें बोलते, बाह्य शक्ति बोलत नाहीं. असें अनेक मानवांचें जें ज्ञान, जें ग्रथित झालें ते वेद होत. अनेकांच्या अनेक मंत्रांचें जें एकीकरण म्हणजे Collection झालें त्याच संहिता होत. याप्रकारें असें अर्वाचीन पद्धतीनेंहि वेदांचें अपौरुषेयत्व सिद्ध करतां येण्यासारखें आहे.

याला हल्लींचें उदाहरण देऊनहि ही गोष्ट सिद्ध करतां येईल. उदाहरणार्थ, आपलें हल्लींचें पीनलकोड घ्या. त्याचा इतिहास आपणा सर्वांस माहीतच आहे. मेकॉलेनें हें कोड केलें नाहीं. कारण, चोरी करूं नको, दरोडा घालूं नको हीं तत्त्वें फार प्राचीन काळीं जेव्हां समाज स्थापन झाले असतील, तेव्हांपासूनच या देशांत चालत आलीं होतीं. तीं कांहीं मेकॉलेनें नवीन आपल्या बरोबर आणलीं नाहींत. मेकॉलेनें येथील नवीन राजवटीला धरून त्यांचीं ( Codification ) कलमें बनविलीं. त्यांतील ज्ञान कांहीं नवीन नाहीं. म्हणजे हें कोड जसें मेकॉलेनें करून न केल्यासारखें त्याप्रमाणेंच वेद होत. ते अनेकांच्या ज्ञानांत सिद्ध झालेले आहेत. अशा अपौरुषेय वेदांतून निघालेला जो धर्म— ज्याला वैदिक धर्म म्हणतात — तो आपणास सांगावयाचा आहे. तो सांगतांना त्याच्याशीं साही दर्शनांतील तत्त्वज्ञान जुळवून दाखवावयाचें आहे. पण हें साही दर्शनांतील तत्त्वज्ञान हें वैदिक तत्त्वज्ञान आहे ही गोष्ट विसरतां कामा नये.

वैदिक धर्माशिवाय व वैदिक तत्त्वज्ञानाशिवाय जगतांत अनेक प्रकारचे धर्म व तत्त्वज्ञानें आहेत. त्यांत नाना प्रकार व नाना कल्पना आहेत. कांहींत धर्म व तत्त्वज्ञान यांत मुळींच मेळ नाहीं. तत्त्वज्ञान म्हणेल कीं दोन पदार्थ गुरुत्वाकर्षणानें एकत्र येतात, तर धर्म म्हणेल येत नाहींत. धर्माला religion असें नांव आहे. हा शब्द बंधनार्थी आहे. हें बंधन कर्म करण्याचें असतें. आपल्याकडेहि 'आचारप्रभव' तो धर्म असें म्हटलेलें आहे. हें धर्माचें सर्वांत कनिष्ठ प्रकारचें लक्षण म्हणून त्याची सर्वांना जास्त आवश्यकता असते. तत्त्वज्ञानाला आपण Philosophy म्हणतों. फिलॉसफी म्हणजे ज्ञानाचें प्रेम. तत्+त्व=तत्त्व. तत्= जगद्तीत, त्याचें जें ज्ञान तें तत्त्वज्ञान होय. Religion and philosophy हे दोन्ही शब्द अत्यंत अव्यापक आहेत. आपले धर्म व तत्त्वज्ञान हे शब्द कितीतरी व्यापक आहेत. आपला धर्म हा शब्द कसा सिद्ध झाला ? हा शब्द धृ = धारण करणें या धातूपासून झाला. धर्म म्हणजे धारण करणारा. येथें कारणपरंपरा सुरू झाली. येथें Material cause, Formal cause, Instrumental cause and Final cause = उपादान कारण, रूपकारण, निमित्त कारण व अंतिम कारण, अशीं चार कारणें विचारांत घेतलीं पाहिजेत. आपल्याकडेहि भगवद्गीतेंत 'अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् । विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ॥' अशी कारणमीमांसा दिली आहे. येथें ही इतकी कारणमीमांसा पाहिली पाहिजे. नुसतें धर्म धर्म म्हणून चालावयाचें नाहीं.

धर्म म्हणजे धारण करणारा. कोण कोणाला कशाकरितां धारण करितो, या सर्वांचा येथें उलगडा झाला पाहिजे. धर्म म्हणजे धारणा. हें जगत् कोणीं तरी निर्माण केलें असें आपण समजतों. आपण व जगतांतील इतर सर्व धर्म जगत् परमेश्वरानें निर्माण केलें असें समजतात. मानव हाहि त्या जगताचा एक घटक आहे. हें जगत् कोणत्या नियमांनीं बद्ध आहे हें पाहिलें पाहिजे. जगताला आपण उत्पत्ति मानिली कीं

त्या उत्पत्तीच्या मागोमाग त्याला लय आलाच. कारण उत्पत्ति-लयाच्या द्वंद्वांत जगत् चालतें. त्याला जशी उत्पत्ति तसा लयहि आहे. जगतांतील जी जी लहान मोठी घटना ती ती उत्पत्ति– लयानें बद्ध आहे. येथें एक बिंदु उत्पत्तीचा व दुसरा बिंदु लयाचा आहे. या दोन बिंदूंना जोडणारी मध्यें सरळ रेषा आहे. युक्लिडनेंहि मूळ पॉइंट व लाईनच सांगितली आहे. ही जी दोन बिंदूंच्या मधली सरळ रेषा तिला स्थिति हें नांव आहे. उत्पत्ति, स्थिति व लय या त्रिपुटींत जगत् चालतें. जगतांत जें जें सर्व कांहीं तें तें जगतूच आहे असें त्याचें 'यत्किंच जगत्यां जगत्' याप्रकारें प्राचीनांनीं वर्णन केलेलें आहे. 'अणोरणीयान्' पासून तों 'महतो महीयान्' पर्यंत जगतांतील जो जो पदार्थ तो तो या उत्पत्ति-स्थिति-लयानें बद्ध आहे. येथेंच धर्म उत्पन्न होतो. उत्पत्तीपासून लयापर्यंत जी मधली स्थिति-रेषा तिला धारण करणारा जो तो त्या वस्तूचा धर्म होय. कोणत्याहि पदार्थाचा स्थितिधारक जो तो त्याचा धर्म. जगत् हें उत्क्रांतींत चालतें. त्यांत नाना पर्याय आहेत. जगताचा पहिला पर्याय आकाश झालें म्हणून आकाशाचा धर्म. आकाशापासून पुढें वायु झाला म्हणून वायूचा धर्म. वायूपासून अग्नि झाला म्हणून अग्नीचा धर्म. अग्नीपासून आप म्हणजे पाणी झालें म्हणून पाण्याचा धर्म. पाण्यापासून पुढें पृथ्वी झाली त्या पृथ्वीचा धर्म. पृथ्वीवर ओषधिवनस्पति झाल्या त्या वनस्पतींचा धर्म. वनस्पतींपासून प्राणी झाला त्या प्राण्याचा धर्म. प्राण्यापासून पुढें मानव झाला त्या मानवाचा धर्म. मानवांत अनेक प्रकारचीं नातीं उत्पन्न होतात. तेथें हि धर्म असतोच. कोणी राजा असतो, राजाचा धर्म; कोणी प्रजा असतात, प्रजांचा धर्म, कोणी स्त्री असते, स्त्रीचा धर्म; कोणी पुरुष असतो, पुरुषाचा धर्म; कोणी वक्ता असतो, वक्त्याचा धर्म; कोणी श्रोता असतो श्रोत्याचा धर्म. येथें जीं जीं नातीं निर्माण होतात त्यांची स्थिति धारण करणारा जो तो तेवढ्यापुरता त्याचा धर्म होय. असा धर्म हा अत्यंत व्यापक आहे.

वेदांचा धर्म म्हणजे नुसता आचारप्रधान नाहीं, तर तो संपूर्ण धारणेला धरून आहे. अशा धर्माच्या व्याख्या वेदांत दिल्या आहेत त्या आपण आतां पाहूं. वैदिक वाङ्मयांतील तैत्तिरीय आरण्यकांत ही धर्माची मूळ व्याख्या आली आहे. वैदिक वाङ्मयांत मूळ संहिता, त्यांवर उपबृंहक असे भाष्यासारखे ब्राह्मणग्रंथ, त्या ब्राह्मणग्रंथांना जोडून आरण्यक हा भाग, त्या आरण्यकांत ही धर्माची वेदांनीं केलेली व्याख्या आली आहे. वेदांनीं ' धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ' अशी व्याख्या केली आहे. संपूर्ण जगताची जी प्रस्थिति तो धर्म असें येथें म्हटलें आहे. प्रतिष्ठा हा शब्द प्र + स्था यापासून झालेला आहे. प्रकर्षानें जी स्थिति ती प्रतिष्ठा होय. जगत् हें उत्क्रांतींत चालतें. त्यांत एकापुढें एक अनेक पर्याय निर्माण होतात. यालाच आपण जगद्विकास म्हणतों. शेवटचा पर्याय मानवाचा व तो पूर्ण आहे. ही जी शेवटची प्रजा निर्माण झाली तीच प्रतिष्ठा होय. प्रजा म्हणजे प्रकर्षानें आहे जन्म ज्याचा तो मानव होय. तो उत्क्रांतींत शेवटीं जन्माला आला. मागच्या परीची जी पुढली उत्क्रांति असते ती मागच्याची प्रजाच होय. अशी सर्व उत्क्रांति यज्ञावर चालते. मानवहि त्या यज्ञानेंच जन्माला येतो. म्हणूनच गीतेंत भगवंतांनीं ' सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा ' असें म्हटलें आहे. अशी जी मागच्यापासून पुढील प्रजा होते तेंच नीट्झ्शेनें म्हटल्याप्रमाणें Propagation upwards होय. ही जी उत्क्रांतीची प्रस्थिति किंवा प्रकर्ष हा ' सहयज्ञ ' म्हणजे यज्ञासह असतो. या सर्वांसकट जी धारणा तीच ' विश्वस्य प्रतिष्ठा ' होय. ही प्रतिष्ठा किंवा धारणा उत्क्रांतींतील ज्या एकापुढें एक उच्चोच्च पायऱ्या त्या पायऱ्यांवरील जी स्थिति तिला धरून म्हटली आहे. अशी जी उत्क्रांतींतील संपूर्ण गति त्या गतिसकट जी धारणा तो मानवाचा धर्म होय. ही प्रतिष्ठा कशी येते, वेदांत तें कसें सांगितलें आहे, तें प्रथम पाहून मग त्यांत हीं सहा दर्शनशास्त्रें कशीं येतात तें मागाहून पाहूं.

वैदिकधर्म हा कोणा व्यक्तीच्या कल्पनेंत सिद्ध झाला नाहीं. तो पूर्णपणें तत्त्वज्ञानावर उभारलेला आहे. अशा तत्त्वज्ञानाचा संपूर्ण उलगडा करून मग वैदिक धर्माचें रूप काय आहे तें आपण पाहूं. ही प्रस्थिति किंवा प्रतिष्ठा मानवाला येते कशी हा मुख्य प्रश्न आहे. हें संपूर्ण ज्ञानच कशाकरितां निर्माण झालें? मानवानें हें ज्ञान स्वतःकरितां सिद्ध केलें. त्याची स्वतःची धारणा, उन्नत धारणा, तिला या ज्ञानाचा उपयोग आहे. या दृष्टीनें विचार केला तर मानवाचें सर्व ज्ञानच मुळीं Anthropocentric दिसणार आहे. हा अँथ्रोपोसेंट्रिक शब्द ग्रीक आहे. अँथ्रोपास म्हणजे मनुष्य. सेंट्रिक यांतील सेंटर हा शब्द संस्कृत केंद्र शब्दाचा अपभ्रंश आहे. मानव हा या जगतांत आपणाला केंद्रस्थानीं कल्पून ज्ञानाचा विचार करतो. संपूर्ण जगत् तो आपल्या भोंवतीं पाहतो. परमेश्वर सुद्धां तो निर्माण करतो. तो त्याला उपयोगी असला तर तो मानतो, नाहीं तर त्याला फेंकून देतो. असा मानव हा आपल्याला जगताच्या केंद्रस्थानीं बसवून घेऊन मग जगताचा विचार करतो. जगदुत्क्रांति कोणीं केली तर परमेश्वरानें केली असें आपण मानतों. जगतांतील सर्व धर्म हेंच मानतात. तत्त्वज्ञानाच्या राशी तीन; मनुष्य, जगत् व परमेश्वर. यांत मानवाची स्थिति पाहिली पाहिजे. परमेश्वर कसा आहे हेंहि पाहिलें पाहिजे. परमेश्वर कसा आहे हें इतर धर्मांना सांगतां येत नाहीं. तो दयाळू, मायाळू आहे असें इतर धर्म म्हणतात. आपल्या धर्मांतहि परमेश्वरावर गुणांचा अध्यारोप केलेला आहे.

मानव हा ज्ञान कसें प्राप्त करून घेतो? त्याचे ठिकाणीं पंचज्ञानेंद्रियें आहेत. तीं पांचच आहेत व तीं सर्व डोक्याचे ठिकाणीं आहेत. हा मस्तिष्कवान् प्राणी ज्ञान कसें मिळवितो? त्याच्या पंचज्ञानेंद्रियांनीं त्याला ज्ञान मिळतें का? तर नाहीं. पंचज्ञानेंद्रियांनीं जें त्याला दिसेल, तेंच तो मानणार. डोळ्यांनीं जें दिसेल, रसनेनें जें चाखतां येईल, त्याच्या पांच इंद्रियांना भासणारें जें ज्ञान तें प्रत्यक्ष ( Positive ) ज्ञान होय.

या ज्ञानाची गति फार लहान असते. कारण हीं पंचज्ञानेंद्रियें पशूंतहि असतात. मानवाच्या प्राणिमत्वाला धरून त्याची Man is an animal अशी व्याख्या केली जाते. प्लेटोनें मानवाची व्याख्या animal implume bipes पक्षरहित द्विपादप्राणी अशी केली आहे. येथें बायपेस् हा शब्द संस्कृत द्विपाद या शब्दापासून झालेला आहे. नुसता द्विपाद प्राणी म्हटला तर पक्षीहि होईल म्हणून पक्षविरहित द्विपाद अशी त्याची व्याख्या केली आहे. ही जरी प्लेटोची व्याख्या असली तरी आपण ती मान्य करणार नाहीं. कारण आपल्याला प्राणी म्हणणें बरें वाटणार नाहीं. आपली श्रेष्ठता ज्ञानावर आहे. एक वेळ पंख असते तरी चालतें पण मानवाला ज्ञान पाहिजे. मानवाप्रमाणें पशूलाहि ज्ञानेंद्रियें आहेत. त्यालाहि तद्वारां ज्ञान प्राप्त होतें. पशु हा आपल्यापेक्षां जास्त Positivist आहे. त्याच्या इंद्रियांची शक्ति आपल्यापेक्षां जास्त आहे. त्याचे कान हालतात आपले हालत नाहींत. घारीच्या डोळ्यांप्रमाणें आपल्याला दिसत नाहीं. त्यांत युनिव्हर्सिटीच्या परीक्षा देणारा माणूस घेतला तर कांहीं विचारावयासच नको. त्याला दहा हातावरचेंहि दिसत नाहीं. पशु या इंद्रियज्ञानांत मानवापेक्षां फार मोठा दिसेल. आपण मानव या पांच ज्ञानेंद्रियांच्या प्रत्यक्ष ज्ञानावर मोठें होत नाहीं. तर आपल्यांत या बाह्य ज्ञानेंद्रियांशिवाय जीं मन, बुद्धि आदिकरून अंतरिंद्रियें आहेत त्यांच्या ज्ञानानें आपण मोठे होतों. बुद्धीचें इंद्रिय जें महामस्तिष्क त्याचें जें कर्म ( function ) घडतें, त्यांतच मानव मोठा ठरतो. सिंह, व्याघ्र, हत्ती वगैरे मानवापेक्षां इंद्रियबलानें मोठे असतील पण बुद्धींद्रियांत म्हणजे फ्रोनेमांत ते मानवापेक्षां फार लहान दिसतील. मस्तिष्कांत जी बुद्धीची क्रिया चालते त्यांत मानवाचा मोठेपणा असतो. प्रत्येक इंद्रियाचा व इंद्रियार्थाचा संनिकर्ष किंवा संयोग झाला कीं ज्ञान प्राप्त होतें. पण हें बाह्येंद्रियांचें ज्ञान होय. बुद्धीच्या ज्ञानाची गोष्ट निराळी आहे. मी डोळे मेले तरी बुद्धीनें अव्यक्ताहि बघूं शकेन. मी माझ्या बुद्धीनें सान्ताच्या

पलीकडे असलेल्या अनंताचाहि ठाव घेईन. आपल्या पंचज्ञानेंद्रियांच्या मर्यादा वाढविण्यास मानवानें उपकरणें शोधून काढलीं. त्याचे डोळे चंद्र सूर्य नीट पाहूं शकत नाहींत म्हणून त्यानें दुर्बिण शोधून काढली, सूक्ष्म पाहातां येईना म्हणून सूक्ष्मदर्शक यंत्र शोधून काढलें. त्याला उडतां येईना म्हणून त्यानें विमान शोधून काढलें. हल्लीं युरोपांत ' स्टेल्लर इव्होल्यूशन ' म्हणजे ताऱ्यांची उत्क्रांति वगैरे कशी झाली यावर ग्रंथ लिहितात. हे नभोमंडळांतील असंख्य तारे वगैरे हे काय आहेत? चंद्र आपल्या साध्या डोळ्याला येवढासा दिसतो तो दुर्बिणीनें फार मोठा दिसेल. हल्लीं एक फार मोठी दुर्बिण होत आली आहे. तिनें तो अर्ध्या मैलावर आलेला दिसेल. चंद्र मोठा दिसला तरी दुर्बिणीनें तारे कोठें मोठे दिसतात? व्याधाचा तारा तींतून डोळ्यापेक्षां मोठा दिसत नाहीं; आमचा सूर्य व त्याचे ग्रह तेवढे मोठे दिसतात. गुरूचे अकरा चंद्र ज्या दुर्बिणीनें दिसतात तिनें व्याधाचा तारा मोठा दिसत नाहीं. आपला सूर्य पृथ्वीपासून किती लांब आहे? तर त्यावरील किरण पृथ्वीवर येण्यास ८ मिनिटें लागतात. किरणाची गति एका सेकंदांत १८६००० मैल असते. व्याधाच्या ताऱ्याचा किरण पृथ्वीवर अडीच वर्षांनीं येतो ! कांहीं ताऱ्यांच्या किरणांना दोन दोन लाख वर्षे लागतात ! स्टार कॅनोपस किंवा अगस्त्याचा जो तारा आहे त्याचे किरण पृथ्वीवर येण्यास २००० वर्षे लागतात. म्हणजे येशु ख्रिस्त जन्मला त्यावेळीं तेथील किरण जो सुटला असेल तो हल्लीं पृथ्वीवर आला असेल ? या अगस्त्याच्या अंतराची कल्पना येण्यास दोन हजार वर्षांचे सेकंद करून त्याला १८६००० नीं गुणा म्हणजे येईल.

इतक्या लांबचा पसारा दुर्बिणीच्या बापाला तरी कसा समजणार ? माणसाची अक्कल येथें गुंग होते. ज्ञानेंद्रियांच्या शक्ति संपतात तेथें त्याच्या पलीकडे पाहण्याचें काम बुद्धींद्रियच करूं शकतें. तें सान्ताच्या पलीकडे अनंताचाही ठाव घेतें. तें परमेश्वराच्या हेतूचाही ठाव घेतें. असें

हें बुद्धींद्रिय मानवांत सर्व इंद्रियांपेक्षां अत्यंत मोठें आहे. तो ज्ञानवान् या बुद्धिबलावर झाला आहे. त्याचें ज्ञान पशूपेक्षां फार मोठें. पशु हा डेव्हिड ह्यूमप्रमाणें प्रत्यक्षवादी असतो. मानव केवळ या प्रत्यक्ष ज्ञानावर जर राहता तर त्यानें ज्ञानांत पुढें मजल मारली नसती. आपलें ज्ञानहि पंचज्ञानेंद्रियांनीं युक्त असतें. या ज्ञानाबद्दल कोणाचाच वाद नाहीं. आपल्याला सान्त जगत् कळतें. पण अज्ञाताचाहि पसारा फार मोठा आहे. त्याचा ठाव या इंद्रियांच्या द्वारा कसा घ्यावयाचा ? तर ज्ञात वस्तूचा आरोप अज्ञात वस्तूवर करून आपलें ज्ञान वाढवावयाचें. सूर्याचें ज्ञान मानवानें प्राचीन काळीं कसें प्राप्त करून घेतलें ? वेदांत त्याचें वर्णन केलें आहे. ' आ प्रा द्यावा पृथिवी अंतरिक्षं सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ' सूर्य द्यु, पृथिवी व अंतरिक्ष यांना व्यापून जगत् व तस्थुष म्हणजे स्थावर व जंगम यांचा आत्मा झाला. मानवाला हें ज्ञान कसें झालें त्याची इटिऑलजी कार्यकारणमीमांसा आपण पाहिली पाहिजे. आपण जें ज्ञान प्रत्यक्ष अनुभवितों त्याचा आरोप अज्ञात वस्तूवर करून त्या अज्ञात वस्तूचें ज्ञान प्राप्त करून घेतों. उदाहरणार्थ, मी ५॥ फूट उंच व दीड फूट रुंद आहे. इतकी जागा मी या शरीरानें व्यापतों. मला अधिक जागा व्यापावीशी वाटली तर मी माझीं गमनाचीं इंद्रियें प्रसृत करीन. दोन हात लांब करून ५।६ फुटांचा डायामेटर करून मी अधिक जागा व्यापीन. कर प्रसृत करून मीं जागा व्यापिली. सूर्यानेंहि तीन लोक व्यापले असें म्हटलें तर ते कसे व्यापले ? मी जसे माझे कर प्रसृत करून जागा व्यापतों त्याप्रमाणें. सूर्यावर माझ्या करप्रसृतीचा आरोप करून मीं सूर्याचें व्यापन-कर्म जाणलें. त्याचे कर किती व त्यांची लांबी किती हा प्रश्न नाहीं. मीं जें व्यापनकर्म अनुभविलें तें सूर्याच्या ठिकाणीं आरोपित करून जसें त्याचें ज्ञान मिळवीन, तसें प्राचीनांनीं मिळविलें.

हाच मार्ग बुद्धीबद्दल आहे. पंचज्ञानेंद्रियांचें जें ज्ञान तें सान्त ज्ञान; तें प्रत्यक्ष प्रमाणावर उभारलेलें असतें. प्रत्यक्ष हें फार लहान

प्रमाण आहे. प्रत्यक्ष फार थोडें असतें. त्याला अनुमानाची जोड देऊन ज्ञान फार वाढवितां येतें. याला एखाद्या बँकेचें उदाहरण घ्या म्हणजे समजेल. बँकेंत प्रत्यक्ष नाणें फार थोडें असतें. पण क्रेडिटवर तिचा फार मोठा व्यवहार चालतो. क्रेडिट म्हणजे कागदाचे कपटे, हे तिचे पंख असतात. या पंखावर तिच्या भराऱ्या चालतात. तसें प्रत्यक्ष ज्ञान फार थोडें, त्याला अनुमानाचे पंख लावून त्यानें ज्ञानांत लांबवर भराऱ्या मारावयाच्या असतात. परमेश्वर निर्गुण, निराकार, एकमद्वितीय असा आहे. तो ज्ञानांत आणावयाचा म्हणजे गुणकर्मांत आणावयाचा. जो निर्गुण निराकार त्यावर गुणांचा व कर्मांचा आरोप करून तो आपण आपल्या अनुभवाप्रमाणें बनवितों. जरी परमेश्वर निराकार व निस्त्रैगुण्य असला तरी आपण तो गुणांत आणून त्यावर सत्, चित् व आनंद या तीन गुणांचा आरोप करून तो आपल्या ज्ञानाच्या कक्षेंत आणला. या सच्चिदानंदरूप परमेश्वराचें Evolution ला धरून रूप पाहिलें पाहिजे. आजचा विषय प्रास्ताविक झाला. उद्यां वेदांचें स्वरूप, त्यांतून निघालेला वैदिक धर्म, या धर्माचा व षड्दर्शनांचा संबंध कसा आहे तेंहि दाखवूं. तसेंच षड्दर्शनांचें स्वरूप अर्वाचीन शास्त्रांप्रमाणेंहि सिद्ध करून देऊं.

---

## व्याख्यान २ रें

अध्यक्ष महाराज व उपस्थित स्त्री-पुरुष सज्जनवृंद,

या ठिकाणीं ही जी माला उपस्थित करण्यांत आली आहे तींतील आजचें हें दुसरें व्याख्यान आहे. आज येथील बसण्याची व्यवस्था जरा बदललेली आहे. काल जें नित्याप्रमाणें व्याख्यान झालें तें पुष्कळांना ऐकूं गेलें नाहीं, अशी आमच्याकडे तक्रार आली पण दोष बोलणाराचा नाहीं. आमचा आवाजच जर लहान असता तर

हा दोष आम्हीं पत्करला असता. आपण विसाव्या शतकांतले, पाश्चात्य सुधारणा आपण पाहतों. पण स्थापत्यशास्त्रांत अद्याप आपण सुधारलों नाहीं. आपलें इंजीनिअरिंग अद्याप सुधारलें नाहीं. ज्या कार्याकरितां हा हॉल बांधला तें कार्य यांत नीट साधत नाहीं. वास्तविक हॉलची रचना अशी पाहिजे कीं, वक्त्याचा आवाज जरी लहान असला तरी ब्रॉडकास्टिंग शिवाय तो मोठा होऊन सर्वांना ऐकूं यावा. पण जें काय हल्लीं आहे तें सर्वांनीं मानून घ्यावयाचें आहे. आज जी व्यवस्था केली आहे ती सर्वांना ऐकूं येण्यासारखी झाली आहे. या व्याख्यानमालेला जे अध्यक्ष लाभले आहेत तेहि मालेंत येणारा लहानसा मुद्दा बरोबर जाणणारे असेच आहेत; असें काल त्यांनीं जातां जातां जो मुद्दा मांडला त्यावरून दिसतें. कायदेशास्त्र हें नीतीचें शास्त्र आहे. मानवाची उच्च प्रकारची नीति वेद सांगतात म्हणून मीमांसकांची ‘ शब्दो नित्यः ’ अशीच कायद्याप्रमाणें भाषा आहे. Unwritten law याप्रमाणेंच असतो. आपला नेहमींचा कायदा जरी written असला तरी त्याचें मूळ unwritten law मध्येंच असतें. आपलें सरकार आपल्याला Government established by Law असें म्हणतें. यांतील लॉ शब्दाचा अर्थ सांगणें कठीण आहे. हा लॉ काय आभाळांतून खालीं आला का भुईंतून वर आला? असा जो लॉ तो परमेश्वरस्वरूपाप्रमाणें असतो. परमेश्वराचें रूप सांगणें जितकें कठीण तितकेंच या लॉचें स्वरूप सांगणेंहि कठीण असतें. हा लॉ नित्य आहे, अशी जी भाषा आपण बोलतों तोच प्रकार ‘ शब्दो नित्यः ’ अशी भाषा योजण्यांत मीमांसकांनीं केला आहे. येथें परमेश्वराचा विचार करण्याचें वेदांना कारण नाहीं. तो माना अगर मानूं नका; तो आहे म्हणा अगर नाहीं म्हणा; पण त्याचा शब्द जो वेद तो मात्र तुम्हीं मानला पाहिजे. मीमांसक परमेश्वर न मानणाराला नास्तिक म्हणत नाहींत; ते वेद न मानणाराला नास्तिक म्हणतात. हल्लीं तुम्ही राजाबद्दल कांहींहि बोला, तो असावा कीं नसावा, तो एक असावा

कीं दोन असावेत, तो पार्लमेंटनें युक्त असावा कीं नसावा वगैरे वाटेल तो वाद करा; राजा रागावत नाहीं. पण जर का त्याचा शब्द म्हणजे कायदा मोडलात, त्याचें पीनलकोड मानीत नाहीं असें म्हटलेंत, तर मात्र राजा रागावेल. तो म्हणेल, मला माना वा मानूं नका पण माझा शब्द म्हणजे कायदा मानला पाहिजे. कायदा मानवाच्या जन्मापासून त्याच्या अंतापर्यंत त्याच्या मागें लागलेला आहे. तो प्रत्येक माणसाला लहानपणापासून माहीत आहे असें कायदा धरून चालतो. Ignorance of Law हें राजा मानीत नाहीं. चोरी करणें हा गुन्हा, हें शिकवण्याच्या शाळा नाहींत. अमक्या कर्मानें गुन्हे होतात हें आम्हांला माहीत नाहीं, असें म्हणून चालत नाहीं. असा लॉ हा नेहेमीं unwritten च असतो. असा लॉ मनुष्याच्या रक्तांत खिळलेला असतो. हा लॉ विशिष्ट व्यक्तिकृत नसतो, तर तो समाजकृत असतो. असा लॉ धारण करणारे वेद आहेत; म्हणून ते अपौरुषेय आहेत. अपौरुषेय ही भाषा न्यायाला धरून आहे. लॉचा दृष्टांत घेऊनच अपौरुषेयत्वाच्या वादाचा निकाल लावतां येण्यासारखा आहे.

तसेंच आर्य हा अग्नि व सूर्य यांचा उपासक आहे. अग्नि व सूर्य हीं दोन जगतांतील तेजाचीं प्रतीकें आहेत. गतिमान् मूर्ति तेजस्वितेला जाऊन पूर्णतेला पोंचते ही प्राचीनांची भाषा आहे. अर्वाचीन हें तत्त्व उत्क्रांतीच्या भाषेंत बोलूं लागले. ही उत्क्रांति प्राचीन लोकांना ठाऊक आहे. प्राचीन ग्रीक पंडित आरिस्टॉटल व आपल्यांतील सांख्यदर्शनकार यांना ही माहीत होती. डार्विनपासून युरोपांत या उत्क्रांतीचा ऊहापोह सुरू झाला. पृथ्वीवर प्रथम वनस्पतिसृष्टि, नंतर प्राणिसृष्टि, नंतर मानवसृष्टि निर्माण झाली. मानव हा प्राण्यांतून वरतीं आला असें उत्क्रांतिवादी म्हणतात. मानवांत तरी उत्क्रांति पूर्ण झाली कां ? का त्याच्या पुढें एखादी कोटी निर्माण व्हावयाची आहे ? हा प्रश्न जेव्हां युरोपांत शास्त्रज्ञांपुढें आला तेव्हां ते यावर विचार करूं लागले. मानव त्यांना दोषरूप दिसूं

लागला. तो पूर्णत्वाला कसा जाईल, त्याची पूर्णता कशांत होणार ? अशा पूर्णता पावलेल्या गुणवान् मानवाला नांव काय द्यावें ? याचा जेव्हां पाश्चात्य शास्त्रज्ञ विचार करूं लागले तेव्हां ते मानवाच्या पलीकडील कोटीचीं अनुमानें करूं लागले. मानवापुढील रूप काय असावें? त्याला शब्द काय लावावा, हें त्यांना सुचेना. जर्मन तत्त्ववेत्ता फ्रेड्रिक नीट्झ्शे यानें उत्क्रांतीचा फार विचार करून मानवापलीकडील कोटीची कल्पना काढली. त्यानें त्याला über mensem = over man, above man, upper man म्हणजे मानवातीत वगैरे अशा प्रकारचें नांव दिलें. मानवातीत ही कोटी काय असावी हें त्याला निश्चित सांगतां येईना. वस्तूचें गुणकर्म नीट कळलें पाहिजे तरच तिला नांव देतां येतें. इंग्रजींत याला ' सुपरमॅन ' म्हणतात, पण यालाहि कांहीं अर्थ नाहीं. वैदिक तत्त्वज्ञानांत याचा अर्थ बरोबर कळला आहे. प्राणिसृष्टींतून मानव वरतीं आला, तो अधिक वरतीं जावयाचा, तो कोठें जावयाचा? तर मानवा पलीकडील कोटीला आपण देव म्हणतों. देव म्हणजे काय ? देव हा शब्द दिव् प्रकाशणें, तेजणें या धातूपासून झाला आहे. देव म्हणजे तेजस्वी. गतिमान् मूर्ति तेजस्वी व्हावयाची म्हणजेच मानवाचा पुढें देव व्हावयाचा. ही कल्पना ' सुपरमॅन् ' च्या कल्पनेच्या फार वरची आहे. मानवाचा देव कसा व्हावयाचा ? जगतांत तेजाचे प्रतिनिधि एक अग्नीची ज्वाला, व दुसरे सूर्याचे किरण. अग्नि व सूर्य हे आर्यांचे मूळ देव. तेजस्विता प्राप्त व्हावी म्हणून आर्य मानव या अग्निदेवतेची व सूर्याची प्रार्थना करतो. विशेषतः सूर्याचें तेज आपल्या बुद्धींत यावें म्हणून गायत्रीमंत्रद्वारा तो त्याची प्रार्थना करतो. या तेजस्वितेच्या उच्च कल्पना डोळ्यापुढें ठेवूनच आमच्या वैदिक धर्माची रचना झाली आहे. तेजप्राप्ति हें वैदिक धर्माचें मुख्य लक्षण आहे. या कल्पना जगानें आमच्या पासून उचलल्या आहेत. कृशानु, भानु, विह्नु ( विष्णु ) वगैरे तेजवाचक शब्द युरोपांत, ईजिप्टांत कसे गेले याचा इतिहास फार मोठा आहे. अध्यक्षांचा हाहि कृशानु,

भानूचा मुद्दा महत्त्वाचा आहे. खाल्डिया ईजिप्ट वगैरे देशांत ही वैदिक संस्कृति फार प्राचीन काळीं गेली होती. वेदांत आर्य व अनार्य अशा दोन जाति आहेत. सूर्योपासना करणारे व अग्नीवर यजन करणारे ते आर्य. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे यज्वा तो आर्य व अयज्वा तो अनार्य असें म्हणतां येईल. या अनार्यांच्या जाति वेदांत सांगितल्या आहेत. दनु, दस्यु, यातु व रक्षस् या अनार्य जातींचीं नांवें वेदांत येतात. हे जरी अनार्य असले तरी ते आर्यांचें अनुकरण करणारे होते. अशा अनार्य जातींपैकीं दानव ( दनूचे ते दानव ) ही जाति खालीं ईजिप्टांत गेली. त्यांनीं आर्य कल्पना घेतल्या. ईजिप्टच्या इतिहासांत मेनीज हें नांव येतें. हल्लींच्या नवीन उत्खननांतील शोधांत हें नांव नीट वाचलें गेलें. तें नांव मन्नु दन्नु असें आहे. मन्नु दन्नु म्हणजे दानव मनु. मनु हें नांव सर्वसामान्य आहे. आपला जसा देवमनु तसा तो दानवमनु. हा जो दानवमनु यानें सूर्यकल्पना घेतली. त्यांच्यांत होरस् = सूर्यस् ( ह चा स होतो ). असीरिस् = असूर्यस् हिला:रात्र म्हटली आहे व तिचा मुलगा होरस म्हटला आहे. आपल्या मित्रावरुणाप्रमाणें या कल्पना आहेत. वरुणाला आपण रात्रीचा देव म्हणतों. तसेंच सकाळची देवता जी ती इसिस = उषा म्हटली आहे व तिची प्रजा होरस म्हटली आहे. सूर्याला धरून या सर्व कल्पना ईजिप्टांत गेलेल्या आहेत. ग्रीकांत-हि या सूर्यकल्पना आढळतात. ग्रीकांत हेलिओपोलिस असें नांव येतें. याचा अर्थ काय आहे ? हेलिओपोलिस = सूर्यपुर. येथें ह चा स हाहि आपल्या पाणिनीय प्रक्रियेप्रमाणें होतो. ग्रीकांतील काय किंवा ईजिप्टांतील काय ह्या सर्व वेदांपासून घेतलेल्या कल्पना आहेत.

आतां आपल्या मूळ विषयाकडे वळूं. आपण जगताचा निर्माता जो परमेश्वर त्यावर गुणांचा आरोप करतों. जे गुण आपण साक्षात्कारितों ते परमेश्वरावर लावतों, त्यावर आरोपित करतों. ते गुण सत्, चित्, आनंद हे होत. या तीन गुणांनीं परमेश्वर युक्त आहे असें आपण सम-

जतों. त्यानें हें जगत् कशाकरितां निर्माण केलें ? त्यानें हा जगद्विकास कशाकरितां केला ? हे परमेश्वराचे गुण आपण कसे समजावयाचे ? तर गुण हे एकटे राहूं शकत नाहींत. गुणांबरोबर नेहमीं कर्म असतें. गुण व कर्म हें द्वंद्व आहे. तें नेहेमीं हातांत हात घालून असतें. गुणाबरोबर कर्म तर कर्माबरोबर गुण चालतो. Potentiality and Actuality या दोन्ही बरोबर चालतात. कर्मपूर्व स्थिति ती Potentiality व साक्षात् कर्म ही Actuality होय. हें टेबलावर ठेवलेलें घड्याळ; यांत खालीं पडण्याची Potentiality आहे. त्याला मध्यें टेबलाचा अडथळा आहे. त्याखालील टेबलाचा आधार काढलात कीं तीच Potentiality तुम्हांला Actuality मध्यें Transform झालेली दिसेल. हा सिद्धांत तुम्हांला गुणकर्माच्या जोडींत दिसेल. म्हणून गुणावांचून कर्म नाहीं तर उलट कर्मावांचून गुण नाहीं. समजा, आम्ही येथें आलों, तुम्हांला कोणीं सांगितलें कीं यांच्या ठिकाणीं वक्तृत्वाचा गुण आहे. आम्हीं जर वक्तृत्व केलें तर तो गुण आपणांला समजेल. पण आधीं आमच्यांत तो गुण असल्यावांचून आम्ही वक्तृत्वाची क्रिया तरी कशी करणार ? असा गुण व कर्म या दोहोंचा संबंध आहे. आपण परमेश्वरावर सच्चिदानंद या गुणांचा आरोप केला, पण याचा अनुभव कसा यावयाचा ? याला एकच मार्ग आहे; तो कर्मांत आला पाहिजे. असें कर्म जेव्हां आपण पाहतों तेव्हांच गुण कळतात. आपण माझें वक्तृत्व जेव्हां प्रत्यक्ष ऐकाल तेव्हां माझ्या वक्तृत्वगुणाचा आपणास साक्षात्कार होईल. परमेश्वरानें हें जगत् आपल्या गुणांच्या प्रकटीकरणार्थ उत्पन्न केलें असें म्हटलें तरी हरकत नाहीं. जगत् हें गतिमान् आहे. त्यांत विद्युत्परमाणुपासून मानवापर्यंत सर्व रूपें निर्माण झालीं. या रूपांत परमेश्वराच्या अनंत गुणांचें प्रकटीकरण चाललेलें आहे. जगत् हें पुनः उत्क्रांतींत चाललेलें आहे. उत्क्रांति म्हणजे गुणविकास. परमेश्वरानें आपल्या गुणप्रकटीकरणार्थ हें जगत् कां केलें ? मानवकल्पनाच

त्यावर लादावयाची तर असें म्हणतां येईल कीं, मानव जसें कोणतेंहि कर्म आपल्या सुखासाठीं करतो तसेंच परमेश्वरानें हें जगत् आत्मसुखार्थ निर्माण केलें. मनुष्य जें जें कर्म करतो, तें तें दुसऱ्या कोणाकरितां नसून स्वतःच्या सुखाकरितांच असतें. ही गोष्ट बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्यानें अनेक उदाहरणांनीं दाखविली आहे. तो म्हणतो ' न वा अरे पत्युःकामाय पतिः प्रियो भवति । आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति ।' स्त्री जें पतीवर प्रेम करिते तें पतीकरितां नसतें तर तें स्वतःकरितां असतें. जो तो सर्व स्वतःकरतां करतो, दुसऱ्याकारितां कांहीं करीत नाहीं. परमेश्वरावराहि हाच सिद्धांत लावला तर असें दिसेल कीं त्यानेंहि हें जगत् सत्, चित् व आनंद या आपल्या तीन गुणांच्या प्रकटीकरणार्थ केलें. त्या जगतांत आकाशापासून किंवा इलेक्ट्रॉनपासून मानवापर्यंतची उत्क्रांति घडून आली. या उत्क्रांतींत एक पर्याय सद्गुणाचा, दुसरा चिद्गुणाचा, तिसरा आनंदगुणाचा असे निर्माण झाले. पहिल्या सत् गुणाकरितां निराळे आकार, दुसऱ्या चित् गुणाकरितां निराळे आकार व तिसऱ्या आनंदगुणाकरितां निराळे आकार असे त्यानें निर्माण केले. हें सर्व त्यानें स्वतःच्या निरानिराळ्या गुणांच्या प्रकटीकरणार्थ निर्माण केले. हा सर्व विचार आपण उत्क्रांतीच्या दृष्टीनें करीत आहों. ही उत्क्रांति प्राचीनांनीं व अर्वाचीनांनीं आपापल्या दृष्टीनें मांडली आहे. दोन्ही पद्धतींतील पर्याय समांतर ठेवून जुळलेले दिसले कीं त्यावर अशी शंका येते कीं हे प्राचीनांचे पर्याय अर्वाचीनांशीं बरोबर जुळतात कसे ? त्यांना अर्वाचीनांचे सर्व शोध, प्रयोग, प्रयोगशाळा वगैरे माहिती होत्या कीं काय ? तर त्यांना हें अर्वाचीनांचें कांहींहि माहिती नव्हतें. त्यांची सिद्धान्त काढण्याची पद्धति निराळी होती, अर्वाचीनांची निराळी आहे. कोणत्याही ज्ञानमार्गानें गेलें तरी सिद्धान्त एकच यावयाचा.

प्राचीनांचें ज्ञान व अर्वाचीनांचें ज्ञान दोन निरनिराळ्या मार्गांनीं चाललेलें दिसतें. पण दोन्ही मार्गांनीं आलेले सिद्धान्त मिळतात. हे दोन्ही

मार्ग समांतर ठेवून आपण पाहिलें कीं समजतील. हे दोन मार्ग कोणते त्यांना प्रथम इंग्रजी नांवें देऊन मागाहून आपलीं देऊं. एक Analytical process of knowledge व दुसरी Synthetical process of knowledge; यांना विभजनात्मक व संयोजनात्मक; विघटनात्मक व एकीकरणात्मक अशीं नांवें देतां येतील. दोन्ही मार्ग समांतर चालणारे आहेत. दोहींनीं ज्ञानाची पूर्णता होते. हे ज्ञानग्रहणाचे दोन्ही अभियुक्त मार्ग आहेत. त्यांतला एक मार्ग प्राचीनांनीं घेतला व दुसरा अर्वाचीनांनीं घेतला. हे दोन्ही मार्ग एकमेकांना अत्यंत पोषक पण अगदीं स्वतंत्र आहेत. याचा प्रत्यय मानवाला आपल्या शरीरांतच येतो. मानवदेह हा ज्ञानसिद्धीला पात्र असा देह आहे. यांत ज्ञानाचीं सर्व उपकरणें सिद्ध आहेत. पंचज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें व अकरावें मन असा हा गट या देहांत आहे. या सर्वांनीं मिळून ज्ञानसिद्धी होते. यांत डोळे, कान, नाक, जिव्हा आणि त्वचा हीं जीं पांच ज्ञानकरणें या देहांत आहेत त्यांचाच विचार केला कीं ज्ञानग्रहणाच्या दोन दृष्टि कशा आहेत तें तेव्हांच समजेल. हीं जीं पांच ज्ञानग्रहणाचीं इंद्रियें त्यांना अनुसरून त्यांचे पांच विषय आहेत त्यांचा ' रूपं शब्दो गंध रसः स्पर्शाश्च विषया अमी ' असा विन्यास अमरानें केला आहे. डोळ्याचा विषय रूप, कानाचा विषय शब्द, नाकाचा विषय गंध, जिव्हेचा विषय रस आणि त्वचेचा विषय स्पर्श होय. बाहेरच्या कोणत्याहि पदार्थांचें इंद्रियद्वारां मापन होत असतें. या पांचांत खालचीं जीं नाक, जिव्हा व त्वचा हीं तींन इंद्रियें तीं निकृष्ट प्रकारचीं आहेत; वरचीं दोन डोळे व कान हीं प्रकृष्ट प्रकारचीं आहेत. जनावरांत हीं पंच ज्ञानेंद्रियें आहेत. तद्द्वारा तेंहि ज्ञान ग्रहण करतें. त्या ज्ञानानें त्याला आपला शत्रु कोण, आपलें अन्न काढून घेणारा कोण हें समजतें. या खालच्या तीन इंद्रियांचें कार्य पशूंत अधिक चालतें; वरच्या दोन प्रकृष्ट इंद्रियांचें तितकें चालत नाहीं. एखाद्या बैलापुढें व कुत्र्यापुढें गुलाबाचें फूल किंवा ग्रामोफोन ठेवला तर आपल्याला ज्या तऱ्हेनें कळेल त्याप्रमाणें

त्यांना समजणार नाहीं. त्यांना त्या वस्तूंचा वास वा ध्वनि समजणार नाहीं. रूप व रंगहि समजणार नाहीं. बैल त्या ग्रामोफोनला चाटील हुंगील व शेवटीं हुंदाडून टाकील. तीच स्थिति लहान मुलांची असते. त्यालाही फुलाचे रंग रूप कळणार नाहीं. स्पर्शानें तें पाहील व शेवटीं तोंडांत घालील. पशूचीं व लहान मुलाचीं डोळे व कान हीं दोन इंद्रियें ज्ञानग्रहणाला प्रगल्भ झालेलीं नसतात. या वरच्या दोन्ही इंद्रियांचा उपयोग मोठ्यांनाच होतो. या दोहींनींच ज्ञान पूर्णतेला जाते. या दोन इंद्रियांची तुलना केली कीं ज्ञानाचे दोन मार्ग कळतील. आपण कानानें ऐकतों, डोळ्यांनीं पाहातों. कानाचा ऐकण्याचा हा analytical मार्ग व डोळ्यांनीं पाहण्याचा हा synthetical मार्ग होय. दोहींत उत्तर ध्रुव व दक्षिण ध्रुव यांच्या इतकें अंतर आहे. दोहींपैकीं एक इंद्रिय जर कमी झालें तरी ज्ञान होणार नाहीं. दोहोंत तारतम्यानें कानापेक्षां डोळे श्रेष्ठ म्हणून म्हणावयाचें. शरीरांत कान कमी होऊन त्याचें चालणार नाहीं.

आतां आपलें जें ज्ञान चाललें आहे तें analytical मार्गानें चाललें आहे. ज्या आनुपूर्वीनें माझ्या तोंडांतून ध्वनीमागून ध्वनि निघत आहेत, त्याच आनुपूर्वीनें ते आपल्या कानांत शिरत आहेत. ते तसेच विलग राहिले तरी चालणार नाहीं. हे ध्वनि लहान मुलांच्या व जनावराच्या कानीं गेले तरी त्यांना ज्ञान होणार नाहीं, तें आपल्या सारख्या मोठ्यांनाच होईल. असें कां ? तर आंत गेलेल्या सर्व शब्दांचें Synthesis झालें पाहिजे. तें झालें नाहीं तर ज्ञान होणार नाहीं. हें Synthesis कसें व्हावें लागतें याला एक दृष्टान्त देतों. समजा, मी आग्र्याहून ताजमहाल पाहून आलों व त्याचें ज्ञान मी आपणास देऊं लागलों. ताजमहाल ही एकमाद्वितीयं वस्तु आहे. आपणास तिचें ज्ञान देण्याकरितां मला ती फोडावी लागेल. तिचे भागोपभाग करून मग प्रत्येकाचें वर्णन करावें लागेल. हें सर्व वर्णन आपण तासभर ऐकलें तरी त्याची तुम्ही आपल्या अंतरिंद्रियांत रचना केल्यावांचून तुम्हांला तो सम-

जणार नाहीं. ऐकलें तरी ती रचना बरोबर होईल कीं नाहीं सांगवत नाहीं. निदान एकाची रचना दुसऱ्याशीं नक्की जमणार नाहीं. ही सर्व पद्धति पृथक्करणाची झाली. असें पृथक्करण न करितां जर एखादें झेपेलिन विमान आणून त्यांतून तुम्हां सर्वांना ताजमहालापुढें नेलें व सांगितलें कीं पहा हा ताजमहाल ! तर एका दृष्टिपाताबरोबर तुम्हांला त्याचें साकल्यानें एकदम ज्ञान होईल. यांत साकल्यानें म्हणजे ब्राह्मी दृष्टीनें ज्ञान प्राप्त होतें. यांत दर्शनानें ज्ञानाची पूर्णता झालेली दिसेल; ती श्रवणानें होणार नाहीं. श्रवणांत पुन्हा दोष असतात तेहि आमच्या शास्त्रकारांनीं दाखविले आहेत. ते दोष होतां कामा नयेत. बोलतांना दोन शब्द सान्निध्यानें यावे लागतात; असान्निधि उपयोगी नाहीं. रामा, घोड्याला पाणी पाज. हें वाक्य एकदम उच्चारलें तरच त्याचा अर्थ कळेल. नाहीं तर आज रामा शब्द उच्चारला, आठवड्यानें घोड्याला हा शब्द उच्चारला, एक वर्षानें पाणी शब्द उच्चारला व दोन वर्षांनीं पाज हा शब्द उच्चारला तर त्यांत असन्निधि दोष होऊन त्या वाक्याचा कांहीं अर्थ होणार नाहीं. म्हणून ज्ञान हें एकरूपांत, Synthesis मध्यें पहावयाचें असतें. नुसत्या ऐकण्यांत ज्ञानाची पूर्णता नाहीं. आपल्या जुन्या ग्रंथांची जी परिभाषा आहे ती आपल्यांतील शास्त्रीपंडितांना कळत नाहीं म्हणून त्यांना ती नीट समजून सांगतां येत नाहीं. काल अध्यक्ष म्हणाले कीं ब्रह्मसूत्रावरील भाष्याचें लेलेशास्त्र्यांचें व बापटशास्त्र्यांचें भाषांतर आणून मीं वाचलें पण मला कांहीं तें समजेना. डॉ. थीबोचा ब्रह्मसूत्रावरील ग्रंथ जेव्हां मीं वाचला तेव्हां मला तीं समजलीं. याचा अर्थ ज्ञानांत दृष्टि खोल गेली पाहिजे. ज्ञानाची पाहण्यांत पूर्णता हें प्राचीनांप्रमाणें अर्वाचीनांनाहिं समजत नाहीं. प्राचीनांची व अर्वाचीनांची स्थिति सारखीच. प्रसिद्ध जर्मन पंडित गोल्डस्टूकर घ्या. याहि लोकांना सर्वच गोष्टी कळतात असें नाहीं. मानवकल्पसूत्र त्याच्या हातांत आलें. या मानवकल्पसूत्रावर कुमारिल भट्टाची टीका आहे. हा ग्रंथ त्यानें प्रत्येक पानाचा फोटो घेऊन छापला आहे. या ग्रंथाला

त्यानें खूप मोठी प्रस्तावना लिहिली आहे. त्यांत वैदिक वाङ्मयांतील नाना प्रश्नांबद्दल त्यानें चर्चा केली आहे. त्यांत एक प्रश्न असा आहे कीं वैदिक ऋषि आपल्याला मंत्रद्रष्टे म्हणवितात हा काय प्रकार आहे? हा प्रश्न सोडविण्याचा त्यानें त्या प्रस्तावनेंत प्रयत्न केला आहे. त्यानें त्याचें उत्तर असें दिलें आहे कीं, वेदकालीं लिपी असावी, ते लोक पोथ्या लिहीत व त्या वाचीत; या वरून ते आपणास मंत्रद्रष्टे म्हणवीत. हें जर त्याचें म्हणणें खरें मानलें तर आज आपणहि मंत्रद्रष्टे होऊं; कारण आज आपणहि पोथ्या वाचतों. हें त्याचें argument आपल्याला पोरकट वाटतें. हल्लीं आपण नवीन शिकलेले तसेंच बोलतों; कारण आपणहि त्यांच्याच ओंजळीनें पाणी पिणारे. युरोपी तर बोलून चालून परकीय पण वेदांतील मंत्रद्रष्टे हे आपले बापजादे होते. तो द्रष्टेपणा आपण समजून घेऊन या पाश्चात्य पंडितांच्या गळीं उतरविला पाहिजे; आपण अध्यात्म-दृष्टीनें तो पाहिला पाहिजे. वेदांतील मंत्रद्रष्टा मी मंत्रांतील ज्ञान साक्षात्कारिलें आहे असें म्हणतो. Positive रीतीनें म्हणजे पंचज्ञानेंद्रियांनीं जशी एखादी गोष्ट आपणास गोचर होते तसा प्रज्ञाचक्षूनें हा मंत्रद्रष्टा तत्त्वावलोकन केलें आहे असें बोलतो.

वेदांत नासदीयसूक्त या नांवानें एक सूक्त आहे. हें सप्तऋचात्मक आहे. त्या सातऋचांत १५० शब्द आहेत. पण हे अत्यंत खोल अर्थाचे शब्द आहेत. यांत तो मंत्रद्रष्टा प्रजापति ऋषि जगन्निर्मिति साक्षात् डोळ्यांनीं पहात आहे कीं काय असें त्यांतील वर्णनावरून वाटतें. तत्त्वावलोकन करणें हेंच खरें ज्ञान. अर्वाचीन काळींहि हा द्रष्टेपणा दाखवितां येण्यासारखा आहे. अर्वाचीन काळचा मोठा तत्त्वद्रष्टा म्हणजे सर ऐझाक न्यूटन. याचें उदाहरण घेण्यासारखें आहे. एक दिवस तो ॲपलच्या झाडाखालीं बसला होता. त्यानें त्या झाडावरून फळ पडतांना पाहिलें. आपणहि हजारों वेळां फळें पडतांना पाहतों. पण न्यूटननें नुसतेंच फळ पडतांना पाहिलें नाहीं तर तें पडतांना त्याला त्यांत गुरुत्वाकर्षणाचा

नियम ( Law of Gravitation ) दिसला. हेंच तत्त्वदर्शन होय. आइनस्टाइननें जुन्यांच्या Three dimensions मधील चुका दाखवून आपलें Fourth dimension काढलें. हाहि द्रष्टाच होय.

आपण जो मूळ विषय घेतला आहे त्यांत षड्दर्शनें, Six schools of philosophy येतात. हीं सहा दर्शनें म्हणजे सांख्य, योग, वैशेषिक, न्याय, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा किंवा वेदान्त हीं होत. यांना दर्शनें म्हणतात. या ज्ञानाचें त्यांना तत्त्वदर्शन झालेलें आहे. सांख्य हे ज्ञान पाहिलें असें म्हणतात. ही दर्शनाची कल्पना भगवद्गीतेंतहि आली आहे. भगवद्गीता ही उपनिषदासारखीच आहे. तिची रचनाहि उपनिषदासारखी आहे. उपनिषत् शब्दाचा अर्थ काय ? तर उप=जवळ निषद्=बसणारा. उपनिषत् म्हणजे गुरूनें जवळ बसणाऱ्या शिष्याला सांगितलेलें ज्ञान. गीता गुरुशिष्यसंवादांत झालेली. तींत दर्शनकारांप्रमाणें सूत्ररचना नाहीं. गीतेंत आलेले गुरुशिष्य लहान नाहींत, फार मोठे आहेत. सांगणारा योगेश्वर श्रीकृष्ण व ऐकणारा योगी अर्जुन. भगवद्गीतेच्या श्लोकांतच तत्त्वें गोंविलेलीं नाहींत तर तीं तिच्या रचनेंतहि आहेत. पहिल्या अध्यायापासून दहाव्या अध्यायापर्यंत भगवंतांनीं शेंकडों श्लोक व ज्ञान सांगितलें पण अर्जुनाचें समाधान झालें नाहीं. शेवटीं तो भगवंताला तें ज्ञान ' दाखव ' म्हणाला. ज्ञान दाखविल्यावांचून त्याची पूर्णता नाहीं. भगवंतांनीं अर्जुनाला तें दाखविलें. तें त्याच्या चर्मचक्षूंना दाखविलें नाहीं. तें पाहण्याचें इंद्रिय त्याला दिलें. दिव्य दृष्टि किंवा चक्षु त्याला दिले म्हणजे त्याचे बुद्धीचे चक्षु प्रगल्भ केले. असे बुद्धीचे चक्षु प्रगल्भ करून मग पहा म्हणून म्हटलें. त्यांत त्याला विश्वरूप दिसलें. भगवंतांनीं त्याला काय पाहिलेंस म्हणून विचारलें. तर अर्जुनानें जें साकल्यानें एकदम विश्वरूप पाहिलें होतें त्याचें वर्णन करण्यांत त्याला पुनः पृथक्करण ( Analysis ) करावें लागलें. दर्शनांत केव्हांहि वस्तूचें ज्ञान पूर्णपणें होतें. म्हणूनच तत्त्वज्ञानाच्या पूर्णतेकरितां सहा दर्शनें आलीं.

या साही दर्शनांच्या दृष्टीनें वैदिक धर्माचा आपणास विचार करण्याचा आहे. त्याच बरोबर जगताच्या घटनेची उत्क्रांति पहावयाची आहे. या साही दर्शनांनीं मिळून एकच एक रचना झालेली आहे. किंबहुना हीं साही दर्शनें एकाच मूल विश्वपुरुषाचीं सहा अंगें आहेत. किंबहुना अनेक रंगांच्या फुलांचा एकत्रित गुच्छ बनवावा त्याप्रमाणें या साही दर्शनांतील ज्ञान एकत्र केलें कीं ती निरनिराळ्या अंगांची पण एकच रचना दिसणार आहे. पुढें उत्क्रांति सांगतांना या साही दर्शनांचा एकापुढें एक विकास कसा होत गेला तें आपणास पहावयाचें आहे.

युरोपीय शास्त्रांतहि ज्ञानाचे दोन मार्ग सांगितले आहेत. ते a priori व a posteriori होत. हे दोन्ही त्यांच्या तर्कशास्त्रांत ( Logic ) येतात. आपल्याकडे हि गोतमाचें न्यायशास्त्र आहे. त्यांत त्यानें पांच अवयववाक्यांत न्यायसंगति दाखविली आहे. आरिस्टॉटलनें आपल्या लॉजिकमध्यें ही न्यायसंगति ( syllogism ) तीन वाक्यांत सांगितली आहे. गोतमानें जे दोन अवयव आरिस्टॉटलपेक्षां अधिक सांगितले ते फालतु आहेत कीं काय ? तर ते तसे फालतु आलेले नाहींत. प्राचीन दर्शनकार उगीच एक शब्द ज्यास्त बोलत नाहींत. न्यायशास्त्राला जरूर तितकेच शब्द ते सांगतात. गोतमाच्या न्यायांत स्वार्थ आणि परार्थ मिळून पंचावयवी अनुमानवाक्य बनतें. आरिस्टॉटल हा केवळ व्यवहारी असल्यामुळें त्यानें त्र्यवयवी वाक्य घेतलें. यांत synthesis व analysis कसें असतें तें आपण पाहूं. समजा, बाप व मुलगा रस्त्यानें चालतांना समोर पर्वतावर त्यांना धूर दिसला. मुलगा त्याला अनुलक्षून ‘ पर्वतो धूमवान् ’ म्हणेल. बाप म्हणेल नाहीं. तो ‘ पर्वतो वह्निमान् ’ म्हणेल. येथें गांवढळ अज्ञानी असेल तो धूमवान्च बरोबर असें म्हणेल. पण जो ज्ञाता आहे तो म्हणेल कीं वह्निमान् हेंच बरोबर आहे. कारण ‘ यत्र यत्र धूमः तत्र तत्र वन्हिः ’ असें त्याला धुरावरून अनुमानानें अग्नीचें ज्ञान होईल. येथें प्रतिज्ञा, हेतु, उदाहरण या तीन अवयवांबरोबर उप-

नय व निगमन हे दोन आले. या पंचावयवी वाक्यांत सर्व व्यापार व व्यवहार एक झाले. स्वार्थ-परार्थ ‘ induction-deduction ’ हीं दोन निरनिराळीं नाहींत तर तीं एकाच ज्ञानाचीं दोन अंगें आहेत. कांहीं तत्त्वज्ञ त्यांतील एक घेतात व त्याचे जोरावर दुसऱ्याचें खंडन करितात. वास्तविक induction व deduction दोन्हीं घेऊन ज्ञान पूर्णतेला जातें. आरिस्टॉटलनें प्राचीनकाळीं deductive Logic काढलें. तें शास्त्राच्या दृष्टीनें बरोबर होतें. अर्वाचीन काळीं बेकननें induction च्या जोरावर Novum organum काढून त्यांत आरिस्टॉटलला induction ठाऊक नव्हतें असें ठरविलें. Induction म्हणजे काय तर आपल्या अनुभवांत किंवा पाहण्यांत जें येईल तें लिहून ठेवावयाचें. अनुभवांत तें कसें आलें वगैरे पहावयाचेंच नाहीं. नुसत्या induction चें शास्त्र बनत नाहीं. दुसऱ्याला तें सांगण्यांत त्याचें शास्त्र बनतें. प्राचीन लोकांचीं त्यांचें शरीर हीच प्रयोगशाळा होती. ते दहापांच उदाहरणें पाहून विश्वव्यापक सिद्धान्त काढीत. तो काढण्याची अक्कल त्यांना होती. नाहीं तर लाखों उदाहरणें पाहूनहि जर तो काढतां आला नाहीं तर त्या ज्ञानाचा उपयोग काय ? आपण आरिस्टॉटलच्याच न्यायसंगतीचें उदाहरण घेऊं. तो म्हणतो, All men are mortal, Socrates is man ∴ Socrates is mortal. येथें All men हा त्याचा महत्पक्ष किंवा प्रतिज्ञा आहे. कोणी induction वाला म्हणेल कीं तुम्हीं all men असें कसें म्हणूं शकतां? तुम्हीं काय सर्वकाळचीं, सर्व स्थळचीं, सर्व माणसें पाहिलीं आहेत ? आम्ही म्हणूं नाहीं, तीं पहाणें शक्यहि नाहीं. मग असा सिद्धान्त कसा मांडतां ? तर आम्हीं आमच्या आयुष्यांत दहा पांच माणसें मेलेलीं पाहून हा विश्वव्यापक सिद्धान्त मांडला. अशीं दहा पांच उदाहरणें घेऊन सिद्धान्त मांडतां येतो. तो मांडण्याचें सामर्थ्य पाहिजे. यालाच ब्राह्मी दृष्टि लागते. असा सिद्धान्त जर मांडतां आला नाहीं तर ज्ञानाची प्रगतिच होणार नाहीं. आपण जनावरांसारखे राहूं. दहा पांच उदाहरणें पाहणें

इतकाच अनुभव पुरे. या अनुभवानें मी विश्वव्यापक सिद्धान्त ‘ सर्व माणसें मर्त्य आहेत ’ हा आपल्यापुढें ठेवला. आतां आपण हजारों माणसांनीं तो आपआपल्या अनुभवाच्या कसाला लावून त्याचें विश्वव्यापकत्व सिद्ध करीत जावयाचें व तो पुष्टीकृत करावयाचा. हजारों उदाहरणें पाहूनहि जर तो सांगतां आला नाहीं तर तें ज्ञान पूर्ण नाहीं. Induction & Deduction हीं एकमेकांच्या हातांत हात घालून चाललीं पाहिजेत. आपल्या प्राचीनांची दृष्टि ब्राह्मी स्वरूपाची ( Deductive ) होती, आरिस्टॉटलचीहि तीच होती.

येथें आरिस्टॉटलनें सॉक्रेटिसाचें उदाहरण देऊन न्यायसंगति कां लाविली याचें आतां थोडें विवरण करून सांगणें जरूर आहे. विद्यार्थ्यांना तें कोणी सांगत नाहीं. आरिस्टॉटलनें हेंच उदाहरण घेण्याला कारण आहे. आरिस्टॉटलचा गुरु प्लेटो व प्लेटोचा गुरु सॉक्रेटिस. असे सॉक्रेटिस, प्लेटो व आरिस्टॉटल हे ग्रीकतत्त्वज्ञानांतील तीन प्रवर आहेत. हे तिन्ही ज्ञानाचे पुरुष आहेत. आरिस्टॉटल व प्लेटो यांत भेद आहे. एकाचें तत्त्वज्ञान Organisation ला अत्यंत उपकारक तर दुसऱ्याचें असलेली घटना मोडण्याच्या उपयोगी. हल्लींचा रोमन लॉ वगैरे सर्व आरिस्टॉटलवर उभारलेला आहे. सॉक्रेटिसाचें तत्त्वज्ञान त्याला मान्य नव्हतें. त्याला वैयक्तिक आत्म्याचें अमरत्व मान्य नव्हतें. म्हणून असा सॉक्रेटिसाचाहि अमर आत्मा त्याला मान्य नव्हता. त्यानें त्यावर एखादा ग्रंथ लिहिला नाहीं. पण आपल्या न्यायसंगतींत त्याचें मुद्दाम उदाहरण देऊन ही गोष्ट त्यानें सहज सिद्ध केली.

Analysis and Synthesis या दोहींनीं ज्ञान पूर्णतेला जातें. कान व डोळे एकत्र झाले तरच ज्ञान मानवाला पूर्ण होईल. त्याचप्रमाणें a priori and a posteriori यांचे संबंध आहेत. हल्लींचें सर्व सायन्स जें आहे तें a posteriori प्रमाणें चालणारें आहे. तें अनुमानांत जात नाहीं. a priori वर चालणारे तरी काय करतात ? ते जें निगमन आलें असेल

तेंच आदिकारण सुरवातीला घेऊन मग पुढें जातात. युरोपांतहि कांहीं तत्त्ववेत्ते a priori वाले तर कांहीं a posteriori वाले आहेत. दोघे एकमेकांवर टीका करतात पण असें करण्याचें वास्तविक त्यांना कारण नाहीं. या दोन मार्गांतील भेद वास्तविकरीत्या न कळल्यामुळें शंका घेतात. पण त्यांचें वरीलप्रमाणें निरसन होऊन दोहींचें वास्तविक रूप कळल्यावर सिद्धान्त बरोबर मांडतां येतो. परमेश्वरानें ही सृष्टि निर्माण कां केली, कशी केली याचा a priori process नें विचार केला तर आदिकारण मानूनच पुढें चालावें लागतें. हें कारण स्वयंभू असतें. तें वाटलें तर गृहीत सत्य माना पण घ्या. प्राचीन ब्राह्मीदृष्टीचे महात्मे ब्रह्म हें आदिकारण मानतात. जगतावरूनच त्याचा विचार करावयाचा असल्यामुळें जें जगत् नाहीं तें तें असें म्हणावें लागतें. उपनिषदांतून, वेदांतून या ब्रह्माचीं वर्णनें सर्व negative रीतीनें आलेलीं आहेत. जगत् हालचाल करणारें म्हणून ब्रह्म अजगत्. या रीतीनें त्याचें वर्णन केलेलें आहे. प्राचीनांनीं हा ब्रह्माचा खुंट सुरवातीला पुरला. त्याला ते नांव देतात पण त्यांनाच त्याबद्दल प्रश्न येतो, याबद्दल ते विचार करूं लागले कीं त्यांनाच वाटूं लागतें कीं हा खुंट तरी बरोबर आहे का ? या कल्पना तुम्हांला realise करून कशा दाखवावयाच्या ? मूळारंभीं कांहीं होतें कां नव्हतें ? जगत् कांहीं मूळारंभीं नव्हतें. म्हणून ' असद्वा इदमग्रआसीत् ' असें उपनिषदांनीं म्हटलें. पण पुढें शंका आली कीं जें मूळारंभीं कांहीं नव्हतें ( असत् ) त्यापासून जगत् ( सत् ) कसें झालें ? जगताचा नियम तर असतापासून सत् होत नाहीं असा आहे. हल्लींचें शास्त्रहि तेंच सांगतें. छांदोग्यांत हा पूर्वपक्ष ' कथं वा असतः सज्जायेत ' या वाक्यानें केला आहे आणि पुढें त्याचें उत्तर ' सदेव सोम्य इदमग्रआसीत् । एकमेवाद्वितीयम् । ' हे सोम्य मूळारंभीं एकमेवाद्वितीयम् सत्च होतें, त्यापासूनच हें पुढील सत् (जगत्) झालें, असें दिलें आहे. असत् जर मूळारंभीं तर त्यापासून सत् कसें झालें ? सांख्यशास्त्र हें जगताबद्दल authority मानलें जातें. तें असतापासून

वगैरे गोष्टी मानीत नाहीं. तें म्हणतें, 'नावस्तुनो वस्तुसिद्धिः' अवस्तू-पासून वस्तुसिद्धि होत नाहीं. हल्लींचें भौतिकशास्त्रहि तेंच सांगतें : Ex nihilo nihil fit = nothing comes out of nothing. हें वाक्य म्हणजे सांख्यांच्या वाक्याचें जसेंच्या तसें भाषांतर आहे. भगवद्गीताहि 'नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः' असाच सिद्धांत मांडते. हा भौतिक सिद्धांत जगताचा; त्याला 'असद्वा इदमग्रआसीत्' हें मान्य नाहीं. म्हणूनच त्यावर पूर्वपक्ष 'कथं वा असतः सज्जायेत' असा करून त्याचें उत्तर शेवटीं 'सदेव सोम्य इदमग्रआसीत्' असें दिलें.

जगत्पूर्व कांहीं नव्हतें असें नाहीं; पण त्याचें रूप समजत नाहीं. जगतापूर्वीं कांहीं तरी होतें असें अनुमान केल्यावांचून गत्यंतर नाहीं. मुलगा आहे, बाप मग न दिसला तरी तो होता असें अनुमान करणें प्राप्तच आहे. या सर्वांचें विवरण नासदीयसूक्तांत फार उत्तम रीतीनें आलें आहे. त्यांत जगतापूर्वीं काय होतें याचा विचार जगतांतील सद-सदादि द्वंद्वांच्या पलीकडे जाऊन केला आहे. त्याची सुरुवातच 'नास-दासीन्नोसदासीत्तदानीं.' तदानीं म्हणजे जगत्पूर्वकाळीं जें होतें, तें सत्हि नव्हतें व असत्हि नव्हतें. कारण ही भाषा जगतांतील आहे. तदानीं हा शब्द उच्चारतांना आपण जगत्पूर्वकाळांत किती तरी लांब आहों असें वाटूं लागतें. तें काय आहे हें जर समजत नाहीं तर त्याबद्दल 'नासदासीन्नोसदासीत्' म्हणणेंच बरोबर आहे. कारण सदसताचें द्वंद्व पुढें जगतांत प्रस्फुट झालें. जगताचे दोन भाग पडतात; एक अजीवसृष्टि, त्यांत पंचमहाभूतांतील सर्व जड पर्याय येतात. दुसरी जीवसृष्टि, यांत तीन कोटी येतात; पहिली कोटी वनस्पतीची, दुसरी प्राण्याची व तिसरी मानवाची होय. अजीवसृष्टि जीवसृष्टीच्या पूर्वीची. तिला अनुलक्षून 'नासदासीन्नोसदासीत्' आलें. पुढें जीवसृष्टीला अनुलक्षून पुढील 'न मृत्युरासीदमृतं न तर्हि' तें मृत्युहि नव्हतें व अमृत्युहि नव्हतें ही ओळ आली. कारण जीवकोटींतच मृत्यु, अमृत्यु, हिंसा,

अहिंसा वगैरे द्वंद्वें असावयाचीं. हल्लींच्या काळीं a posteriori च्या दृष्टीनें विचार केला तरीहि सृष्टीचा उलगडा होत नाहीं. गेल्या वर्षी हिंदुस्थानांत भरलेल्या सायन्स कॉन्फरन्सचा अध्यक्ष जो जीनजेम्स तो म्हणतो, इलेक्ट्रॉनच्या पलीकडे जगताचें रूप काय आहे तें आम्हांला समजत नाहीं. त्याप्रमाणें जीवसृष्टीचीहि गोष्ट आहे. प्राणिसृष्टीचा सिद्धांत असा आहे कीं, पृथ्वीवर जेव्हां पाणी निर्माण झालें, हवा वगैरे निर्माण होऊन विशिष्ट परिस्थिति निर्माण झाली तेव्हां पाण्यांत जीवप्राण्याचा मूळ जो आद्यजीवरस (protoplasm) तो निर्माण झाला. त्या जीवरसामागून पुढें वनस्पतिसृष्टि, प्राणिसृष्टी व मानवसृष्टि निर्माण झाली. ह्या जीवसृष्टीच्या निर्मितीबद्दलहि शास्त्रज्ञांत वाद आहेत. सृष्टीच्या मूळारंभीं सत् होतें कां असत् होतें याबद्दल जसे वाद तसेच जीवसृष्टीबद्दल वाद आहेत. सृष्टींत जीवापासून जीव झाला कां अजीवापासून जीव झाला असें म्हणणारे शास्त्रज्ञांत दोन पक्ष आहेत. या वादांचें स्वरूप असें आहे कीं, ते जगाच्या अंतापर्यंत असेच चालावयाचे. कोणी जीवजन्य ( Bio-genetic law ) या वादाचे पुरस्कर्ते आहेत. तर कोणी अजीवजन्य ( Abio-genetic law ) वादाचे पुरस्कर्ते आहेत. अर्वाचीन उत्क्रांतिशास्त्रज्ञ सर्व अजीवापासून जीव झाला असें म्हणणारे आहेत. आद्यजीवरसांत शास्त्रज्ञांचीं ९१।९२ काय असतील तीं सर्व तत्त्वें आहेतच. त्या सर्व तत्त्वां (elements) पासूनच आद्यजीवरस निर्माण झाला. याच्या उलट दुसरे कांहीं शास्त्रज्ञ 'नावस्तुनो वस्तुसिद्धिः' याला अनुसरून अजीवापासून जीव कसा होईल असें म्हणूं लागले. जीवापासूनच जीव व्हावयाचा तो अजीवापासून होणें शक्य नाहीं असें लॉर्ड केल्व्हिन सारखे बडे शास्त्रज्ञ म्हणूं लागले. तुमच्या जीवाचें बीज सृष्टींत कोठें तें दाखवा असें दुसरे शास्त्रज्ञ त्यांना विचारूं लागले, तेव्हां या सायंटिस्टांच्या कल्पना एकेक काय विचाराव्या, तुम्हांला त्या अरेबियन नाईटप्रमाणें वाटतील. ते म्हणतात, जीवबीजें बाहेरून मीटिऑर्सच्या द्वारां आपल्या

पृथ्वीवर आलीं; पण याला पुरावा काय? जीवबीज ज्या दुसऱ्या गोलावरून आलें तेथें तरी तें कोठून आलें हा प्रश्न शेवटीं शिल्लक राहतोच. लहानपणीं मी इंग्रजी शिकत असतां पहिले पहिले युनिव्हर्सिटींत पास झालेले लोक आम्हांला शिकवावयास असत. त्यांना जुन्या लोकांची वा जुन्या गोष्टींची चेष्टा करण्याची संवय असे. आम्हांला शिकविणारे हेडमास्तर त्यांपैकींच एक होते. ते नेहमीं 'शेषाच्या मस्तकावर पृथ्वी आहे' या आपल्या पुराणांतल्या कल्पनेची थट्टा करावयाचे व म्हणावयाचे कीं, शेषाच्या मस्तकावर पृथ्वी, मग शेष कोणावर बसला आहे? त्यांच्यापुढें जीवबीजें दुसऱ्या गोलावरून येथें आलीं ही शास्त्र या नांवाखालीं आलेली कल्पना ठेवावी म्हणजे ते काय उत्तर देतील?

सारांश, प्राचीनांत काय किंवा अर्वाचीनांत काय कोठें तरी खुंट पुरल्यावांचून ज्ञानाला सुरुवातच करतां येत नाहीं असें दिसेल. तैत्तिरीय उपनिषदानें जगदुत्क्रांति सांगतांना असा आत्म्याचा खुंट पुरला आणि मग पुढील आकाशापासून तों पुरुषापर्यंत झालेली जगताची उत्क्रांति सांगितली. त्यांनीं अध्यात्माच्या ब्राह्मीदृष्टीनें त्यांत जे पर्याय मांडले आहेत ते इतके बरोबर आहेत कीं, ते पाहतांच नवीनांनीं त्यांना नमस्कारच करावा. तैत्तिरीय उपनिषदांत आत्म्याचा खुंट पुरून 'आत्मावैइदमग्रआसित्। एकमेवाद्वितीयम्।' असें त्याचें वर्णनहि करून टाकलें. आत्मा मूळ अव्यक्त, नित्य वगैरे जगतांत जे नाहींत ते गुण त्याच्यावर लादले. अशा त्या आत्म्यापासून पुढें जगताचा विस्तार झाला. त्याचे पर्याय 'तस्माद्वाएतस्मादात्मन आकाशः संभूतः आकाशाद्वायुः वायोरग्निः अग्नेरापः अभ्द्यः पृथ्वी पृथिव्या ओषधयः ओषधीभ्योऽन्नम् अन्नात्पुरुषः।' आत्म्यापासून प्रथम आकाश निर्माण झालें, आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी, पृथ्वीवर वनस्पति निर्माण झाल्या, वनस्पतीपासून अन्न व अन्नापासून शेवटीं मानव झाला, असे सांगितले आहेत. ही येथें टप्प्याटप्प्यानें उत्क्रांति मांडली आहे. या

उत्क्रांतींत प्रथम दोन भाग पडतात; एक पंचमहाभूतांपर्यंतचा अजीवसृष्टीचा व दुसरा अजीवसृष्टीनंतर जीवसृष्टीचा. या दुसऱ्या भागांत वनस्पति, अन्न आणि मानव असे तीन पर्याय आहेत. ही प्राचीन उत्क्रांति अर्वाचीन उत्क्रांतीशीं समांतर ठेवून पाहिली कीं, दोन्ही बरोबर जुळणाऱ्या दिसतील. प्रथम आपण पृथ्वीवरील जीवसृष्टींतील दोघांचेहि पर्याय घेऊन पाहूं. प्राचीनांचे पर्याय ओषधि, अन्न व पुरुष असे आहेत. अर्वाचीन वनस्पति, प्राणि व मानव असे मानतात. ओषधि व वनस्पति एकच. पुरुष व मानव जुळतोच आहे. राहिला अर्वाचीनांचा प्राण्याचा पर्याय. त्याला प्राचीनांनीं अन्न असें म्हटलें आहे. येथें अन्न शब्दाची व्याख्या काय आहे ती तेथेंच उपनिषदांत दिली आहे. 'अद्यते अत्तिच भूतानि तस्मादन्नं तदुच्यते' जें खाल्लें जातें व जें ( आत्मसदृश ) भूतांना खातें तें अन्न अशी दुअर्जी ही व्याख्या आहे. अन्न हा शब्द अद्=खाणें या धातूपासून बनला आहे. जें खातें व खाल्लें जातें अशी कर्तरि ( active ) व कर्मणी ( passive ) रूपांत येथें वाक्यरचना आहे. वनस्पति प्राण्यांकडून वगैरे खाल्ल्या जातात; पण त्या खातात का ? तर त्या माती खातात, पाणी पितात, सूर्यकिरण खातात; असें फार तर अलंकारिक रीत्या म्हणतां येईल, त्या पंचमहाभूतांवर राहतात. त्या कांहीं दुसऱ्या वनस्पतीला किंवा प्राण्याला खात नाहींत. मग खाल्लें जातें व खातें ही व्याख्या कोणाला लागेल तर प्राणिवर्गालाच लागेल. कारण तो आत्मसदृश दुसऱ्या प्राण्याला खातो व दुसऱ्या प्राण्याकडून खाल्ला जातो. म्हणून अन्न ही उपनिषदांतील संज्ञा प्राण्यालाच लागून आहे. अन्न म्हणजेच प्राणि. असे हे पृथ्वीवरील प्राचीन तिन्ही पर्याय अर्वाचीन सायन्सच्या पर्यायांशीं बरोबर जुळतात. पंचमहाभूतांपासून पुढें जी सृष्टि झाली त्या सर्वांच्या मुळाशीं आत्मा हा मूल कारण आहे. हा कळला नाहीं म्हणाल तरी तुम्हीं तो गृहीतसत्य म्हणून घेतला पाहिजे. एकदां तुम्हीं आत्मा मानला तर पुढें आकाशादि सृष्टि कशी झाली तें सांगतां येईल. आत्माच तुम्हीं मानला

नाहीं तर आम्ही सृष्ट्युत्क्रांति तुम्हांला कशी सांगणार ? पण अशा वेळीं आम्हीहि तुम्हांला तुमच्या प्रत्यक्ष शास्त्रांतला एक प्रश्न विचारूं; त्याचें उत्तर तुम्हांलाहि देतां येणार नाहीं. तुम्हीहि अडलांत कीं, मग आम्हीं तरी तुमचें कां घ्यावें ? व आम्हीं जर तुमचें मानलें तर तुम्हींहि आमचें हें आत्म्याचें गृहीतसत्य मानलें पाहिजे. तुमचें अगदीं positive ( प्रत्यक्ष ) science (शास्त्र) जें युक्लिड त्यांत बिंदूची व्याख्या a point is that which has no magnitude मोठेपणा किंवा भरींवपणा विरहित तो बिंदु अशी केली आहे. अशी magnitudeless point ची व्याख्या आम्हांला लहानपणीं शाळेंत समजेना; म्हणून मास्तरला विचारलें. मास्तरला तरी ती कोठें कळत होती ? त्यानें दुसऱ्या मुलास छडी आणावयास सांगितली तेव्हां मात्र आम्हांला व्याख्या तात्काळ समजली ? युक्लिडमधील बिंदूचा हा पहिला टप्पा झाला. दुसरा टप्पा line किंवा रेषेचा. तिची व्याख्या युक्लिडनें a line is length without breadth रुंदीशिवाय नुसतीच जी लांबी ती रेषा होय, अशी केली आहे. तीहि काढून दाखवितां येणार नाहीं. बिंदु व रेषा हीं दोन्हीं वाळूच्या कणांप्रमाणें आहेत; पण त्यांवर बारा बुकांची त्यानें रचना करून त्याचें शास्त्र बनविलें आहे. युक्लिडला मूळ एका बिंदूचीच जरूरी आहे. तो मानीत नाहीं म्हटलें तर तो काकुळतीला येऊन म्हणेल कीं, महाराज, हा तुम्हांला पटत नसला तरी माझ्या शास्त्राकरितां तुम्ही तो गृहीत धरा. एकदां आपण बिंदु घेतला कीं, मग तो तुम्हांला गचांड्या मारीत शेवटपर्यंत नेतो. कारण भरींवपणा विरहित बिंदु घेतला कीं, बिंदूपुढें बिंदु असे सारखे एकापुढें एक ठेवून त्याचीच लाईन बनते. कारण तीहि रुंदीविरहितच आहे. अशी लाईनला लाईन जोडली कीं कोन झाला. तिसरी लाईन जोडली कीं त्रिकोण झाला. चवथी जोडली कीं चौकोन झाला. मध्य बिंदूवर कंपासाचें एक टोंक ठेऊन दुसऱ्या टोंकानें सभोवार फिरविलें कीं वर्तुळ झालें. असें होतां होतां युक्लिडचीं पुढें बारा बुकें झालीं. असा युक्लिडच्या शास्त्रा-

करितां जर तुम्ही त्याचा Point मानता तर मग आमच्या शास्त्राच्या सुरुवातीकरितां आमचा आत्माहि माना. तो गृहित कां धराना, पण तो एकदां तुम्हीं मानलात कीं, मग पुढें आम्हीं जगदुत्क्रांति कशी झाली तें तुम्हांला त्यांतील सर्व पर्याय घेऊन बरोबर दाखवूं.

---

## व्याख्यान ३ रें

आपण अध्यात्म हा विषय चालू केला आहे. हा विषय सर्व विषयांत श्रेष्ठ आहे अशी आपली समजूत आहे. गीतेंतहि ' अध्यात्मविद्या विद्यानाम् ' सर्व विद्यांत अध्यात्मविद्याच श्रेष्ठ असें म्हटलें आहे. आपण या विषयाचा निरनिराळ्या दृष्टीनें विचार करीत आहों. हल्लीं अध्यात्माचा विचार आपण आधिभौतिकाला धरून करावयास लागतों. आधिभौतिक शास्त्रांतहि अध्यात्माकडे जाण्याचे अत्यंत प्रयत्न चालले आहेत. प्राचीनांनीं अध्यात्माचे सिद्धान्त कसे काढले तें आपण प्रथम पाहिलें पाहिजे. प्राचीनांची दृष्टि संकलनात्मक ( Synthetical ) तर अर्वाचीनांची विघटनात्मक ( Analytical ) आहे. दोन्ही दृष्टि एकमेकींना उपकारक आहेत. दोन्हीं मिळून ज्ञानाची पूर्णता आहे. दोन्ही एकमेकींवर अवलंबून आहेत. संकलनात्मक दृष्टीनें प्राचीनांनीं जी उत्क्रांति मांडली आहे ती तैत्तिरीयोपनिषदाच्या ब्रह्मानंदवल्लींत येणेंप्रमाणें दाखविली आहे:—

> तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः । आकाशाद्वायुः ।
> वायोरग्निः । अग्नेरापः । अभ्द्यःपृथ्वी । पृथिव्या ओषधयः ।
> ओषधीभ्योऽन्नम् । अन्नात्पुरुषः ।

त्या मूळ आत्म्यापासून आकाश निर्माण झालें, आकाशापासून वायु निर्माण झाला, वायूपासून अग्नि, अग्नीपासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी,

पृथ्वीपासून ओषधि, ओषधीपासून अन्न, शेवटीं अन्ना (प्राण्या) पासून पुरुष म्हणजे मानवदेह निर्माण झाला. मूळ एकमद्वितीयं, अव्यक्त जो आत्मा त्यापासून मनुष्यांपर्यंत सर्व पर्यायांची श्रेणी यांत दाखविली आहे. प्राचीन ऋषि हिमालयाच्या शिखरावर उभें राहून साकल्यानें एकदम ब्रह्मसाक्षात्कार घेऊन मग खालीं पायथ्याकडे म्हणजे मानवाकडे उतरतात. अर्वाचीन शास्त्रज्ञ तळापासून म्हणजे मानवापासून वर शिखराकडे म्हणजे ब्रह्माकडे चढतात. साकल्यानें पाहिलेलें नसल्यामुळें अर्वाचीनांच्या या खालून वर जाण्यांत नाना संशय उत्पन्न होतात. वरून खालीं येणें व खालून वर जाणें या दोन्ही पद्धति ज्ञानाला जरूर आहेत. अर्वाचीन उत्क्रांतिवादी मानवापासून सुरुवात करतात. मानव हा प्राणिकोटींत मोडणारा आहे असें ते सांगतात. पुढें मानव व प्राणी हे त्यांपलीकडील जीवजगतांत मोडणारे आहेत असेंहि ते म्हणतात. या पृथ्वीवरील जीवजगतांत ( Biological world ) वनस्पति, प्राणि व मानव असे तीन पर्याय ते मानतात. पृथ्वी ही सूर्यापासून झाली, सूर्य तेजोमेघापासून ( Nebula ) झाला; तेजोमेघ कशापासून झाले, इकडे शास्त्रज्ञांचें लक्ष जात आहे. प्राचीनांनीं सृष्टि पंचमहाभूतात्मक सांगितली. अर्वाचीन अशा पद्धतींनें बोलत नाहींत. अर्वाचीन पंचमहाभूतांना Elements मानीत नाहींत. कारण Element म्हणजे अभेद्य तत्त्व. त्यांनीं पांचांतील पाणी फोडून त्यांत दोन निरनिराळे वायु आहेत असें दाखविलें. पाणी अभेद्य नाहीं, तें फुटणारें आहे, ही गोष्ट अर्वाचीन शास्त्रज्ञांनीं सिद्ध केली. प्राचीन मूळ आत्म्यापासून आकाश ते पृथ्वीपर्यंत, व पुढें पृथ्वीवर वनस्पति, प्राणि व मानव अशी जगदुत्क्रांति मांडतात. प्राचीनांची दृष्टि अध्यात्माची. ती एका अर्थानें बरोबर आहे. अर्वाचीन अनेक मूलतत्त्वांत ( Elements ) ही उत्क्रांति सांगतात तें त्यांच्याहि दृष्टीनें बरोबर आहे. दोन्हींचे मार्ग अभियुक्त आहेत. अर्वाचीनांनीं पाणी फोडून त्यांत हायड्रोजन व ऑक्सिजन असे दोन वायु आहेत हें सिद्ध

केलें. दोन हायड्रोजनचे कण व एक ऑक्सिजनचा कण मिळून पाणी होतें. $H_2O$ असें पाण्याचें रससूत्रच आहे. अर्वाचीनांची एलेमेंट्सची कल्पना, तीहि हल्लीं शास्त्रांत नाहींशी झाली. त्यांच्या प्रयोगशाळेंत आमच्या पाण्याप्रमाणेंच त्यांचा हायड्रोजनचा व ऑक्सिजनचा कणहि फुटला. मीं लहानपणीं सायन्स शिकूं लागलों, त्या वेळीं हीं मूलतत्त्वें ७७।७८ होतीं. हल्लीं तीं ९२ पर्यंत गेलीं आहेत. मेंडेल्नीफ नांवाचा एक रशियन शास्त्रज्ञ आहे त्यानें १००० कोष्टकांचा एक नकाशा तयार केला आहे. त्यांत हल्लीं ज्ञात जीं ९२ आहेत तीं भरून पुढील हजार वर्षांत बाकीचीं घरें भरतील असा त्याखालीं शेरा मारला आहे. कारण हल्लींचें सायन्स प्रोग्रेसिव्ह आहे असें शास्त्रज्ञ म्हणतात. हल्लींच्या ९२ तत्त्वांत हें सर्व जग विभागलें आहे असें हल्लींचें शास्त्र सांगतें. माझ्या वेळीं पुण्याच्या हायस्कुलांत एक हेडमास्तर होते. ते युनिव्हर्सिटींत जे पहिले पहिले ग्रॅज्युएट्स् झाले त्यांपैकीं एक होते. ते आम्हांला सायन्स शिकवीत; ते चांगलें शिकवीत असत. त्या वेळच्या लोकांना आपल्या जुन्याची चेष्टा करण्याची संवय होती. त्यांनीं प्रसंग येतांच आपल्या पंचमहाभूतांवर तडाका मारावा; व म्हणावें कीं, काय हे जुने खुळचट अद्याप पंचमहाभूतेंच मानतात ! हल्लींचें सायन्स पहा, त्यांत हीं भूतें ( elements ) ७८ सांगितलीं आहेत ? ? मी १८९६ सालीं मॅट्रिक झालों, तों element हें अभेद्य तत्त्व आहे असें लिहून पास झालों. त्याच वर्षीं युरोपांत मोठा चमत्कार घडून आला. सर वुइल्यम् क्रुक्स व जे. जे. थॉमसन् यांनीं पूर्वींच्या शास्त्रज्ञांचा अभेद्य असा हायड्रोजन वायूचा कण फोडला. आमच्या पाण्याप्रमाणें त्यांचाहि हायड्रोजन फुटला ! तत्पूर्वीं शास्त्रज्ञांना रेडियम या नांवाची एक धातु सांपडली होती. त्या धातूवर सूर्याप्रमाणें त्यांना किरणें दिसलीं. त्यांच्या प्रखरतेच्या गुणांशाप्रमाणें त्यांनीं त्यांना आल्फा रे, बीटा रे, ( अ किरण आ किरण ) अशीं नांवें दिलीं. हे किरण काय असावेत याचा शोध सुरू झाला. अभेद्य वस्तु

या elements च्या पलीकडे आहेत असें शास्त्रज्ञांना वाटूं लागलें. सायन्सपुढें हा जो नवीन प्रदेश आला तो विद्युत्सृष्टीचा होय. यांतहि त्यांना दोन तत्त्वें दिसलीं. त्यांना हायड्रोजन–ऑक्सिजनमध्येंहि हीं दोन तत्त्वें दिसलीं. त्यांना त्यांनीं इलेक्ट्रॉन व प्रोटॉन अशीं नांवें दिलीं. इलेक्ट्रॉन्स हे मध्यभागीं स्थिर असणाऱ्या प्रोटॉन भोंवतीं गरगर फिरतात. त्यांच्या निरनिराळ्या संख्येंत हीं निरनिराळीं elements बनतात. सर्व मूलतत्त्वांपलीकडे विद्युत्सृष्टि असावी अशी कल्पना त्यांना आली. हल्लीं विद्युत्चेहि निरनिराळे शोध चालले आहेत. नुकतीच आपल्या देशांत जी सायन्स कॉन्फरन्स झाली तिला अध्यक्ष म्हणून बडा विद्युच्छास्त्रज्ञ जो डॉ. रूदरफर्ड येणार होता तो मयत झाल्यामुळें डॉ. जीन जेम्स आला. डॉ. रूदरफर्डचा जन्म इलेक्ट्रॉन्सच्या म्हणजे विद्युत्परमाणूंच्या संशोधनांत गेला. इलेक्ट्रॉन हा का नुसता द्रव्यात्मक ( Material ) आहे, का द्रव्यावर होणारा नुसता चार्ज आहे, हा चार्ज म्हणजे तरी काय, याला मागें आधार काय असावा ? याबद्दल शास्त्रज्ञांना कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं. प्राचीनांनीं पृथ्वी शेषावर आहे म्हणून कल्पना केली त्याचप्रमाणें शास्त्रज्ञ इलेक्ट्रॉन्सना आधारभूत तत्त्व काय असावें याचीं अनुमानें करूं लागले. जेथें विद्युत्परमाणूचें रूप नीट कळेना तेथें त्या पलीकडच्याचें रूप काय समजणार ? त्याचें ज्ञान अनुमानानेंच होणार. तुम्ही प्रत्यक्ष किती बोलाल ? शेवटीं त्या प्रत्यक्षालाहि अनुमानापुढें साष्टांग नमस्कार घातला पाहिजे तरच ज्ञानाची प्रगति होईल. हीं शास्त्रज्ञांचीं अनुमानें म्हणजे कविकल्पना नव्हेत. सायन्समध्यें जीवविज्ञानशास्त्र ( Biology ) हें एक मोठें शास्त्र आहे. याचा जर्मन बडा शास्त्रज्ञ डॉ. औगुस्ट वाइझमान्न हा आहे. त्यानें Germplasm or The theory of Heredity या नांवाचा सर्वमान्य ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाला तो The Theory ( हीच एच उपपत्ति ) असें म्हणतो. ग्रंथ फार विद्वत्ताप्रचुर आहे. त्यानें मूळ जीवकणाच्या रूपाला Biophor

Biogen ( जीवजन्य ) अशीं नांवें दिलीं आहेत. त्यापुढें त्यानें इडान्ट पासून डिटर्मिनन्ट पर्यंत १०।१२ अनुमानेंच केलीं आहेत. यांच्या पुढील रूप मात्र तो प्रत्यक्ष टेस्टट्यूब मध्यें दाखवूं शकतो. पण त्याच्या मागचीं सर्व अनुमानेंच आहेत. .......... युक्लिडलाहि पॉइंटचीं व लाइनचीं अनुमानेंच करावीं लागलीं. पुढें कोन ( angle ) मात्र प्रत्यक्ष दिसतो. तशीं शास्त्रज्ञांनीं विद्युत्परमाणूंच्या पलीकडे ईथरची कल्पना केली. परंतु जेथें त्यांना विद्युत्परमाणूंचेंच रूप कळेना तेथें त्या पलीकडील तत्त्वाचें कसें कळणार ? तें Material or Immaterial, Ponderable or Imponderable कांहीं समजत नाहीं. त्यांनीं त्याला one, homogeneous, continuous असें म्हटलें आहे. त्यांत तेजाच्या व ध्वनीच्या लाटा चालतात. सारांश, ईथरमध्यें विद्युज्जगत्, त्यांत इलेक्ट्रॉन्स व प्रोटॉन्स असे दोन भाग, त्यांतील इलेक्ट्रान् हा चल, प्रोटॉन् स्थिर व या सर्वांला आधारभूत तत्त्व ईथर आहे असा अर्वाचीन शास्त्राचा सिद्धान्त आहे.

आमचीं पंचमहाभूतें हीं a priori म्हटलीं तर तीं a posteriori वर उभीं राहिलेलीं दिसतील. जुन्यांचा 'आत्मा' घेऊन तो तुम्ही गृहीतसत्य माना कीं त्यांचें काम झालें. मग ते ' तस्माद्वा एतस्मादात्मनः आकाशः संभूतः ' म्हणून सांगतील. मूळ आत्मा अव्यक्त म्हणून जगत् व्यक्त. जगत् नाना व व्यक्त म्हणून तो एकमद्वितीयम् अव्यक्त. असा जो आत्मा त्यापासून 'आकाशः संभूतः' म्हटलें. येथें ही वाक्यरचना पाहण्यासारखी आहे. आत्मा येथें आकाश स्वतः निर्माण करीत नाहीं, तर दिव्याबरोबर जसा प्रकाश निर्माण होतो तसें आत्म्याबरोबर आकाश निर्माण झालें. या आकाश शब्दाचा अर्थ काय ? आपलें संस्कृत वाङ्मय फार प्राचीन काळापासून चालत आलेलें. त्यांतील शब्द फार जुने. मूळ कल्पनांबरोबर ते निर्माण झालेले. त्यांवर नाना तऱ्हेचीं भाष्यें, टीका, दीपिका वगैरे फार झाल्यामळें आणि त्यांतच नाना सांप्र-

दार्थांची भर पडल्यामुळें या शब्दांची फार ओढाताण होऊन त्यांचे मूळ अर्थ अगदीं मलिन होऊन गेले आहेत. हल्लींचा कोणताहि कोश काढून त्यांत आकाश शब्दाचा अर्थ पहा; तो गगन, पोकळी अशा तऱ्हेचा केलेला दिसेल. आपण त्याचा अर्थ मूळ धात्वर्थाला धरून पाहूं. म्हणजे तो मूळ कोणत्या कल्पनेनें योजला आहे तें समजेल. आकाश हा शब्द आ+काश=प्रकाशणें, तेजणें, या दोहोंपासून बनला आहे. यांत काश शब्द मुख्य आहे. त्याला आ हा उपसर्ग लागून आकाश, प्र लागून प्रकाश असे शब्द बनतात. आ म्हणजे समंतात्, चारी बाजूनें जो काश तें आकाश व प्रकर्षानें जो काश तो प्रकाश असे त्यांचे स्पष्ट अर्थ आहेत.

मूळ तमांत जें एकमद्वितीयम् होतें तें अव्यक्त होतें. तें व्यक्तभावाला येण्याची परिस्थिति (Condition) प्रथम निर्माण झाली. ही जी परिस्थिति तेंच आकाश होय. याला दृष्टांत या हॉलमध्यें आपण दिव्याच्या प्रकाशामुळें व्यक्तत्वांत आहों. आपण पृथक्त्वानें एकमेकांचा नामनिर्देश करूं शकतों. हा दिवा जर गेला तर हें नानात्व नाहींसें होऊन निबिड अंधकारांत आपण एक होऊन जाऊं. आपण एकमेकांस ओळखूं शकणार नाहीं; आपण अव्यक्त होऊं. म्हणून तमिस्रेंत एकत्व व अव्यक्तता आहे. उजेडांत नानात्व व व्यक्तता आहे. मूळ आत्मा ‘ गूह्ळ तमांत ’ होता. त्याला व्यक्तभाव म्हणजे जगद्भाव येण्याच्या अगोदर सर्व बाजूंनीं व्यक्तता येण्यासारखी अशी आकाशाची परिस्थिति निर्माण झाली. काश समंतात् म्हणजे सर्व बाजूंनीं निर्माण होणें जरूर होतें. कारण विश्वहि सर्व बाजूंनीं प्रगट व्हावयाचें होतें. आकाशापासून पुढें वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून पाणी व पाण्यापासून पृथ्वी अशीं चार महद्भूतें निर्माण झालीं ऱ्हीं सर्व जगताचीं प्रतीकें होत. जगत् हें गतींतच चालतें; गतींतच प्रकाशादि निर्माण होतात. मूळ अव्यक्तात्मा जगद्भावांत आल्यावर तो व्यक्त झाला. त्यांत त्याला नानात्व आलें. त्या

नानात्वांत नियम दिसूं लागले. आकाशानंतर वायु निर्माण झाला. जगत् सर्व गतिमान् आहे. वायु हा शब्द वा=वहन करणें, वाहणें यापासून बनला आहे. जगत् गतिमान् असलें तरी त्याचा नियम द्वंद्वाचा आहे. 'वायुः सर्वत्रगोमहान्' वायु हा सर्व बाजूंनीं वाहणारा महान् म्हटला आहे. पण द्वंद्वाच्या नियमाप्रमाणें त्या गतींत मागेंपुढें, अधोर्ध्व अशीं द्वंद्वें निर्माण होतात. तीं पुढें दाखविलीं आहेत. वायूपासून अग्नि झाला. हेंहि जगताचें रूप. पण वायूचें गमन सर्वत्र, तर अग्नीचें गमन फक्त ऊर्ध्व चालतें. अग्नि हा शब्द अग्=जाणें, गमन करणें या धातूपासून झाला आहे. ऊर्ध्वगमन द्वंद्वाची एक कोटी झाली. त्याची प्रतियोगी कोटी अधोगमन होय. तें पुढें आपांत दाखविलें. कारण अग्नीपासून पुढें आप् म्हणजे पाणी झालें. आप्=reach, कोठेंतरी खालीं मुक्कामास जाऊन पोंचणें असा त्याचा अर्थ आहे. येथें जगताची गति संपली. यापुढचें द्वंद्व गति आणि स्थिति, चल आणि अचल यांचें. म्हणून पाण्यापासून स्थिर अशी पृथ्वी झाली. यांत पृथ्वी तेवढी स्थिर व बाकीचीं सर्व चल म्हणजे गतिमान् आहेत. जगत् हें निरनिराळ्या पर्यायांत आकाशांत निर्माण झालें. ही जगतांतील आकाशापासून पृथ्वीपर्यंत पंचमहाभूतांची मांडणी अध्यात्माला धरून प्राचीनांनीं केली आहे. त्यांना उत्क्रांति सर्वांगांनीं पूर्णपणें माहीत होती. अर्वाचीन ती एकांगी दृष्टीनें पहातात. उत्क्रांति—अपक्रांतींत जगत् नित्य चालतें. अर्वाचीन म्हणतात त्याप्रमाणें जगतांत एकसारखी प्रगति प्रगतिच नाहीं. एकदां गति शिखराला जाईपर्यंत प्रगति; पुढें गति राहिली तर ती अधोगति होईल. उत्क्रांतीबरोबर अपक्रांति घेऊन सांख्यांनीं या जगताचा पूर्ण विचार केला आहे. उत्क्रांतीला सांख्यांनीं निराळाच शब्द लाविला आहे व तो सार्थ आहे. मराठींत evolution ला उत्क्रांति हा शब्द कोणीं आणला कळत नाहीं पण तो अयोग्य आहे. उत्क्रांति शब्दाचा संस्कृतांत मूळ अर्थ मरण असा आहे. आपण जगणें, जिवटपणाच्या गुणानें अधिकाधिक उन्नत रीतीनें जगणें, अशा अर्थानें हा उत्क्रांति

शब्द वापरतों. सांख्यांचा गुणविकास हा शब्द अत्यंत अर्थपूर्ण व योग्य असा आहे आणि त्यांनीं 'गुणागुणेषु वर्तन्ते सागरस्योर्मयोयथा' समुद्राच्या लाटांप्रमाणे गुणांतून गुण वाढत जातात असें दृष्टान्तानें सांगून या गुणविकासाची मार्मिक व्याख्या केली आहे. गुणांपासून गुण वाढतात व शेवटीं ते व्युत्क्रमानें त्यांतच विलीन होतात. सांख्य हे जगद्गुण वाढवून सांगणारे आहेत. आकाशादि पंचमहाभूतांचे गुण जर नीट कळले नाहींत तर आपणाला उत्क्रांतीचें रूपहि नीट कळणार नाहीं. मूळ जो आत्मा तो अव्यक्त, निर्गुण, निराकार आहे. तत्संबंधीं कांहीं बोलतांच येणार नाहीं. त्यापासून पुढें आकाश ही परिस्थिति (condition) व्यक्तत्वाची निर्माण झाली. त्या आकाशाचा गुण सांगतां येत नाहीं. आपल्याकडील महान् पदार्थविज्ञानशास्त्री म्हणजे प्राचीन वैशेषिक ते आकाशाला कोणताच गुण लावीत नाहींत. ते वायूपासून पृथ्वीपर्यंत चार भूतांना एकेक वाढते गुण देतात. हल्लींहि शास्त्रज्ञांना ईथरचा गुण, रंग, रूप काय तें सांगतां येत नाहीं. ते ईथरमधून खालीं इलेक्ट्रॉन्समध्यें आले कीं ज्ञात जगतांत येतात. मग ते प्रोटान् स्थिर आहे, इलेक्ट्रॉन चल आहे वगैरे गुण सांगूं लागतात. वैशेषिकांनीं आकाशाला गुण दिला नाहीं, पण त्यांच्या पुढचे कारणमीमांसक जे नैय्यायिक ते पंचमहाभूतांना धरून गुणमीमांसा करतात. ते वायूला स्पर्श, अग्नीला रूप, आपाला रस व पृथ्वीला गंध असे चार इंद्रियांना व चार भूतांना धरून गुणमीमांसा करतात. राहतां राहिला कान; त्याचा गुण त्यांनीं शब्द सांगितला व तो आकाशावर लावून दिला. पदार्थविज्ञानशास्त्री वैशेषिकांना प्रमाण-प्रमेय घेऊन सिद्धान्त पहाणाऱ्या नैय्यायिकांनीं बुडविलें. त्यांना पदार्थांची जरूर नव्हती. हेंच नैय्यायिकांचें प्रमाण प्रमेय वगैरे वेदान्तानें घेतलें व त्याची छाप या देशावर कायमची पडून वैशेषिक मागें पडलें व त्यामुळें आपल्याकडे भौतिकशास्त्रांची वाढ अजीबात खुंटली. मूळ वैशेषिकांनीं आकाशाला गुण दिला नाहीं. पुढें नैय्यायिकांनीं 'शब्दगुणमाकाशम्' म्हणून आकाशाला शब्द गुण लावला. येथें पुनः आमचे

जुने हेडमास्तर आले. ते आम्हांला ध्वनीची व प्रकाशाची उपपत्ति शिकवीत. ते म्हणत, नैय्यायिकांचें 'शब्दगुणमाकाशम्' हें चूक आहे; 'शब्दगुणोवायुः' हें खरें आहे. ते इलेक्ट्रिक बेल एका हंडींत ठेवून त्यांतील वायु काढून घेऊन ती वाजत नाहीं असें दाखवीत व म्हणत कीं, येथें आकाश आहे पण शब्दगुण कोठें आहे? नैय्यायिकांना पंचमहाभूतांना धरून गुणांची कोठेंतरी सुरवात करावयाची होती ती त्यांनीं 'शब्दगुणमाकाशम्' म्हणून केली. आकाशाला फक्त त्यांनीं एक गुण शब्दाचा दिला. पुढें वायूला शब्द, स्पर्श असे दोन गुण दिले. अग्नीला शब्द, स्पर्श, रूप असे तीन गुण दिले. आपाला किंवा पाण्याला त्यांनीं शब्द, स्पर्श, रूप व रस असे चार गुण दिले. आणि शेवटीं पृथ्वीला शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे पांच गुण देऊन 'गंधवती पृथ्वी' असें म्हणून पंचमहाभूतांना धरून ही गुणोत्क्रांति पूर्ण केली. युक्लिडमध्यें असाच गुणविकास दिसून येतो. त्याच्या बिंदूला कोणताच गुण लावतां येत नाहीं. बिंदु आहे पण तो magnitude वांचून आहे. त्यानें बिंदूला गुण दिला नाहीं. पुढें रेषा आली ती रुंदीवांचूनच आहे. पुढें जेव्हां कोन किंवा क्षेत्र आलें तेव्हां त्याला मात्र लांबीरुंदीचे गुण आले. पुढें उंची व खोली येऊन घनता आली आणि वस्तूची घटना बनली. आपली पृथ्वी हीहि एक घटना आहे. सूर्यमाला ही त्यापेक्षां मोठी घटना व अशा अनंत सूर्यमालांनीं बनणारें जें विश्व ती शेवटची घटना आहे. नैय्यायिकांनीं गुणांची उत्क्रांति सांगतांना आपल्या शास्त्राच्या सोयीकरितां 'शब्दगुणमाकाशम्' सांगितलें. वैशेषिकसूत्रांत आकाशाला गुण दिला नाहीं. या वैशेषिकावरच पुढें व्याकरणशास्त्राची उभारणी झाली आहे; ती कशी तें पुढें पाहूं. हल्लींच्या भौतिकशास्त्रांप्रमाणें वैशेषिक हे पदार्थविज्ञानशास्त्री आहेत. ते त्यांच्याप्रमाणें शुद्ध शास्त्रीय दृष्टीनें आकाशाची व्याख्या बरोबर देतात. आमच्या आकाशाप्रमाणेंच हल्लींच्या शास्त्रांत इथर येतें. तें काय आहे हें शास्त्रज्ञांना

सांगतां येत नाहीं पण त्यापासून काय होतें तें ते सांगू शकतात. आपल्याकडे दादोबाच्या व्याकरणांत आरंभींच 'शुद्ध कसे बोलावें व शुद्ध कसें लिहावें हें व्याकरण शिकल्यानें समजतें' असें म्हटलें आहे. व्याकरण काय आहे हें तो सांगत नाहीं तर त्यापासून काय होतें हें सांगतो. त्याप्रमाणेंच ही ईथरची गोष्ट आहे. अर्वाचीन शास्त्रज्ञांनीं ईथरची व्याख्या 'Pushes and pulls are exerted through the Ether' अशी केली आहे. येथें ईथरच्या योगानें काय घडून येतें तें सांगितलें आहे. ज्या आकाशाचा गुण सांगतां येत नाहीं त्याची वैशेषिकांनींहि बरोबर व्याख्या केली आहे. 'निष्क्रमणं प्रवेशनं यत् तत् आकाशस्य लिंगम्' बाहेर जाणें व आंत प्रवेश करणें हें आकाशाचें लक्षण आहे. ही वैशेषिकांची प्राचीन काळची व्याख्या. वरील इंग्रजींत दिलेली ईथरची अर्वाचीनांची व्याख्या म्हणजे या वैशेषिकांच्या संस्कृत वाक्याचें जणुं भाषांतरच आहे. निष्क्रमण व प्रवेशन म्हणजेच Pushes and Pulls होत. नैय्यायिकांना केवळ गुणांची उत्क्रांति सांगावयाची होती व ती पंचमहाभूतांना धरून सांगावयाची असल्यामुळें त्यांनीं आकाशाला एक गुण शब्दाचा दिला.

हल्लींचें सायन्स ९२ मूलतत्त्वें मानतें. त्यांची वर्गवारी केली तर आपल्याला काय दिसेल ? शास्त्राचें कामच हें कीं, सृष्टींतील समानगुणरूपांच्या वस्तु एकत्र आणून, त्यांची एक जाति कल्पून सर्व पदार्थांची याप्रमाणें वर्गवारी करावयाची. हल्लींच्या ९२ तत्त्वांची शास्त्रज्ञांनीं Solid, Liquid and Gas या तीन भागांत विभागणी केली. पृथ्वीरूप, द्रवरूप व वायुरूप या तिहींत हीं अर्वाचीन ९२ तत्त्वें विभागतां येतात. आम्ही अर्वाचीनांप्रमाणें अनेक तत्त्वांच्या तपशिलांत शिरलों नाहीं. पण त्यांची वर्गवारी शास्त्राला जरूर ती मात्र बरोबर केली. जगत् ज्या अनेक तत्त्वांत चालतें त्यांची वर्गवारी तिहींत करतां येते. आपण पंचमहाभूतांतील आकाश सोडून बाकीच्या चार तत्त्वांत ही विभागणी

केली आहे ती सकारण आहे. सर्व तत्त्वांची वर्गवारी जरी तिहींत केली तरी या तिहींचें एकमेकांत परावर्तन म्हणजे solid चें liquid मध्यें liquid चें gas मध्यें रूपांतर कशानें होतें ? तर अग्नि ही ती परिस्थिति ( Condition ) होय. बर्फ पृथ्वीरूप असतें, त्याला अग्नि लावला कीं, त्याचें पाणी होतें, अधिक अग्नि लावला कीं, त्याची वाफ बनते. तसेंच व्युत्क्रमानें अग्नि कमी करून वाफेचें बर्फ बनवतां येतें. हल्लीं ऑक्सिजन वायूचें पाणी करतां येतें व पुढें त्याच्या वड्याहि पाडतां येतात. हें सर्व परावर्तन अग्नीनें घडून येतें. हल्लींचें सर्व रसायन-शास्त्र हें Heat वर म्हणजे उष्णतेवर वा अग्नीवर चालतें. शीत किंवा Cold हा उष्णतेला धरून सापेक्ष शब्द आहे. शीताचें रसायनशास्त्र ( Chemistry ) बनलेलें नाहीं. पदार्थांचें –273′ अंशावर काय होतें तें शास्त्राला सांगतां येत नाहीं. इतक्या अंशाची शीताची कल्पनाच केलेली आहे. ती प्रत्यक्ष पाहिलेली स्थिति नाहीं; ती ब्रह्मासारखी अदृष्ट स्थिति आहे. भौतिक रसायनशास्त्र सर्व उष्णतेवर चालतें म्हणून पदार्थांचें तीन रूपांत परावर्तन ज्या अग्नीनें होतें तो अग्नि या तिहींबरोबर घेतला. म्हणून वायु ( Gas ) व पाणी ( Liquid ) यांच्या मध्यें अग्नि सांगितला व पुढें ‘ अग्नेरापः अभ्द्यःपृथ्वी ’ म्हणून तैत्तिरीय उपनिषदांत ही जडसृष्टीची उत्क्रांति प्राचीनांनीं बरोबर मांडली. अशा रीतीनें पाहिलें असतां आपलीं पंचमहाभूतें अबाधित आहेत असें दिसेल. मग तुमचीं अर्वाचीनांचीं मूलतत्त्वें ९२ असोत वा हजार होवोत. ही पंचमहाभूतांची सृष्टि झाल्यावर पुढें पृथ्वीवर वनस्पति, प्राणि ( अन्न ) व मानव अशी उत्क्रांति एकापुढें एक क्रमानें होत गेली.

अर्वाचीनांचें ईथर हें आमच्या आकाशाप्रमाणेंच आहे. आकाशाचें वर्णन ऐतरेय ब्राह्मणांत ‘ लोकोऽसि, स्वर्गोऽसि, अक्षितोऽसि, अक्षयोऽसि, अपारोऽसि ’ असें केलें आहे. याच तऱ्हेचें वर्णन अर्वाचीनहि आपल्या ईथरचें करतात. विद्युज्जगतापलीकडे ईथरची कल्पना आली

पण तेवढ्यानेंहि शास्त्रज्ञांची ज्ञानाची भूक भागली नाहीं. शेवटीं ‘ यतो-वाचो निवर्तन्ते ’ पर्यंत पोंचल्याशिवाय या मानवाला चैन पडत नाहीं. प्रसिद्ध जर्मन शास्त्रज्ञ डॉ. हेकेल् यानें जन्मभर नानातऱ्हेच्या शास्त्रांचा खोल अभ्यास केला. त्याचा ‘ Evolution of Man ’ हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्याची ईथरपलीकडे काय असावें इकडे दृष्टि लागली. ईथरच्या पलीकडे सृष्टीला कांहीं तरी आदिकारण ( Causa finalis ) असावें असें त्याला वाटूं लागलें; त्या दृष्टीनें तो विचार करूं लागला. आपण परमेश्वर मानला तर त्याबद्दलचा विचार करण्याची जबाब-दारी आपल्या अंगावर पडते; मानला नाहीं कीं, जबाबदारी कांहीं नाहीं. बर्गसाँ सृष्टीला कांहीं आदिकारण असावें हें मानीत नाहीं. तो उत्क्रांति निर्हेतुक मानतो. परंतु तींत Creative power आहे असें म्हणतो. त्याच्या पलीकडे आल्फ्रेड् रसेल् वॅलेस् जातो. त्याचा ‘ World of life : Directive Mind, Creative Force and Ultimate Purpose ’ हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. तो डार्विन्‌चा अनुयायी होता. तो सृष्टीच्या बुडाशीं हेतु मानणारा आहे. त्याचप्रमाणें डॉ. हेकेल. तो म्हणतो, ईथर हें तरी सृष्टीचें शेवटचें तत्त्व कां? तर नाहीं. त्यापलीकडे सृष्टीचें आदिकारण कांहीं तरी असावें असें तो म्हणूं लागला. असें जें आदिकारण त्यानें मानलें त्याला Prothyl ( आद्यवस्तु, आद्यतत्त्व ) हें नांव दिलें. त्याचा विश्वाचें कोडें ( Riddle of the Universe ) हा ग्रंथ सर्वमान्य आहे. त्यांत त्यानें आपल्या आद्यवस्तूचें किंवा आद्यतत्त्वाचें वर्णन केलें आहे. हेकेल्‌पूर्वींचे शास्त्रज्ञ Matter and Mind मानीत. पुढें Matter and Force आणि शेवटीं Matter and Energy म्हणूं लागले. हेकेल्‌नें ही Energy घेतली. पण नुसती वैश्विक जडशक्ति ( Cosmical Energy ) आकर्षणोत्सारण म्हणजे Pulls and Pushes घेऊन चालते. हीं नुसत्या बाह्य, जड शक्तीचीं रूपें होत. मानवाचें मन चैतन्ययुक्त आहे. त्याच्या मनांत नाना कल्पना व हेतु येतात. हे सर्व सुखदुःखाशीं

निगडित असतात. त्यांना धरून जी अन्तःशक्ति असते ती Vital Energy होय. मूळ वैश्विक जडशक्ति ( Cosmical Energy ) तीच या Vital किंवा चैतन्यशक्तींत रूपांतरित ( transform ) होते. याला धरून हेकेल्नें आपल्या आद्यवस्तूला द्रव्य-शक्ति-संवेदन ( Matter, Energy and Sensation ) या तीन रूपांनीं संबोधिलें आहे. सुखदुःखात्मक संवेदन हें मागच्या द्रव्यशक्तीशीं संबद्ध असतें. येथें नुसतीं Matter, Energy and Sensation हीं एकेकटीं निरनिराळीं तत्त्वें नाहींत, तर या तिहींनीं मिळून एकत्र बनलेली ती एक तीन पेडी वेणी आहे. येथें Matter×Energy×sensation = Substance अशी युक्त स्थिति आहे. या सर्व विवेचनाला आपले शब्द लावून पहा म्हणजे त्याचें बरोबर रूप समजेल. आम्हीहि ब्रह्माला किंवा मूळ आत्म्याला आदिवस्तुच म्हणतों. ही वस्तु सत्, चित्, आनंद या तीन रूपांनीं युक्त आहे. यांत सत् किंवा आस्तिगुणानें येथें Matter दर्शविली आहे. पण येथें नुसतें अस्तित्वच नाहीं. Matter ला Energy ची जोड द्यावयाची. 'यत्किंच जगत्यां जगत्' जगतांत जें जें सर्व तें हालचाल करणारें आहे. म्हणून सत्ला चित्ची जोड दिली. मूर्तींत गति आली. नुसतें सच्चित्हि उपयोगी नाहीं. त्याला आनंदाची म्हणजे संवेदनाची जोड दिली पाहिजे. सत्, चित्, आनंद या तिन्हीं तत्त्वांचें एकत्रीकरण केलें कीं, त्यांत मूर्ति, गति व तेज आणि द्रव्य-शक्ति-संवेदन हीं तीन तीन तत्त्वें एकत्र होऊन सच्चिदानंद हें रूप बनतें. हें रूप सर्वांच्या मूळाशीं आहे. हीच आपली आद्यवस्तु किंवा परम-वस्तु होय. हाच हेकेल्चा Prothyl किंवा Substance होय. आपण त्या वस्तूला एकं, अद्वितीयं, नित्यं, आविकार्यं, अविभक्तं वगैरे विशेषणांनीं संबोधितों; डॉ. हेकेल्नें One, Homogeneous, Continuous, Unparticled, Undivisible Substance याच सदृश अर्थाच्या विशेषणांनीं तें संबोधिलें आहे. प्राचीन एकदम ब्रह्मावर उभें राहून ही उत्क्रांति

सांगतात; अर्वाचीनांनीं खालून वर जात जात ती सांगितली. प्राचीन, अर्वाचीन निरनिराळ्या दृष्टीनें पण एकसारखेंच उत्क्रांतीचें वर्णन करतात. अशा उत्क्रांतीचें रूप काय, तिचें कार्य काय, तिचें उद्दिष्ट काय, त्यांत आपलीं षड्दर्शनें कोणत्या कोणत्या जागीं बसतात याबद्दल विवेचन उद्यांच्या प्रवचनांत करूं.

---

# व्याख्यान ४ थें

विश्वाची उत्क्रांति कोणत्या प्रकारानें झाली याचा आपण विचार करीत आहों. जगताची निर्मिति झाली कीं नाहीं याचा विचार करणें हा तर अध्यात्मशास्त्राचा विषय आहे. रामदासानेंहि 'अरे जें झालेंचि नाहीं । त्याची वार्ता पुससी कायी ।' असें म्हटलें आहे. आपण जगन्निर्मिति मानूनच पुढें चाललें पाहिजे. कारण जगत् हाच ज्ञानाचा विषय आहे. त्याची कारणपरंपरा आपण मूळाशीं जोडली पाहिजे. तें मूळ सत्य म्हणून एकदां घेतलेंत कीं, पुढें त्याची उत्क्रांति सांगणें जरूर आहे. प्राचीन व अर्वाचीन अशा दोन्ही दृष्टींनीं आपण या उत्क्रांतीचें स्वरूप पहात आहों. प्राचीनांनीं आत्म्यापासून पुरुषांपर्यंत जी उत्क्रांति दिली तींत एका पर्यायापुढें जो दुसरा पर्याय निर्माण होतो तो कोणत्या स्वरूपाचा असतो, त्याचें कार्य काय, फल काय आणि हें सर्व कशाकरितां झालें असे दोन प्रश्न उत्पन्न होतात. उत्क्रांतीचें कार्य काय हें प्रथम लक्षांत घेऊं. मग तींतील हेतु वगैरे पाहूं. अर्वाचीन पद्धतीनें पाण्यांत हायड्रोजन व ऑक्सिजन असे दोन वायु दिसतात. हायड्रोजनचे दोन कण व ऑक्सिजनचा एक कण मिळून पाणी होतें. पुढें जेव्हां हायड्रोजन फुटला तेव्हां त्यांत शास्त्रज्ञांना विद्युत्परमाणु दिसले. विद्युत्परमाणूंच्या पलीकडे त्यांना ईथरची कल्पना आली. हां जगदुत्क्रांति अर्वाचीन पद्धतीनें

मांडावयाची तर, मूळ ईथर, त्याच्या खालीं विद्युत्परमाणु, त्यांपासून पुढें अनेक मूलतत्त्वें, त्यांपासून पृथ्वी आणि त्या पृथ्वीवर वनस्पति, प्राणि व मानव अशा पर्यायांत ती सांगतां येते. हे पर्याय काय दर्शवितात तें मूळापासून जगत् कसकसें बनत आलें हें पाहिलें कीं समजेल. मूळ ईथरचें रूप सांगतां येत नाहीं. त्या पुढील पर्याय जें विद्युज्जगत् त्यांतील इलेक्ट्रॉन् व प्रोटॉन् मिळून ही सृष्टि झाली. विद्युज्जगतांतील हें द्वंद्व काय स्वरूपाचें आहे तें शास्त्र सांगतें. त्यांत स्थिर व चल असें द्वंद्व आहे. द्वंद्वांतील दोन्ही कोटी परस्परसापेक्ष असतात. येथें स्थिरावांचून चल नाहीं तर उलट चलावांचून स्थिर नाहीं. प्रोटॉन् हा मध्यभागीं स्थिर राहतो व त्याच्या भोंवतीं इलेक्ट्रॉन्स विलक्षण गतीनें फिरत असतात. विद्युज्जगतांतील स्थिर व चल हें द्वंद्वाचें तत्त्व पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या अलीकडे लक्षांत आलें. हें द्वंद्वाचें तत्त्व आपल्या प्राचीनांना फार काळा-पासून माहीत होतें म्हणून त्यांना तें आपल्या पद्धतीनें बरोबर मांडतां आलें. इतकें बरोबर कीं, त्यांत अर्वाचीनांना फरक करतां येणार नाहीं.

आपल्यांतील सांख्य हे द्वंद्वशास्त्रज्ञ आहेत. त्यांचें मूलद्वंद्व प्रकृति-पुरुष हें आहे. ‘ प्रकृतिं पुरुषं चैव विध्यनादी उभावपि ’ हा सिद्धान्त गीतेनें सांख्यांतूनच घेतला आहे. ह्या द्वंद्वांतील दोन्ही कोटी अनादि आहेत असें सांख्य म्हणतात. हल्लींच्या काळांतील डॉ. रुदरफर्ड प्रोटॉन व इलेक्ट्रॉन असेच अनादि म्हणेल. या प्रोटॉन् व इलेट्रॉनला आपण धन-विद्युत् व ऋणविद्युत् अशा संज्ञा देतों. सांख्यांनीं अध्यात्माच्या दृष्टीनें आपल्या संज्ञा फार सुंदर योजल्या आहेत. त्या प्रकृति व पुरुष या होत. हे शब्द अत्यंत अर्थपूर्ण व वस्तूचे गुणनिदर्शक असे आहेत. अर्वाचीन शास्त्रांत वस्तूला माणसांच्या नांवांवरून ज्या संज्ञा देण्यांत येतात त्यांत कांहींच अर्थ नसतो. प्राचीन शब्दांत वस्तूचें गुणकर्म बरोबर दाखविलें जातें. तथापि पुढच्या वाङ्मयांत या प्राचीन शब्दांचे अर्थ बरोबर न राहतां त्यांत पुष्कळ फरक झाले. मूळ प्रकृति हा शब्द प्र + कृति या दोन शब्दां-

पासून बनला आहे. प्रकृति म्हणजे प्रकर्षानें जी क्रिया चालते ती. प्रकृतींत हालचाल, गति, प्रकृष्ट गति दृष्टीस पडते. पुरुष म्हणजे पुरांत, देहांत शेते म्हणजे निजतो तो. अशा दृष्टीनें सांख्यांचे प्रकृति-पुरुष शब्द घेऊन ते अनुक्रमानें इलेक्ट्रॉन् व प्रोटॉन यांना लाविलें कीं नव्याजुन्या शब्दांचा व त्यांच्या अर्थांचा बरोबर मेळ बसून जाईल. या दोन तत्त्वांपासून सृष्टि पुढें कशी झाली ती अर्वाचीनांनींहि आपल्या पद्धतीनें मांडली आहे. हायड्रोजन हा सर्वांत हलका वायु आहे. तो फोडला तेव्हां त्यांत सरासरीनें १७०० इलेक्ट्रॉन्स आढळून आले; ऑक्सिजनमध्यें २५०० आढळून आले. दोन हायड्रोजनचे कण व एक ऑक्सिजनचा कण एकत्र झाले कीं त्यांपासून पाणी बनतें. परंतु हें पाणी बाष्परूप असतें, द्रवरूप नसतें. द्रवरूप होण्यास त्याचें द्व्यणुक व्हावें लागतें. तें जेव्हां त्र्यणुक होतें तेव्हां त्याचें बर्फ बनतें असे फाराडे सोसायटीचे या पाण्याबद्दल शोध आहेत. वरील द्व्यणुक व त्र्यणुक हीं भाषा आपल्या नैय्यायिकांची आहे. मूळ विद्युत्परमाणु सर्व सारखे आहेत. त्यांची विशिष्ट संख्या एकत्र झाली कीं त्याचा निराळा गुण बनतो. उत्क्रांति म्हणजे गुणविकास. १७०० विद्युत्कणांचा जो हायड्रोजन कण त्याचा गुण निराळा. २५०० चा जो ऑक्सिजन कण त्याचा गुण निराळा. दोन हायड्रोजनचे कण व एक ऑक्सिजनचा कण मिळून जें पाणी होतें त्याचा गुण निराळा. हायड्रोजन वायु एका कांचेच्या नळींत घेऊन त्याला जर मेणबत्ती लावली तर तो स्वतः जळतो, मेणबत्तीला जाळीत नाहीं; ऑक्सिजनला जर मेणबत्ती लावली तर तो मेणबत्तीला जाळतो स्वतः जळत नाहीं. आणि या दोहोंपासून होणारें जें पाणी तें स्वतः जळत नाहीं व दुसऱ्याला जाळीतहि नाहीं. जगदुत्क्रांतींत अनेक पर्याय आहेत व तद्द्वारां निरनिराळ्या गुणांचा विकास होत आहे. सृष्टींत निरनिराळीं शरीरें निरनिराळ्या गुणविकासांनीं बनलीं आहेत. उत्क्रांतीचा नियन असा आहे कीं, निराळें गुणकर्म वाढविण्यास शरीरेंहि निरनिराळीं

लागतात. जगतांतील संपूर्णपदार्थमात्रांत फक्त गुणांशभेद आहेत. असे भेद होत होत त्यांतून जाति बनते व ती मागच्यापेक्षां अगदीं भिन्न दिसते. सूर्यकिरणांत रंगाच्या सात जाति कल्पिल्या आहेत. पण त्या ज्ञानार्थ कल्पिलेल्या आहेत. दोन रंगांत मध्यंतरीं खड्डा असत नाहीं. उत्क्रांति ही अखंडित चालते; ती खंडित नसते. या सात रंगांत आपण गुणांशानें भेद पाडतों. वास्तविक त्यांत भेद नसतात. आणि पुनः या गुणविकासांत भेद गुणांशाचा असतो, जातीचा नसतो.

असे गुणांशानें भेद होतां होतां त्याची निराळी जाति बनते व त्याकरितां त्याचें रूपहि बदलतें. इलेक्ट्रॉनपेक्षां हायड्रोजनचें रूप निराळें, ऑक्सिजनचें रूप निराळें व त्यांपासून बनणाऱ्या पाण्याचें रूप तर अगदींच निराळें आहे. या जड सृष्टींतील पदार्थांपासून पुढें आद्यजीवरस (Protoplasm) बनला; तो अनेक तत्त्वांनीं मिळून बनला. त्याचें रससूत्र झेनाफ्स्की व प्रेअर यांनीं दिलें आहे. त्याला कार्बन कँपौंड म्हटलें आहे. कारण त्यांत कर्बांश फार आहे. त्यांत सल्फर वगैरे दुसरींहि अठरा वीस तत्त्वें आहेत. हल्लींचीं सर्व ९२ तत्त्वें त्यांत नाहींत. जीं अति जड तीं त्यांत नाहींत; जीं अति हलकीं तींहि नाहींत; मधलीं कांहीं आहेत. हा जो आद्यजीवरस त्याची रचना साधी नसून ती अत्यंत संश्लिष्ट ( Complex ) आहे. साधा गुण साध्या रूपांत असतो. अधिक अंशानें गुण वाढवावयाचा म्हटला कीं रूपहि निराळें लागतें. ही गोष्ट दिव्याच्या दृष्टान्तानें बरोबर समजेल. मूलांकस्थानीं (unit) एक मेणबत्तीचा प्रकाश धरला तर तो पाडण्यास पणती किंवा समई पुरेशी होईल. हीं शरीरें अगदींच साधीं असतात. त्यांतील कार्यहि बेताचेंच असतें. पण आपणाला आतां मेणबत्तीच्या शंभरपट प्रकाश पाडावयाचा आहे तर त्याकरितां समईचें रूप कसें उपयोगी पडेल ? त्याला विजेच्या दिव्याचें संश्लिष्ट रूपच पाहिजे. दुसरें वहनाचें उदाहरण घ्या. आपली बैलगाडी असते तिची रचना अगदीं साधी असते.

तिची गति तासाला एक कोस असते. येथें वहन आहे पण अगदीं मंद आहे. आपणाला आतां तासाला ६० किंवा १०० मैल पळावयाचें आहे तर साधी बैलगाडी काय कामाची ? त्याकरितां आगगाडीचें एंजिन किंवा मोटारगाडीच पाहिजे. यांची रचना फार संश्लिष्ट असते. त्यांत किती तरी चक्रें, किती तरी नळ्या, त्याची सर्व रचनाच निराळी; त्याची विद्याहि निराळी, त्याकरितां शाळाहि निराळ्या असाव्या लागतात. सारांश मूळच्या गुणापेक्षां अधिक पटीनें गुण वाढविण्यास रूपेंहि निरनिराळीं पाहिजेत.

इलेक्ट्रॉनची रचना काय आहे ती शास्त्रज्ञांना अद्याप कळत नाहीं. त्यांत मन आहे कीं नाहीं समजत नाहीं. पुढें हायड्रोजन, ऑक्सिजन, पाणी वगैरे होत होत त्यांतूनच आद्यजीव बनला. प्रथम तो एकपिंडात्मकच होता. त्याला प्रोटिस्ट असें शास्त्रज्ञांनीं नांव दिलें आहे. हा प्रोटिस्ट किंवा मूळ जीवपिंड वनस्पति होता का प्राणी होता ? याची एक गंमतीची गोष्ट आहे. हक्स्ले व टिंडाल हे दोन बडे जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनीं आपआपल्या प्रयोगशाळेंत तो निरनिराळ्या वेळीं पाहिला. एकाला तो वनस्पति म्हणून भासला तर दुसऱ्याला तो प्राणी दिसला ? गुणांशाप्रमाणें अनेकांच्या एकत्रीकरणांत रूप निराळें बनतें. अनेक विद्युत्परमाणूंनीं मिळून हायड्रोजन, ऑक्सिजन वायु झाले; दोहोंच्या संयोगांत पाणी; असें होत होत त्यांतून पुढें एकपिंडात्मक जीवशरीर निर्माण झालें. त्यांतून अनेकपिंडात्मक जीवशरीरें निर्माण होतां होतां अनेक प्रकारच्या वनस्पति निर्माण झाल्या, प्राणी निर्माण झाले. प्राण्यांत अनेक प्रकार झाले. कांहीं बिनमाकडहाडाचे, कांहीं माकडहाडाचे, कांहीं सरपटणारे, कांहीं उडणारे, कांहीं पोहणारे, कांहीं पायानें चालणारे असे होत होत शेवटीं हें मानवरूप निर्माण झालें. पाण्यांत तीन साधे कण असतात तर शेवटीं झालेल्या या मानवदेहांत अनेक परार्ध जीवपिंड असतात. हा मानवदेहरूपी प्रचंड पिंडग्राम अनेकांच्या एकत्रीकरणानें बनतो. साध्या निकृष्ट

अनेक व्यष्टींच्या एकत्रीकरणांत एक प्रकृष्ट समष्टि बनवावयाची हें उत्क्रांतीचें कार्य होय. याला आमच्या अध्यात्माच्या संज्ञा लावून ही उत्क्रांतीची परिणालिका अधिक चांगल्या तऱ्हेनें सांगतां येईल. सबंध सृष्ट्युत्क्रांतीच कशाकरितां झाली, तिचें कार्य काय वगैरे आपण नीट उलगडून पाहिलें पाहिजे. मूळ इलेक्ट्रॉनला आपण साधा निकृष्ट पुरुष म्हणूं. त्यांच्या १७०० च्या संघाला आपण विराटपुरुष हें नांव देऊं. इलेक्ट्रॉनच्या दृष्टीनें हायड्रोजन हा विराट, हायड्रोजनच्या दृष्टीनें पाणी हा विराट, पाण्याच्या दृष्टीनें वनस्पति हा विराट, वनस्पतीच्या दृष्टीनें प्राणी हा विराट, प्राण्याच्या दृष्टीनें मानवदेह हा मोठा विराट होय. हीं मानवापर्यंत एकापुढें एक विराटरूपें परमेश्वरानें निर्माण केलीं. येथें जमलेला अनेक मानवांचा समाज हाहि विराटच होय. ह्यांत एकेकट्या मानवापेक्षां गुणहि अधिक व त्याचें कार्यहि अधिक आहे. उत्क्रांतीचा हेतु असा दिसतो कीं अनेकांच्या निरनिराळ्या एकत्रीकरणांत निरनिराळा उच्चोच्च गुण बनवावयाचा.

हल्लींच्या शास्त्रांत मानवाला Anthropocentric म्हणतात. मानवाकरितांच जणुं ही सर्व उत्क्रांति चालली आहे. मानवनिर्मिति करणें हाच एक उत्क्रांतीचा हेतु दिसतो. हेकेल्चें जें प्रोटाईल किंवा आद्यतत्त्व तोच आमचा आदिपुरुष, आत्मा किंवा ब्रह्म होय. त्याचे ठिकाणीं मन कसें होतें, त्या मनांत हेतु काय होता वगैरे आपणांस पाहावयाचें आहे. जो मूळ अव्यक्त त्याचा ठाव कसा घ्यावयाचा, त्याचें रूप तरी काय सांगावयाचें ? सांगावयाचें झालें तर तें जगताच्या अपेक्षेनेंच सांगतां येईल. त्याच्या हेतूचा ठाव मानवच घेऊं शकतो. उत्क्रांतींत जी जीवसृष्टि झाली तींतील मूळ जीवपिंडांत पोषण व उत्पादन हें साधें कर्म त्याच्या जीवदेहाला धरून चाललें होतें. ही जीवसृष्टि एकपिंडात्मक निकृष्ट जीवदेहापासून तों परार्धावारी अनेक पिंड धारण करणाऱ्या प्रकृष्ट मानवापर्यंत चालली आहे. जीवशास्त्रान्वयें मानवाची व्याख्या तो पृष्ठवंशयुक्त, सस्तन व मेंदुयुक्त प्राणी अशी केली आहे. असा मानव प्राणी निर्माण होण्या-

पूर्वी मूळ पृष्ठवंश कंदरहित होता. पुढें कालांतरानें त्याला कंद फुटला. त्या कंदावर मधोमध एक चीर पडून त्याचे दोन भाग झाले. पुढें त्या दोहोंवर आणखी एकेक चीर पडून वगैरे त्याचे शेवटीं पांच भाग झाले. म्हणून मानव हा पंचविभागात्मक मस्तिष्क धारण करणारा प्राणी होय. अशी पंचविभागात्मक मस्तिष्करचना पूर्वी ज्या प्राण्यांत प्रथम झाली तो मानवाचा आदिम पितर होय. हा प्राणी म्हणजे समुद्रांत राहणारा मासा; तोच आमच्या विष्णूचा पहिला अवतार म्हटला आहे ? हे मेंदूचे मूळ पांच भाग सर्व सारखे होते. पुढें ते कमी जास्त होत होत शेवटीं मानवांत सर्वांत वरचा भाग पूर्णतेला जाऊन त्यानें आपल्या मोठेपणानें खालच्या चारी भागांना व्यापून टाकलें. या पुरोर्ध्व भागाला यूरोपी शास्त्रांत ‘ सेरेब्रम् ’ म्हणतात. या पुरोर्ध्वभागांत बुद्धि, चित्त वगैरेंच्या क्रिया चालतात; यालाच योगशास्त्रांत सहस्रदलमस्तिष्क म्हणतात. मानव निर्माण करण्याकरितां जगदुत्क्रांति चालली आहे असें म्हणण्यापेक्षां पंचविभागात्मक मस्तिष्कवान् प्राणी निर्माण करून तो पूर्णतेला नेण्याकरितां ती चालली आहे, असें म्हणणें अधिक युक्त होईल. मानवापूर्वी अनेक रूपें निर्माण होऊन मानव हें उत्क्रांतींत शेवटचें रूप निर्माण झालें. मानवापलीकडे दुसरें रूप निर्माण व्हावयाचें राहिलें नाहीं व तसें होण्याची जरूरहि नाहीं. या रूपांतच त्याला परमेश्वरभाव प्राप्त होतो.

मूळ आत्म्यानें सृष्टिरूप वृक्ष निर्माण करून त्यावर ब्रह्मफल निर्माण केलें आणि पुन: त्या फलांत त्यानें आपलें बीज ठेविलें. आत्म्यांत मूळ जगन्निर्मितीची सर्वगुणसंपन्नता ( Potentiality ) होती. आंब्याच्या कोयींत केवढी शक्ति असते ? कोय जमिनींत घातल्यावर तिला अंकुर फुटतो. कालांतरानें त्याला खांद्या, पानें, मोहोर व असंख्य फळें लागतात व त्यांत पुन: असंख्य कोयी निर्माण होतात. इतकी विलक्षण शक्ति त्या कोयींत किंवा बीजांत असते. पुढें त्या बीजाच्या शक्तीनें झाड होणें व त्यावर फळें लागणें म्हणजे त्या बीजभुत गुणांचेंच कर्मांत (actuality)

रूपांतर होय. आत्म्यांतून पुढें जी जगद्वृक्षाची वाढ होते तिची अखेर झाली म्हणजे शेवटीं अंतिमस्थानीं ब्रह्म विनटतें. मूळ जी परम वस्तु तिला प्राचीनांनीं एका बाजूनें आत्मा व दुसऱ्या बाजूनें ब्रह्म म्हटलें आहे. येथें हे दोन शब्द कां लावले ? येथें नुसतें ' अयमात्माब्रह्म ' म्हणून सुटका नाहीं. येथें मौजेकरितां हे शब्द आले नाहींत. त्यांतील वास्तविक फरक व त्यांचीं स्थानें नीट कळलीं पाहिजेत. आत्मा हा शब्द अत्=गमन करणें किंवा अन्=श्वसन करणें या धातूंपासून बनला आहे. मूळ ब्रह्माला श्वसनावरूनच अस्तित्व आलें. मानवानें स्वतःच्या श्वसनावरूनच ही कल्पना केली आहे. डेकार्टनें मानवाची व्याख्या Cogito ergo sum = I think therefore I am = मी विचार करतों म्हणून मी आहें अशी जी केली आहे ती मानवाच्या विचारप्रवणतेला धरून आहे. पण तो प्राणी आहे = Man is an Animal. या त्याच्या प्राणनकर्माला धरून दुसऱ्या एका तत्त्ववेत्यानें त्याची व्याख्या Vivo ergo sum = I breath therefore I am = मी श्वसन करीत आहें म्हणून मी आहें अशी केली आहे, ती अधिक सयुक्तिक आहे. मूळ अजगत्–जगताच्या अपेक्षेनेंच आपण हा शब्द लावतों–प्रकट होण्यास तें चालूं लागलें पाहिजे म्हणजे गतिमान् झालें पाहिजे. जगत् व परमेश्वर निराळीं नाहींत. मूळ जो परमेश्वर किंवा आत्मा तो जेव्हां चालूं लागला, तें जें त्याचें गमन, तेंच जगत् होय. स्थितीची जी गति सुरू होते तेंच जगत् होय. येथें गतीवरूनच स्थिति मापतां येतें. निर्गुणाला पुढें व्यक्त जगतांतच नांव यावयाचें. हा जो मूळ आत्मा त्यांत संपूर्ण जगत् निर्माण करण्याची शक्ति होती. त्याची Static स्थिति जाऊन तो Dynamic = गतिमान् होण्यास त्याला जगद्भावांत यावें लागलें. तो जगदुत्क्रांतींत आला. ऋतसत्याचे दोन मार्ग त्याच्या तपानें ऊर्ध्व उत्पन्न होऊन तो प्रगतीच्या मार्गाला लागला. ' ऋतं च सत्यं चाभीद्धात्तपसोऽभ्यजायत । ' यांत तो तपसा अभ्यजायत म्हणजे अत्यंत गतिमान् झाला.

येथें आत्म्याचा यज्ञ होऊन तोच जगद्भाव पावला. आंब्याच्या कोयींतून वृक्ष होतांना तो हातभर वाढल्यावर उपटून पहावा. त्याच्या खालीं तुम्हांला कोय दिसणार नाहीं, ती नाहींशी झालेली दिसेल, तिचा यज्ञ होऊन जाईल, व ती आतां अंकुरांत रूपांतरित झालेली आढळेल. येथें कोयीनें आत्मत्याग, यज्ञ (sacrifice) केला तेव्हां वृक्षाचा जन्म झाला; तसाच मूळारंभींच्या आत्म्याचा यज्ञ होऊन त्याचाच जगद्वृक्ष झाला व त्यावर ब्रह्माचें फळ विनटलें.

हा जो आत्म्याचा यज्ञ होऊन तो वाढूं लागला, त्याची जी वृद्धि होऊं लागली तेंच ब्रह्म होय. ब्रह्म हा शब्द बृह=वृद्धि पावणें ( to grow ) यापासून झाला आहे. ब्रह्म म्हणजे वृद्धि. जगतांतील प्रत्येक पर्यायाची वृद्धि तिच्या मागच्या परीला धरून ब्रह्मच होय. इलेक्ट्रॉनच्या दृष्टीनें हायड्रोजन हें ब्रह्म, हायड्रोजनच्या दृष्टीनें पाणी हें ब्रह्म, त्यापुढें वनस्पति, प्राणी, मानव, कुटुंब, जाति, वर्ण, राष्ट्र, सर्व मानव जाति, पृथ्वी, सूर्यमाला, विश्व व शेवटीं ' स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलम् ' हे सर्व उत्तरोत्तर एकापुढें एक ब्रह्माचेच उच्चोच्च पर्याय आहेत व शेवटच्या पर्यायाला परब्रह्म संज्ञा दिली आहे. सारखी वृद्धि, अखंड वृद्धि तेंच ब्रह्म. यज्ञावांचून ही वृद्धि नाहीं. असा जो आत्म्याचा यज्ञ होऊन जगताचा वृक्ष बनला त्यावर एकदम ब्रह्मफल येत नाहीं. आंब्याच्या झाडावर त्याची वाढ होत होत शेवटीं मोहोर येऊन असंख्य फळें लागतात पण शेवटीं त्यांपैकीं कांहीं थोडे आंबे टिकूं शकतात. जगद्रूपी वृक्षावर ही सूर्यमाला झाली; त्यांत पृथ्वीचा जन्म झाला. त्या पृथ्वीवर ८४ लक्ष-हल्लींचे जीवशास्त्र ८४ कोटी म्हणेल—वनस्पतींचीं व प्राण्यांचीं नानाविध रूपें निर्माण झालीं. आद्यजीवरसापासून मानवपूर्व जीवसृष्टि होण्यास हेकेल् म्हणतो दहा कोट वर्षे लागलीं असावीं तर लियेल म्हणतो वीस कोटी वर्षे लागलीं. या शास्त्रज्ञांच्या अनुमानांत फार फरक नाहीं. फक्त दुपटीचा आहे !

आपल्याला दहा कोट वर्षेंहि पुष्कळ आहेत. या जीवोत्क्रांतींत अगदीं शेवटीं शेवटीं मानव जन्मला. त्याच्या जन्माला फार काळ झाला नाहीं. डॉ. हेकेल् म्हणतो, जीवोत्क्रांतीच्या या दहा कोट वर्षांचे जर २४ तास कल्पिले तर त्यांत मानवाला जन्मून फक्त १० मिनिटें झालीं! बाकीचा काळ दुसऱ्या जीवप्राण्यांची उत्क्रांति चालली होती. मानवांत ही उत्क्रांति समाप्त झाली. मानवरूप पूर्णत्वानें निर्माण झालें. असा उत्क्रांतींतील शेवटचा सर्वश्रेष्ठ पर्याय जो मानव तोच परमेश्वराचा हेतु जाणूं शकतो. एका दृष्टीनें आपण म्हणतो कीं परमेश्वरानें मानव निर्माण केला. तर दुसऱ्या दृष्टीनें असेंहि म्हणतां येईल कीं मानवानें परमेश्वराला निर्माण केला. मानवाच्या जवळचा त्याचा पूर्वज वानर घेतला तरी त्यांत परमेश्वराची कल्पना नाहीं. इतर प्राण्यांत तर ती नाहींच नाहीं. मानवांतच केवळ ती उत्पन्न झाली. परमेश्वराचा विचार करणें हें श्रेष्ठपणाचें लक्षण, तोच मानवाच्या अध्यात्माचा विषय झाला. मानव जो परमेश्वर निर्माण करतो तो आपल्या बुद्धींत निर्माण करतो. बुद्धि हें त्याच्या मेंदूचें ( फ्रोनेमाचें ) कार्य ( function ) आहे.

अशा बुद्धिमान् मानवानें परमेश्वरावर नाना गुण आरोपीत केले. मानव परमेश्वराचा हेतु तरी कसा जाणूं शकतो हें विचारांत घेण्यासारखें आहे. परमेश्वर नाहीं म्हणणें हा सगळ्यांत सोपा मार्ग. यांत विचार करण्याची जबाबदारी नाहीं. पण तो आहे म्हटला कीं तेथें जिज्ञासुपणानें विचार करण्याची आवश्यकता आलीच. नुसतें परमेश्वर आहे म्हणणें फार सोपें; पण तो सिद्ध करणें अत्यंत कठीण आहे. त्याचें अस्तित्व मनुष्य हा आपल्या स्वतःच्या अस्तित्वावरून जाणूं शकतो. नासदीयसूक्तांत त्यानें मूळ परमेश्वराचें अस्तित्व असेंच जाणलें आहे. 'नासदासीन्नोसदासीत्' 'न मृत्युरासीरदमृतं न तर्हि' म्हणजे मूळारंभी तें सत्‌हि नव्हतें, असत्‌हि नव्हतें, तें मृत्युहि नव्हतें, अमृत्युहि नव्हतें असें वर्णन आहे. तें सत् नव्हतें, असत् नव्हतें, मृत्यु नव्हतें, अमृतहि नव्हतें

म्हणजे मूळारंभी कांहींच नव्हतें असें म्हणणारा हा ऋषि संशयांत पडला आहे कीं काय असा हल्लींचें कांहीं पंडित त्यावर आरोप करतात. पण ऋषि संशयांत पडलेला नाहीं, त्यावर आरोप करणारेच संशयांत पडलेले दिसतात. ऋषीनें या सूक्ताच्या तिसऱ्या ऋचेंत त्याचें (मूळ परमेश्वराचें) आस्तित्व पूर्णपणें जाणल्याचें दाखविलें आहे. तो म्हणतो, ' आनीदवातं स्वधया तदेकं, तस्माद्धान्यन्न परः किंचनास ' तें एकटेंच आपल्या स्वतः-च्या महिम्यानें (धीनें) वातविरहित श्वसन करीत होतें; त्याच्या पलीकडे त्याच्यावांचून दुसरें कांहीं एक नव्हतें. येथें अन् = श्वसन करणें याचें आनीत् (It bereathed) असें रूप होतें. या अन् धातुला प्र, अप इ० उपसर्ग लागून प्राण, अपान, व्यान, उदान व समान असे पंच प्राणांना धरून निरनिराळे शब्द बनले आहेत. इंग्रजीतला animal शब्दहि या अनूपासूनच बनला आहे. परमेश्वर आहे हें हा ऋषि स्पष्ट सांगत आहे. श्वसनाच्या पलीकडे त्याला जाणण्याचा मानवाला दुसरा मार्ग कोणता? आपलें श्वसन वायूंत चालते. वायु हा जगताचा घटक आहे. मग जगत्च झालें नव्हतें त्यावेळीं हें परमेश्वरतत्त्व कसें श्वसन करीत होतें ? तर तें 'अवातं' म्हणजे वातविरहित श्वसन करीत होतें. हें वातविरहित श्वसन कसें असतें ? मानवाला काय सर्वच गोष्टी कळतात कीं काय ? पाण्यांत मासा कसा श्वसन करतो, तर ' जावे त्याच्या वंशा तेव्हां कळे. ' हें वात-विरहित श्वसन त्याचें ठिकाणीं कशानें चाललें होतें अशी शंका येईल म्हणून त्याचें उत्तर 'स्वधया' हा शब्द घालून दिलें आहे. स्वधया यांत स्वधा हा शब्द स्वतःची धी, पराक्रम या अर्थीं येथें लावला आहे. या ऋचेंत 'तस्माद्धान्यन्नपरः किंचनास' ही जी ओळ आली आहे ती कशाकरितां याचेंहि कारण सांगितलें पाहिजे. ही ओळ या ऋचेच्या पूर्वा-र्धाला धरून पाहिली तर ती येथें अनवश्यक व निरर्थक आहे असें वाटतें. पण तसें नाहीं, ती सार्थ योजिली आहे. कशी ती पहा. एकं दोन प्रकारचें असतें. संख्येंतलें एकं हें पुढील द्वितीयं, तृतीयं सह सापेक्ष

असतें. म्हणजे द्वितीयं, तृतीयं असेल तर या संख्येंतील एकला आस्तित्व आहे. असें हें संख्येतलें सापेक्ष एकं येथें नसून तें निरपेक्ष ( absolute ) संख्यातीत एकं आहे हें दर्शविण्याकरतां ही ओळ आली.

परमेश्वरावर भानवानें आपल्याप्रमाणेंच श्वसनाचा आरोप करून त्याचें अस्तित्व सिद्ध केलें. पुढें त्यानें त्यावर चित्चा अथवा भातित्वाचा व शेवटीं आनंदाचा आरोप करून परमेश्वराचें हें त्रिरूपात्मक सच्चिदानंदरूप पूर्णपणें जाणलें. परमेश्वराचे हे तीन गुण मानवाला जर साक्षात्कारतां आले नाहींत तर त्यांचा त्याला उपयोग काय ? परमेश्वरानें दुसऱ्याकारितां ही जगताची उठाठेव केली नाहीं; तो स्वतःच्या आनंदाकरितां हें जगत् विनटला. त्याच्या सत्गुणाचा म्हणजे अस्तित्वाचा साक्षात्कार ही पंचमहाभूतांची सृष्टि, हें ब्रह्मांड, त्यांतील सूर्यमाला, पृथ्वीसारखे गोल पाहिलें कीं होण्यासारखा आहे. त्याच्या सत् गुणाचें प्रकटीकरण होण्यास इतक्या जडसृष्टीची निर्मिति पुरे आहे; त्याकरितां पुढच्या सृष्टीची जरूर नाहीं. फ्रेंच रेव्होल्यूशनमध्यें फ्रेंच लोक अराजक व अदेववादी झाले होते. त्यांतच नेपोलियनचा अवतार झाला. तो ईजिप्तच्या स्वारीवर चालला असतां वाटेंत गलबतावर त्याच्या सरदारांत, देव आहे कीं नाहीं, याबद्दल कडाक्याचा वाद चालला होता. इतक्यांत नेपोलियन् तेथून चालला असतां त्यांनीं त्याला याबद्दल तुला काय वाटतें म्हणून विचारलें. नेपोलियन्नें कांहीं एक न बोलतां आकाशाकडे पाहिलें व म्हणाला, तुम्हीं देव नाहीं म्हणतां मग हें सर्व कोणी निर्माण केलें ( Who made all that ) ? सारांश, परमेश्वराच्या सत् गुणाचा साक्षात्कार पंचमहाभूतांच्या जडसृष्टींत येण्यासारखा आहे. पण परमेश्वर नुसता सत् नाहीं तर चिद्भावरूप आहे. त्या चिद्रूपाच्या साक्षात्काराकरितां त्यानें वनस्पतिसृष्टि व प्राणिसृष्टि निर्माण केली. या दोहींत त्याचा चिद्भाव प्रकट झाला. पुनः अजीवसृष्टि व जीवसृष्टि यांत फरक आहे. अजीवसृष्टींत गति आहे पण ती नुसती यांत्रिक ( Mechanical ) गति आहे. जींत

नुसत्या आकर्षणोत्सारण ( Attraction and repulsion ) वगैरे क्रिया होतात. जीवसृष्टींतील जीवशक्ति या यांत्रिक शक्तीपेक्षां फार निराळी आहे. आंब्याच्या कोयींतून अंकुर फुटणें, त्याला पानें, फळें वगैरे येणें ही क्रिया त्यांत कशानें घडते ? तर ती त्यांत जीवशक्तीनें ( Vital energy ) घडते. आंतून वर्धन होणें हा जीवशक्तीचा परिणाम आहे. हेंच परमेश्वराचें चिद्रूप होय. वनस्पतिसृष्टींत अन्तर्वर्धन आहे पण त्या एकाच ठिकाणीं पुरलेल्या राहतात. चिद्भावाच्या अधिक विकासार्थ प्राणी निर्माण झाला. तो हालचाल करूं लागला. त्यांत मनाचे विकार वगैरे निर्माण होऊन वनस्पतीपेक्षां चैतन्य अधिक वाढलें. तथापि एवढ्यानेंहि परमेश्वराची पूर्णता नाहीं. तो सत् आणि चित्च नाहीं तर आनंदरूप आहे. त्याकरितां त्याला मानवनिर्मित ( Human creation ) करावी लागली. मानव हा उत्क्रांतींत परमेश्वराच्या आनंदगुणाच्या प्रकटीकरणार्थ झाला. मानवाला मनिन् ( मन् = विकारणें यापासून ) म्हटला आहे. त्याच्या खालच्या प्राणिवर्गाला नुसतें प्राणिन् म्हटलें आहे व त्याखालच्या वनस्पतिवर्गाला अन्न हें नांव आहे.

प्राण्यांत प्राणनकर्म मुख्यत्वानें असतें. मानवांत तें आहेच पण त्यांत पुढें मनाचा उदय झाला. तो मनिन् झाला. सर्व प्रकारचे विकार त्यांत निर्माण झाले. पुढें त्यांत सदसत् पहाणारी बुद्धि निर्माण झाली. मनोविकार पूर्णतेला मानवदेहांतच जातात. ते पूर्णतेला गेल्यानंतर मग बुद्धि त्यांत सदसताची निवडानिवड ( discrimination ) करते. मानवापर्यंत रूपोत्क्रांति पूर्ण झाली. त्यापुढें आतां निराळें रूप व्हावयाचें नाहीं. मानवापुढें जी उत्क्रांति चालावयाची ती गुणोत्क्रांति होय. ती उपनिषदांत अन्न, प्राण, मन, विज्ञान आणि आनंद या पर्यायांनीं सांगितली आहे. आपल्या तत्त्वज्ञानांत आनंद ही कोटी शेवटची नाहीं तर ती ब्रह्म म्हटली आहे. उपनिषदांत ब्रह्माला आनंदयोनि म्हटलें आहे. आनंद हा सुखदुःखात्मक संवेदनांत शेवटचें जें सुखात्मक संवेदन त्यांत

प्राप्त होतो असें म्हटलें आहे. आरिस्टॉटलहि आपल्या तत्त्वज्ञानांत irrational ( ऐंद्रिक ) and rational ( बौद्धिक ) असे सुखाचे दोन भाग करतो. ऐंद्रिक सुखाला त्यानें Pleasure व बौद्धिक सुखाला Happiness म्हटलें आहे. यांत एक आप्तवाक्य प्रमाण मानणारा व दुसरा आपली 'व्यवसायात्मिका बुद्धि' चालवणारा असतो. आपल्या वाङ्मयांत बौद्धिक सुखाला आनंद हा शब्द योजला आहे. पशुमानवांचा तुलनेनें विचार केला तर पशु ऐंद्रिक सुखांत रममाण होणारा दिसतो. त्याला भूतभविष्य काळ कळत नाहीं; मानवाला ते कळतात. भूतकालीन शिवाजीच्या राज्याचा आनंद, तसाच भविष्यकाळीं मिळणाऱ्या स्वराज्याचा आनंद आपणास कल्पनेनें जाणतां येतो. असा आनंद मिळविण्याकरितां मानवदेहाची निर्मिति झाली. आपण परमेश्वरानें जगन्निर्मिति कशी केली असेल याची क्षणभर कल्पना करूं. तो एक सायंटिस्ट होता. जगत् ही त्याची प्रयोगशाळा होती. त्यांत नाना रूपें तो तयार करीत होता. सूर्यापासून पृथ्वीपर्यंत नाना गोल त्यानें निर्माण केलें. नंतर आद्यजीवरसा ( Protoplasm ) पासून मानवापर्यंत वनस्पतींचे व प्राण्यांचे ८४ लक्ष देह निर्माण केलें व फेंकून दिले. कारण त्यांत त्याला आनंद दिसेना. हें काम त्यानें फार काळ म्हणजे वीस कोट वर्षं चालविलें. त्याची मोठी केविलवाणी स्थिति झाली असेल. एक दिवस त्याला प्रयोग करतां करतां सहज हें मानवरूप त्याच्या टेस्ट्ट्यूबमध्यें आढळून आलें. त्याचा फॉर्म्यूला त्याला सांपडला ? त्यांत त्याला आनंद झाला. त्याच्या मनाप्रमाणें त्यानें अत्यंत काळ चालविलेल्या प्रयोगांचा त्याला रिझल्ट मिळाला !! सारांश, मानवदेह, हा नरदेह परमेश्वराच्या आनंदरूपाचें कार्य सिद्धीस नेण्याकरितां जन्माला आला. परमेश्वर शास्त्रज्ञाप्रमाणें कृतकृत्य झाला. परमेश्वराची स्थिति मानव निर्माण होईपर्यंत मोठी कारुण्यास्पद झाली असेल. रंगभूमीवरील नटाला समोर प्रेक्षकवर्ग नसावा किंवा आमच्यासारख्या वक्त्याला समोर श्रोतृवर्ग नसावा म्हणजे जी

स्थिति होईल तीच त्याची झाली असेल. तो काय करतो हें पाहणारा व जाणणारा मानवापर्यंत कोणीहि नव्हता. माणुस निर्माण झाल्याबरोबर त्याला आनंद झाला. कारण मानव हा त्यानें चालविलेल्या नाट्यप्रयोगाचा प्रेक्षक झाला, व त्याचें नाट्य पाहून 'शाबास, वाहव्वारे परमेश्वरा' असें म्हणून त्यानें टाळ्या वाजविल्या ! बायबलांत देवानें शुक्रवारीं सायंकाळीं मानव निर्माण केला व शनिवारीं विश्रांति घेतली अशी कथा आहे. शनिवार हा देवाच्या विश्रांतीचा दिवस (Sabbath) असें जुन्या करारांत म्हटलें आहे. बरोबरच आहे. मानवनिर्मितीनंतर परमेश्वराला कांहीं कार्य राहिलें नाहीं. सृष्टीचें पुढील कार्य आतां मानवानें आपल्या हातांत घेतलें. इक्ष्वाकुवंशांतील राजे युवराज वयांत आल्याबरोबर राज्य त्यांच्या स्वाधीन करून आपण वनांत जात. ' गलितवयसामिक्ष्वाकूणामिदं हि कुलव्रतम् ' असें कालिदासानें रघुवंशांत त्यांचें वर्णन केलें आहे. त्याच प्रमाणें परमेश्वरानें मानव निर्माण करून त्याला मन, बुद्धि, अहंकार व आत्मानात्मविचार करण्याची शक्ति दिली आणि मग हा सृष्टीचा कारभार पुढें चालव म्हणून सांगितलें. आपण मानव व्हाइसरॉयप्रमाणें परमेश्वराचे प्रतिनिधि आहोंत. राजा फार लांब राहतो. त्यानें व्हाइसरॉयला अपरंपार सत्ता दिलेली असते. सत्ता देणाऱ्याचा हेतु, त्यानें आपलें राज्य उत्तम चालवावें, त्याचें यश व कीर्ति वाढवावी हा असतो. परमेश्वरानें आपलें ( जगताचें ) वैभव वाढवावें म्हणून मानवाला सर्व तऱ्हेची शक्ति दिली. त्यांत हेतु हा कीं, त्यानें तिचा योग्य उपयोग करून नराचा नारायण व्हावें. पशूचा नारायण होत नाहीं; तो होण्याकरितां पशूला नरत्वांत आलें पाहिजे.

परमेश्वरानें मानवाला सर्व बाह्य ज्ञानेंद्रियें व मन, बुद्धि आदिकरून अन्तरिंद्रियेंहि दिलीं. शेवटचें सुख किंवा आनंद मानवबुद्धींतच शक्य आहे. ब्रह्मानंदहि तद्द्वारांच व्हावयाचा. उपनिषत्कारांनीं हा ब्रह्मानंद काय आहे व तो कसा प्राप्त होतो तें अत्यंत सुलभ रीतीनें सांगितलें

आहे. हल्लींच्या वेदान्तांत या आनंदाचा ब्रह्मघोटाळा झालेला आहे. फार प्राचीन काळीं वैश्विक सिद्धान्त प्राचीन पंडितांनीं एकदां सांगून टाकले. पुढील पंडितांना नवीन सिद्धान्त काढण्याचें कांहीं कार्यच नव्हतें. मग त्यांनीं या जुन्या सिद्धान्तांवर भाष्यें, टीका वगैरे करून आपल्या पांडि-त्याचें शब्दावडंबर खूप केलें व त्यामुळें जुन्या सिद्धान्तांतील अर्थ सुलभ होण्याऐवजीं अधिक अवघड मात्र झाला. उपनिषत्कारांची पद्धति फार उत्तम; ते मोठमोठीं तत्त्वें दुसऱ्यांना समजतील अशा अत्यंत सोप्या रीतीनें सांगतात. तैत्तिरीयोपनिषदांत ब्रह्मवल्ली आहे; हिलाच आनंदवल्ली किंवा ब्रह्मानंदवल्ली म्हणतात. ब्रह्म हें आनंदांत सिद्ध होणारें आहे. हा आनंद ते सोप्या भाषेंत सांगतात. आनंद काय आहे हें आपणां सर्वांना समजतें. तें सुखदु:खात्मक संवेदन आहे. या आनंदाचा मूलांक (unit) लहान मुलालाहि कळेल असा आपण घेऊं. लहान मुलाचा मूलांक म्हणजे खडीसाखरेचा खडा, किंवा 'गुळखोबरें विलोकुनि भलत्याहि जनास बालक वळावा' यांत मोरोपंतानें म्हटल्याप्रमाणें गूळ खोबरें. पण हा लहान मुलाचा मूलांक झाला. आपण येथें बसलेले सर्व मोठे, त्यांना हा मुलाचा मूलांक बरा वाटणार नाहीं. त्यांच्याकरितां आपण हल्लीं सर्वांना परिचित असलेला चहाचा पेला हा मूलांक घेऊं. याचा आनंद सर्वांना कळतो. त्या आनंदाची शंभरपट करा कीं मॅट्रिक्युलेशन पास झाल्याचा आनंद, त्याची शंभरपट करा कीं बी. ए. झाल्याचा आनंद, त्याची शंभरपट कीं एम्. ए. झाल्याचा आनंद, त्याची शंभरपट कीं लग्न झाल्याचा आनंद, पुढें मुलगा झाल्याचा, स्वराज्य, साम्राज्य, अधिराज्य मिळाल्याचा आनंद सांगितला आहे. सारांश, चहाच्या पेल्याचा आनंद अनंतावधींत नेला कीं तोच ब्रह्मानंद होय. गणितांत जसें शून्यलब्धींत आपण जातों तसेंच आनंदाच्या अनंतावधींत आपण जावयाचें. हा आनंद अंतिम सीमेचा, हाच ब्रह्मानंद......... हेंच शेवटचें सुख; तें प्राप्त करून घेण्याकरितां जगताचा विचार करा-

वयाचा. प्राचीनांनीं हा विचार आधिभौतिक, आधिदेविक व आध्यात्मिक अशा तीन दृष्टींनीं केला आहे. आपल्या षड्दर्शनांतील पहिल्या दोहोंनीं एकाचा, दुसऱ्या दोहोंनीं दुसऱ्याचा, एका दर्शनानें तिसऱ्याचा विचार करून राहिलेल्या एका दर्शनानें सर्वांचा समन्वय केला आहे. हे षड्-दर्शनांचें सहा खांब आहेत व त्यांवर ही वैदिक धर्माची आणि तत्त्व-ज्ञानाची इमारत उभारली आहे. ती कशी उभारली आहे तें आपण उद्यांच्या व परवांच्या व्याख्यानांत पाहूं.

---

## व्याख्यान ५ वें

जगदुत्क्रांति ज्या पर्यायांनीं झाली ते सर्व पर्याय, त्यांचें रूप आणि उत्क्रांतीचें कार्य व तींतील हेतु यासंबंधीं आतांपर्यंत विवरण झालें आहे. जगताचा विचार आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक या तीन दृष्टींनीं प्राचीनांनीं केला आहे. या दृष्टि लक्षांत घेतल्यावांचून तत्त्वज्ञानाची पूर्णता नाहीं. भगवद्गीतेंतहि हा विषय आला आहे:——

अक्षरं ब्रह्मपरमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥
अधिभूतं क्षरोभावः पुरुषश्चाधिदैवतम् ।
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥

यांत अधिभूताला क्षरोभाव, आधिदेव म्हणजे पुरुष व अध्यात्माला येथें स्वभाव म्हटलें आहे. हा गीतेचा विन्यास जगताच्या वरील तीन रूपांना धरून आला आहे. ब्रह्म हें या सर्वांनाच व्यापून असल्यामुळें त्याला अक्षर म्हटलें आहे. या ब्रह्माच्या सापेक्षतेनें असणारें जें अधिभूत त्याला क्षरोभाव म्हटलें आहे. हा क्षरोभाव काय, अध्यात्माला धरून त्याचा स्वभाव म्हणजे काय, याचा विचार केला पाहिजे. ब्रह्माचा जो

स्वभाव तेंच अध्यात्म. व्यक्त जगत् जें क्षर त्याच्या अपेक्षेनें ब्रह्माला अक्षर ही संज्ञा येथें दिली आहे. अव्यक्तांतून व्यक्त जगतांत येण्याला हा ब्रह्माचा स्वभाव कारणीभूत होतो. ब्रह्माच्या ठिकाणीं जें पहिलें व्यक्तत्व येतें त्याला येथें अध्यात्म शब्द लाविला आहे. आत्मा हा शब्द अत्= गमन करणें यापासून झाला आहे. त्याची गति जी सुरू झाली तेंच आकाश झालें. अव्यक्ताला व्यक्तभाव येण्याची येथें सुरवात झाली. अव्यक्ताचा व्यक्तभाव होणें हेंच अध्यात्म आणि क्षरोभाव तें आधिभूत म्हटलें आहे. ज्याचा आपण आधिभौतिक विचार करावयाचा असें जें जगत् तें अधिभूतांत म्हणजे क्षरोभावांत येतें. जगत् हें बदलणारें आहे; त्यांत एकही वस्तु स्थिर नाहीं. जगतांत जें जें कांहीं आहे तें सर्व जगत्=गतिमान्, बदलणारें आहे,—'यत्किंचजगत्यांजगत् ।' गति अत्यंत झाली कीं त्यांतच स्थिति निर्माण होते. दोन गतिमान् लाटा एकत्र आल्या कीं तेथें स्तब्धता येते. भोंवरा अत्यंत गतिमान् झाला कीं तो स्थिर आहेसा दिसतो. गतीला धरून स्थिति तर उलट स्थितीला धरून गति असें हें द्वंद्व आहे. या नित्य चाललेल्या जगताच्या गतींत तुम्हांला सारखा गुणविकास, कलाविकास, व रूपविकास होत असलेला दिसून येईल. एकसारखें बदलण्यांत स्थिरता येणें हेंच जगताचें वास्तविक रूप आहे. प्रसिद्ध गतिवादी प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्ता हीराक्लायटस यानेंहि 'What is constant is change' असेंच म्हटलें आहे. गतींत जगत् कसें चालतें, शास्त्रांनीं त्याला कोणत्या कसोट्या लाविल्या आहेत तें पाहिलें पाहिजे.

भगवद्गीतेंत सर्व दर्शनांचा समन्वय केला आहे. गीता हा काव्यग्रंथ आहे. त्यांत अनेक तत्त्वांचें एकत्रीकरण केलें आहे. ती श्लोकरूपानें सांगितली आहे, दर्शनांप्रमाणें सूत्ररूपानें ग्रथित झालेली नाहीं. तत्पूर्वीं झालेल्या सर्व वैदिकशास्त्रांचें तींत संकलन केलें आहे. तींत साही दर्शनांचे सिद्धान्त आले आहेत. कांहीं विद्वान् असें म्हणतात कीं गीता

कांहीं दर्शनांना मानते कांहींना मानीत नाहीं; पण हें त्यांचें म्हणणें युक्त नाहीं. सर्व दर्शनांतील युक्त ज्ञान गीतेनें घेतलें आहे. आपण या सहा दर्शनांसच षट्शास्त्रें म्हणतों. वैदिक वाङ्मयांतील चार विद्या व सहा शास्त्रें म्हणजे चार वेद व सहा दर्शनें होत. हीं सर्व प्रसंगाप्रसंगानें गीतेंत आलीं आहेत. या सहा दर्शनांचा विचार करतांना कांहीं ऐतिहासिक दृष्टीनें पाहणारे लोक तीं इसवी सनाच्या मागें पुढें झालीं असावीं असें म्हणतात, पण या म्हणण्यांत फारसें तथ्य नाहीं. दर्शनांतील बहुतेक तत्त्वें वेदकाळापासून चालत आलेलीं आहेत. कणादाचीं कांहीं सूत्रें व सांख्यांचीं कांहीं सूत्रें नष्ट झालीं असें कांहींचें म्हणणें आहे. मागचें ज्ञान पुष्कळ काळ चालत येतें त्याचींच पुढें सूत्रें बनतात. म्हणून सूत्रांचा काळ निश्चित करतां येत नाहीं; फार तर त्यांच्या ग्रथनाचा करतां येतो. पतंजलीच्याच वेळीं योगशास्त्र झालें नाहीं, तें मागेंपासून चालत आलेलेंच होतें. पतंजलीनें त्याचें सूत्रांत ग्रथन केलें. त्याच्या अगोदर ग्रथन नव्हतें असेंहि सांगवत नाहीं. त्या शास्त्रावरील एखादा नवीन ग्रंथ पुढें आला कीं मागचा लोपून जातो. गिबनच्या इतिहासांत पूर्वींच्या अनेक इतिहासकारांचे त्यानें भरपूर आधार दिले आहेत. पण ऑक्ले वगैरे सर्वांचे ग्रंथ मागें पडून गिबनचा ग्रंथ युरोपांत स्टँडर्ड म्हणजे सर्वमान्य असा झाला. असाच प्रकार दर्शनसूत्रग्रथनाचा झाला असावा. पाणिनीच्या व्याकरणसूत्रांचें ग्रथन हें व्याकरणावरील शेवटचें ग्रथन आहे. त्याच्या पूर्वी पुष्कळ वैय्याकरणी होऊन गेले होते. तोच प्रकार यास्काचा. त्याच्या पूर्वींहि पुष्कळ निरुक्तकार झाले पण त्याचें निरुक्त शेवटीं झालें, तें मात्र राहिलें. वैय्याकरण पतंजलीचें योगसूत्र इसवी सनाच्या पूर्वी दुसऱ्या शतकांत झालें असें म्हणतात. पण हें चित्तवृत्तिनिरोधाचें योगशास्त्र वेदांबरोबरच चालत आलें होतें. त्याचा मूळ प्रणेता ब्रह्मदेव हें त्या शास्त्राच्या प्राचीनत्वामुळें म्हणतात तें बरोबर आहे. कापिलसांख्यहि आपल्याला वेदांपासून दिसेल. त्या शास्त्राचें ज्ञान पूर्वी होतेंच; कपिलानें सूत्रें नवीन केलीं. आजहि

एखादा बुद्धिवान् मनुष्य एखाद्या दर्शनावर नवीन सूत्रें करूं शकेल पण त्यांतील ज्ञान नवीन असणार नाहीं, तें प्राचीनच असेल. असें षड्दर्शनांतील ज्ञान वेदांपासून चालत आलेलें आहे. त्यांचें सूत्रांत ग्रथन पुढें केव्हां तरी झालें इतकेंच. तीं इसवी सनारंभीं झालेलीं वगैरे म्हणण्यांत कांहीं तथ्य नाहीं. ब्राह्मणग्रंथांत, विशेषतः शतपथ ब्राह्मणांत नाना विषय आले आहेत. त्यांत या जुन्या ज्ञानाचीं बीजें आढळतात. हल्लींचें ईश्वरकृष्णाचें सांख्य भगवद्गीतेंत नाहीं. गीतेंत 'सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि' असें सांगितलें आहे. म्हणून हें दार्शनिक तत्त्वज्ञान फार प्राचीन काळापासून चालत आलेलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. दर्शनांच्या या सहा खांबांच्या आश्रयानें वैदिक तत्त्वज्ञान व वैदिक धर्म हीं चाललीं आहेत. दर्शनांत एक युक्त व एक अयुक्त म्हणतां यावयाचें नाहीं. सांख्य, योग, वैशेषिक, न्याय, पूर्व व उत्तर अशा दोन मीमांसा हीं साहीं दर्शनें वैदिकशास्त्रें होत. पूर्व व उत्तर या कल्पना वेदांपासून चालत आलेल्या आहेत. कर्मरूपाला पूर्व मीमांसा म्हणतात व ज्ञानरूपाला धरून उत्तर मीमांसा किंवा वेदान्त हें नांव आलें आहे. हीं सर्व दर्शनें आस्तिक आहेत. आस्तिकपणा हा देव मानण्यावर किंवा न मानण्यावर नाहीं. जो वेदांना मानतो तो आस्तिक. साही दर्शनकार वेद मानणारे म्हणजे आस्तिक आहेत. सांख्य, वैशेषिक हे ईश्वर मानीत नाहींत म्हणून वेदान्तदर्शनकार त्यांना नास्तिक म्हणतात. पण ते स्वतः आम्ही आस्तिक आहों, आम्ही वेद मानतों, असें सांगतात. खरे नास्तिक कोण तर ज्यांनीं वैदिक धर्माविरुद्ध पाखंडी धर्म निर्माण केले ते होत. त्यांना वैदिक नास्तिक म्हणतात. असे नास्तिक धर्म म्हणजे बौद्धधर्म आणि जैनधर्म हे होत. बौद्धदर्शन हें नास्तिक दर्शन; कारण बौद्ध वेदांना मानीत नाहींत. जैनहि वेदांना मानीत नाहींत; त्यांचेंहि स्वतंत्र दर्शन आहे. पण आपलीं साहीं दर्शनें आस्तिक म्हणजे वैदिक आहेत. यांत फरक दिसतो तो फक्त ईश्वराबद्दल आहे. यांत ईश्वर कोठें येतो

हें पहाणेंहि मोठें मौजेचें आहे. साही दर्शनांत सर्वांच्या शिरोभागीं सांख्य व वैशेषिक हीं दर्शनें आहेत. हीं दोन्हीं जगच्छास्त्रदर्शनें आहेत. सर्व दर्शनांचा विषय ज्ञान हा आहे. ज्ञानाचा विषय जगत् आहे. जगत् नाना गुणकर्मांत चालतें. हीं गुणकर्मेंच ज्ञानविषय होतात. वेदांबद्दल ‘ त्रैगुण्यविषया वेदाः ’ असें गीता सांगते. जगताच्या गुण-कर्म-रूपांत हें वेदांतील त्रिगुणात्मक ज्ञान चालतें. अशा जगताला धरून मानवाचा व परमेश्वराचा विचार या साही दर्शनांनीं केला आहे.

मानव हा जगताचा घटक आहे. जगताच्या इतर घटकांचा विचार करावयाचा म्हणजे त्यांत मानवाचाहि आलाच. जगताला व मानवाला वरतीं नेणारें जें परमेश्वराचें रूप त्याचाहि विचार याबरोबरच करावा लागतो. मनुष्य, जगत् व परमेश्वर या तिहींचा विचार आपल्या साही दर्शनांत केला आहे. यांतील जो विषय ज्या दर्शनानें घेतला तेवढा तें बरोबर सांगतें. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक या तीन दृष्टींनींहि याचा विचार केला पाहिजे. सांख्य, वैशेषिक हीं जगच्छास्त्र-दर्शनें होत. लौकिकांत जुन्या पंडितांनीं या सहांचीं तीनच दर्शनें केलीं आहेत. ते सांख्य व योग मिळून योग समजतात, वैशेषिक व न्याय मिळून न्याय समजतात आणि पूर्वोत्तर मीमांसांना ते वेदान्तांत घालतात. पूर्वोत्तर मीमांसा हीं एका विषयाचीं दोन अंगें म्हटलीं तरी ते दोन्ही स्वतंत्र विषय आहेत. जुने पंडित सहाचीं अशीं तीन दर्शनें कल्पितात पण असें करणें योग्य नाहीं. असें करण्यांत त्यांवर जुलूम केल्यासारखा होतो. सांख्य, वैशेषिक व योग हीं अगदीं स्वतंत्र दर्शनें आहेत. सांख्य हें जगत्तत्त्वदर्शनशास्त्र आहे; वैशेषिकहि तसेंच आहे. भौतिक शास्त्राच्या दृष्टीनें हीं बनलेलीं आहेत. विद्युत्कणांपासून तों मानवसमाजापर्यंत सर्व शास्त्रें घेऊन व त्यांना धरून येथें विचार केला आहे. सांख्यांनीं जगताचा विचार संख्ये (quantity) मध्यें केला तर वैशेषिकांनीं तो विशेषांत म्हणजे गुणां (quality) मध्यें केला. संख्येंत व गुणांत ज्ञान सांगणें या भौतिक

शास्त्राच्या दोन विचारपद्धति आहेत. सांख्य हा शब्द संख्या शब्दापासून सिद्ध झाला. सांख्यशास्त्र = philosophy in number. या शास्त्राबरोबर तुलनेला ग्रीक तत्त्वज्ञान घ्यावें म्हणजे समजेल. आरिस्टॉटल्, सॉक्रेटिस् यांच्या पूर्वी ग्रीसमध्यें एक तत्त्ववेत्ता होऊन गेला; त्याचें नांव पायथॅगोरॅस्. त्याचें तत्त्वज्ञान म्हणजे philosophy in number = सांख्यच होतें. तो १।२।३।४ अशा संख्येंत तत्त्वज्ञानाचा विचार करतो. तो सांख्यांप्रमाणेंच कर्म-पुनर्जन्म मानणारा आहे. त्यापासूनच पुढें ॲनेक्झिमेनीज्, ॲनेक्झिमांडर्, सॉक्रेटीस्, प्लेटो, आरिस्टॉटल् वगैरे ग्रीक तत्त्वज्ञ झाले. पायथॅगोरॅस् शब्दाची व्युत्पत्ति मॅक्समुल्लरनें पिता आणि गुरुस्=पायथॅगोरॅस् अशी दिली आहे. आपल्याकडील एखादा सांख्यशास्त्रज्ञ तिकडे गेला व तो त्यांचा पिता (Father) व गुरु (Preceptor) होऊन त्यानें हें सांख्यज्ञान ग्रीकांना शिकविलें. हल्लींच्या काळीं अशी मौज आहे कीं, ज्या जुन्या पंडितांना भौतिकशास्त्र माहीत नाहीं त्यांना सांख्यशास्त्र हें संख्येंत चालणारें (Philosophy in quantity) शास्त्र आहे ही गोष्टच कळत नाहीं. ते सांख्यशब्दाचे दुसरेच अर्थ करतात. आमच्या नासदीयसूक्तभाष्यावरील एक शास्त्री टीकाकार म्हणतात, सांख्य म्हणजे संख्येचें शास्त्र हें काय आहे समजत नाहीं. त्यांनीं सांख्य शब्दाचा युद्ध (battle) असा अर्थ केला आहे. सांख्य हे जगताचें तत्त्वज्ञान संख्येंत बरोबर सांगतात. सांख्य म्हणजे संख्येपासून झालेलें. संख्या एकापासून सुरू होत नाहीं, ती दोनापासून सुरू होते. त्यांतील प्रत्येक सद्वितीय असतें. एक व दोन यांतील सापेक्षत्वाला धरून प्राचीनांनीं त्याला द्वंद्व असें नांव दिलें आहे. सांख्य दोनांत म्हणजे द्वंद्वांत सुरू होतें.

हल्लींच्या वेदान्ततत्त्वज्ञानांत सांख्यांचा हा द्वंद्व शब्द मागें पडून त्याच्या जागीं दुसरा द्वैत शब्द आला. दोन नाना प्रकारचे असतात. एक जसे सद्वितीय व अद्वितीय असे अनेक प्रकारचे आहेत त्याचप्रमाणें दोनाचा विचार करूं लागलें कीं, एकदम द्वंद्वाबद्दल द्वैत शब्द पुढें येतो.

षड्दर्शनांत द्वैत शब्द कोठेंहि नाहीं. गीतेंतहि हा शब्द आलेला नाहीं. जगतांत जीं अनेक दोनत्वें येतात, त्यांत मोठें कोणतें तर 'द्वंद्वः सामासिकस्यच ' असें गीता सांगते. हा द्वंद्व शब्द भगवद्गीतेंत अनेकशः आलेला आहे; पण तो नाहींसा होऊन त्या जागीं द्वैतशब्द आला आणि त्यायोगें भगवद्गीतेचें तत्त्वज्ञान विकृत झालें. द्वंद्वांतील दोन निराळ्या पद्धतीनें बनलेले असतात तर द्वैतांतील दोन अगदीं निराळ्या पद्धतीनें बनतात. द्वैत = द्विधा इतं द्वीतं तस्य भावः । एका वस्तूचे जे दोन तुकडे पडतात त्या दोनपणाला द्वैत म्हणतात. द्वंद्व = द्वौ द्वौ सहाभिव्यक्तौ । यांतील दोन तुटून झालेले नसतात तर स्वतंत्र भिन्न गुणरूपांचे पण परस्परांना सहोपचारी ( Complementary ) असे असतात. दौत व लेखणीचें उदाहरण घ्या. या दोहोंचीं गुणकर्में निराळीं, पण दोन्हीं एकमेकांवर अवलंबून असतात. पहिलें सृष्टींतलें द्वंद्व प्रकृतिपुरुषांचें. दोहोंचें रूप भिन्न व कार्यहि अगदीं भिन्न आहे. त्याचप्रमाणें इलेक्ट्रॉन व प्रोटॉन् हेहि सहाभिव्यक्त, निरनिराळ्या गुणरूपांचे आहेत. पैकीं एक चल व दुसरा स्थिर असतो. प्रकृति म्हणजे स्त्री. प्रकृति व पुरुष हे एकमेकांपासून झालेले नाहींत; पण दोहींचें अस्तित्व एकमेकांवर अवलंबून आहे आणि दोन्ही एकमेकांला सहोपचारी आहेत. त्यांतील एक नष्ट झालें तर दुसरेंहि जिवंत राहणार नाहीं. म्हणून ' द्वौ द्वौ सहाभिव्यक्तौ ' ही द्वंद्वाची व्याख्या अगदीं सार्थ आहे. हें द्वंद्व गीतेंत आलें आहे; असें असून जिकडे तिकडे सर्वत्र द्वैत पसरलें. द्वैत व द्वंद्व हीं अगदीं निरनिराळीं असून त्यांचे परिणामहि अगदीं भिन्न आहेत. एका केळ्याचे दोन तुकडे केले कीं, ते अगदीं समान धर्मांचे असतात. दौत-टांक यांतील दोन निराळे; दोघांचीं कार्यें भिन्न आहेत. तीं एकमेकांला उपकारक ( Complementary ) आहेत. दोन समानगुणधर्मांचे आले कीं, त्यांत स्पर्धा उत्पन्न झालीच; कारण दोहींचें कार्य समान असतें. सहकार्यार्थ दोन्हींमध्यें विषमकार्य घडावें लागतें. समजा, एका गांवांत चार वकील आहेत. त्या चौघांनाच पुरेसें तेथें काम

आहे. तेथें आणखी दोन वकील आले कीं, त्या सर्वांतील प्रमाणसमता (Balance) ढळेल, त्यांत आपसांत स्पर्धा उत्पन्न होईल, जीवनार्थ कलह ( Struggle for Existence ) माजेल, व त्यांत जो बलवान् असेल तो तगून राहील, म्हणजे 'Survival of the fittest' अशी स्थिति प्राप्त होईल. समकार्यांत सतत मारामारी चालते. आतां आम्हांला समाज करून जिवंत राहावयाचें, पशूसारखी सतत मारामारी करावयाची नाहीं. मग समकार्य टाकून विषमकार्य काढावयाचें. तें काढलें म्हणजे मग सर्व जगतील. म्हणून ते जुने वकील या नवीनांना म्हणतील कीं, तुम्ही वकिली कशाला करतां ? तुम्ही कॉंग्रेसचें काम करा म्हणजे तुमच्या आमच्यांतील स्पर्धा नाहींशी होऊन आपली एकी होईल ! विषमकार्यांतच नेहमीं समाज चालतो. कारण त्यांत एकाचें कार्य दुसऱ्याला उपकारक व्हावें लागतें. याला धरून समाजाबद्दल आतां नवीन नियम झालाच आहे. जुना डार्विनचा नियम 'Struggle for Existence and Survival of the Fittest ' मागें पडला. हा नवीन नियम म्हणजे 'Survival of the Unlike' विषमकार्यांत मनुष्य जगतो, हा होय. विषमकार्यांत सहकार्य हाच वास्तविक समाजाचा नियम आहे. डॉक्टर आणि वकील, स्त्री आणि पुरुष हीं एकमेकांला उपकारक होतात. दोन पुरुषांचें तसेंच दोन स्त्रियांचें लग्न व्हावयाचें नाहीं. दोन्हीं निरनिराळीं कार्यें करणारींच पाहिजेत. दोघांच्या कार्यांचा एकमेकांला उपयोग झाला पाहिजे. हें दोघांचें साहचर्य जें विषमकर्मांत घडून येतें त्यालाच द्वंद्व म्हणतात. हें समाजाची सिद्धि करणारें द्वंद्व जाऊन त्याजागीं द्वैत आलें कीं दोघांत मारामारी सुरू होते. द्वैतांत सतत मारामारीच चालावयाची. द्वैत-अद्वैत हें एक द्वंद्व आहे. द्वैत म्हणजे जर मारामारी तर त्याची प्रतियोगी कोटी जें अद्वैत त्यांत मारामारी जाऊन शांति प्राप्त होते. युद्ध आणि शांति हें पुनः द्वंद्वच आहे. पशूंत युद्ध सतत चालतें. युद्ध ( War ) थांबवून तेथें शांति (Peace) जी प्रस्थापित करावयाची ती अद्वैतांतच

येऊं शकते.............................द्वैत×अद्वैत, युद्ध×शांति हीं दोन्हीं द्वंद्वें आहेत. युद्ध अति उपयोगाचें नाहीं, शांतीहि अति उपयोगी नाहीं. द्वंद्वाच्या नियमाप्रमाणें दोन्हीं समसमान पाहिजेत. आपल्या देशांत गेल्या १२५ वर्षांत वॉर (युद्ध) मुळींच नाहीं, ती एकदां होऊं दे; ही श्मशान-शांति आतां नको असें वाटूं लागलें आहे.

असें हें द्वंद्वाचें तत्त्व सांख्यदर्शनांत प्रकृति-पुरुष म्हणून सांगितलें आहे. संख्या द्वंद्वापासून सुरू होते व द्वंद्वांतील दोन एकमेकांला सहोपचारी असतात. असें प्रकृतिपुरुषरूप द्वंद्व धारण करणारें हें सांख्यशास्त्र आहे. द्वंद्वाच्या पलीकडचें एकमेवाद्वितीयम् तुम्हांला माहीत आहे किंवा नाहीं म्हणून वेदान्ती सांख्यांना विचारतात. पण असें विचारणें चूक आहे. यावर सांख्य असें उत्तर देईल कीं, दोहोंपासून सुरू होणाऱ्या संख्येंत बोलणारा मी, मला तुमचें एकमेवाद्वितीयम् काय आहे तें माहीत नाहीं. हल्लीं आम्ही येथें जो तत्त्वज्ञानाचा विषय बोलत आहों तो न ऐकतां जर कोणी एखादा, तुम्ही गणितशास्त्रावर किंवा म्युझिकवर कां बोलत नाहीं म्हणून विचारूं लागला तर तें विचारणें जसें मूर्खपणाचें होईल, तद्वत्च सांख्यांना एकमेवाद्वितीयम्बद्दल विचारणें मूर्खपणाचें आहे. सांख्य स्पष्टपणानें सांगेल कीं तुमचा एकमेवाद्वितीयम् माझ्या शास्त्राच्या कक्षेंत येत नाहीं. याबद्दल लाप्लास् व नेपोलियन् यांची एक मौजेची गोष्ट आहे. लाप्लास् हा फ्रान्समधील प्रख्यात ज्योतिर्विद होता व नेपोलियन् हा त्या देशाचा बादशहा होता. लाप्लासनें सूर्य व त्याच्या भोंवतालची ग्रहमाला यांचा नकाशा तयार करून तो एक दिवस नेपोलियनला दाखविला. नेपोलियन् हा व्यवहारी असल्यामुळें त्यानें त्याला विचारलें कीं यांत ईश्वराला जागा कोठें आहे ? ( Where is the place for God here ? ). लाप्लासनें तत्काळ उत्तर दिलें कीं, मला ईश्वराची कल्पना गृहीत घेतल्यावांचून माझें शास्त्र बनवितां येतें (I can do without that hypothesis). पण नेपोलियनला देव पाहिजे होता. फ्रेंच रेव्होल्यूशनमधील सर्व लोकांनीं

देव व राजा दोन्ही नाहींसे करून टाकले होते व बोनापार्टला समाजाकरितां दोन्ही पाहिजे होते. सांख्य एकमेवाद्वितीयम् परमेश्वराचें रूप सांगत नाहींत. ते जगच्छास्त्रवादी आहेत. ते प्रकृतिपुरुषापासून आपल्या विषयाची सुरवात करतात. सांख्य जगत् सांगणारे, त्यांच्या शास्त्रांत ईश्वर येतच नाहीं. वेदान्त्यांच्या अनुषंगानें पुढें कांहीं सांख्य सेश्वर झाले. वेदान्तांत जसा परमेश्वर स्वयंभु एकमेवाद्वितीयम् सुरवातीला घेतात तसेंच सांख्य आपलें प्रकृतिपुरुषद्वंद्व जगताच्या सुरवातीला घेतात. हें द्वंद्व ते अनादि मानतात. त्यांचा कर्ता सांख्यांना माहीत नाहीं; तो वेदान्त्यांनीं वाटला तर पहावा. प्रकृति-पुरुष हीं ‘ द्वौ द्वौ सहाभिव्यक्तौ ’ आहेत. याला बीजांकुरन्याय म्हणतात. कोयीपासून झाड का झाडापासून कोय, काय सांगावें ? त्याप्रमाणें प्रकृतिपुरुषांतील पौर्वापर्य सांगतां येणार नाहीं. दोन्हीं एकदम झालीं हेंच म्हणणें युक्त आहे. सांख्यांचें हें द्वंद्व अढळ आहे, अनादि आहे. या प्रकृति शब्दाचे वेदान्तांत अज्ञान, माया वगैरे मौजेचे अर्थ दिले आहेत ! प्रकृति शब्द आहे असा घ्या व त्याचे व्याकरणाप्रमाणें निरुक्ताला धरून अर्थ करा म्हणजे समजेल. शब्दांचे अर्थ ज्यानें त्यानें आपल्या मनाप्रमाणें करावयाचे नसतात. हे शब्दार्थ निश्चित करण्याकरितां तर प्रसिद्ध इतिहाससंशोधक व भाषाशास्त्रज्ञ कै. विसूभाऊ राजवाडे यांनीं वीस हजार धातूंचें संशोधन केलें. प्रकृति = प्र + कृति = प्रकृष्ठ कृति, क्रिया वगैरे. या शब्दाचे अज्ञान, माया असे अर्थ वेदान्त्यांनीं कोठून आणले ? मूळ ज्यानें शब्द निर्माण केले त्यानें गुणकर्माला धरून ते बनविले, उगाच निरर्थक (unmeaning) बनविले नाहींत. इंग्रजींत मुळांत ज्यांना कांहीं अर्थ नाहीं असे सुमारे वीस शब्द आहेत. एकदां डब्लिनमध्यें कांहीं चावट माणसें बसलीं होतीं त्यांनीं Q U I Z अशीं एकापुढें एक कांहीं तरी अक्षरें ठेवून एक शब्द बनवला. त्याला कांहीं अर्थ नव्हता. पण तो शब्द गांवांत चोवीस तासांत सर्वत्र प्रसिद्ध व्हावा ही त्यांची इच्छा होती. त्यांनीं तो शब्द सर्वांच्या दारावर

रात्रीं लिहून ठेवला. सकाळीं लोक उठून पाहतात तों ते हा विचित्र शब्द पाहून आश्चर्यचकित झाले व त्यावेळेपासून त्या क्किझ् शब्दाचा अर्थ घोटाळा असा होऊन बसला! असा का आपला प्रकृति शब्द आहे? शास्त्रज्ञांनीं तो काय उगाच निर्माण केला? तर तसा निर्माण केला नाहीं. त्यांनीं त्या शब्दाचें गुणरूप पाहूनच तो बनविला. प्रकृति म्हणजे अत्यंत गतिमान् कोटी व पुरुष ही स्थिर कोटी म्हटली आहे. त्यालाच हल्लींच्या भौतिक शास्त्रांत इलेक्ट्रॉन व प्रोटॉन म्हणतात. या दोहोंपासून पुढें जगत् बनलें.

प्राचीन पंडित शब्दयोजनेबद्दल कसलाच मूर्खपणा करणारे नव्हते. हल्लींच्या पंडितांतच असले प्रकार आढळून येतात. सांख्यांनीं प्रकृति-पुरुष द्वंद्व हें जगताचें आदिकारण मानलें आहे. कविकुलगुरु कालिदासानें हेंच द्वंद्व आपल्या महाकाव्याचा आरंभीं 'पार्वतीपरमेश्वरौ' म्हणून घेऊन त्याला नमन केलें आहे. असें करण्यांत त्यानें सांख्यांना नमस्कार केला आहे. प्रकृति म्हणजे पार्वती व पुरुष म्हणजे परमेश्वर. आपल्या संस्कृत भाषेंतील वचनांमध्यें 'द्विवचन' हें या भाषेंतील वैशिष्ट्य आहे. सर्व अर्वाचीन पंडितांना याबद्दल मोठें कोडें ( enigma ) पडतें. इतर भाषांत एकवचन व अनेकवचन हीं दोनच वचनें आहेत. अनेकवचनांत दोन येऊं शकतात. मग संस्कृत भाषेंत ही द्विवचनाची अडगळ कशाकरितां? नामांत, क्रियापदांत वगैरे सर्व ठिकाणीं हें द्विवचन येतें. 'रामः रामौ रामाः' यांतील 'रामौ' हें रूप कधीं बापजन्मीं सुद्धां व्यवहारांत येण्यासारखें नाहीं. या द्विवचनाबद्दल आमच्यांतील स्कॉलर्सच्या कथा मोठ्या पहाण्यासारख्या आहेत. कै. विसूभाऊ राजवाडे हे आमच्या घरीं रहात असत. ते व्याकरणचिकित्सक, भाषाशास्त्रज्ञ आणि इतिहाससंशोधक होते. कांहीं कांहीं वेळीं ते अशीं तर्कटें काढीत कीं बोलण्याची सोय नाहीं. संस्कृत वचनांबद्दल एकदां बोलणें चाललें असतां ते म्हणाले कीं, वेदपूर्वकाळीं अशी एक क्वीन् होती कीं तिला 'मी' हें एकच

वचन ठाऊक होतें. मग कालांतरानें तिला दुसरी एक क्लॅन येऊन मिळाली. तिला 'मी' व 'तूं' इतकें माहीत होतें. म्हणून मी व तूं यांना धरून हें द्विवचन आलें. असें कित्येक काळ चाललें होतें. कालांतरानें तिला तिसरी क्लॅन् मिळाली. तिला अनेकवचन माहीत झालें, व मग 'रामः रामौ रामाः' असें आपण तीन वचनांत बोलूं लागलों! अशी विलक्षण उपपात्ति न देतां याचा तात्त्विक विचार करा म्हणजे हें कोडें उलगडेल.

जगताचें आदिकरण प्रकृतिपुरुष हें मूलद्वंद्व. त्यापासून पुढें सर्व जगत् झालें. जगताची सुरवातच मुळीं द्वंद्वापासून आहे. त्याला धरून 'द्वंद्वः सामासिकस्यच,' 'पार्वतीपरमेश्वरौ' वगैरे वचनें आलीं आहेत. परमेश्वर या द्वंद्वरूपानें जगताचें आदिकारण झाला. द्वंद्वाची सुरवात दोनापासून होते. पुढें जगताचा विकास चालला तो सर्व संख्येंत. दोहोंच्या पुढें तीन ही संख्या आली. प्रकृति एका बाजूला, पुरुष दुसऱ्या बाजूला; दोहोंच्या मध्यें एखादा खड्डा आहे कीं काय? तर नाहीं. या दोन बिंदूंच्या मध्यें त्यांना जोडणारी रेषा (Line) आहे. येथें सत्त्व, रज, तम असे तीन गुण आले. येथें सत्त्व हा एक बिंदु (पुरुषरूप) एक बाजूला, तम हा दुसरा बिंदु (प्रकृतिरूप) दुसऱ्या बाजूला व त्यांना जोडणारी जी मधली गुणरेषा तिला रज म्हटलें आहे. मूळ द्वंद्वाच्या पुढें हे त्रिगुण म्हणजे तीन ही संख्या झाली. तिहींच्या पुढें चार ही संख्या येऊन जगताचा गुणविकास चालावयाचा. दोन बिंदूंच्या मधील जी रेषा ती कशी सिद्ध होते? Point किंवा बिंदु हा Magnitudeless म्हणजे महत्त्वरहित आहे; दोन बिंदूंमधील रेषा ही रुंदीविरहित नुसतीच लांबी आहे. ही रेषा बिंदूपुढें बिंदु अशा अनेक बिंदूंनीं बनते. सत्त्व हा एक बिंदु, तम हा दुसरा बिंदु व मधलें रज म्हणजे दोन बिंदूंना जोडणारी जी रेषा ती नाना बिंदूंनीं बनलेली असते. येथें सत्त्व × तम, व एक × नाना अशीं दोन द्वंद्वें उत्पन्न होतात. सत्त्व म्हणजे प्रकाश ( White light ) व तम म्हणजे प्रकाशराहित्य, प्रकाशाचा अभाव. मधली रजरूपी जी रेषा ती तांबडा,

पिंवळा वगैरे सात रंगांचा पट्टा आहे. या सात रंगांत भेद प्रथम गुणांशानें असतात, जातितः नसतात. हे गुणांश वाढत जाऊन भिन्न झाले कीं त्यांच्या जाति निर्माण होतात. अशा रीतीनें आपण या रंगांच्या सात जाति कल्पिल्या आहेत. सारांश, मधला जो रज त्यांत सात रंग आहेत. रज=रंग. रंगांची सुरवात तांबड्यापासून होते. सूर्यकिरण प्रथम आपल्याला तांबड्या रंगांत ज्ञात होते. सत्त्व, रज, तमांतील मधल्या रजाचे दोन तुकडे पाडून तीन गुणांचे चार वर्ण बनविले. सत्त्व म्हणजे पांढरा रंग आपण म्हणतों पण त्याला नांव नाहीं. तो अनेकांच्या समुच्चयांत बनलेला असतो. तमालाहि नांव देतां येत नाहीं. तो सत्त्वाच्या अभावांत सिद्ध होतो. मधला जो रज त्याचे तांबडा व पिंवळा असे दोन रंग ( वर्ण ) कल्पून चार वर्ण बनविले. भगवद्गीतेंतील ‘ चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः । तस्य कर्तारमपि मां विध्यकर्तारमव्ययम् । ’ या श्लोकाला धरून आपण येथें चातुर्वर्ण्य म्हणजे ब्राह्मणक्षत्रियादि समाजांतील चार वर्ण समजतों. पण लौकिकांत आपण जे चार वर्ण पाहतों ते येथें सांगितले नाहींत. भगवंतांनीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार वर्णांनीं युक्त अशी समाजरचना येथें सांगितलेली नाहीं. या श्लोकाच्या पुढें व मागें चार वर्णांच्या समाजाला धरून श्लोक आलेले नाहींत. भगवंतांना येथें जगतांत जें सर्वत्र चातुर्वर्ण्याचें भौतिक तत्त्व भरलेलें आहे तें सांगावयाचें आहे; हिऱ्यांत चातुर्वर्ण्य आहे, झाडांत चातुर्वर्ण्य आहे, मानवांत व देवांतहि चातुर्वर्ण्य आहे ! हे चार वर्ण कसे सिद्ध होतात तर भगवंत सांगतात ‘ गुणकर्मविभागशः ’ गुणकर्माच्या विभागांत.

हा गीतेंतील श्लोक फार सुंदर आहे. यांत ‘ चातुर्वर्ण्यं मया सृष्टं ’ हा पाद मुख्य आहे; पुढील तीन पाद या पादाच्या स्पष्टीकरणार्थ आले आहेत. चातुर्वर्ण्य हें गुणकर्मविभागशः सिद्ध होतें. गुण म्हणजे Potentiality व कर्म म्हणजे actuality. असे गुणकर्म एकमेकांच्या अनुरोधानें चालतात. जसे आरशीच्या भिंगांतील अंतर्गोल (Concave)

व बहिर्गोल ( Convex ) पाठीला पाठ लावून असतात व एकच वस्तु दर्शवितात तसेच गुणकर्महि पाठीला पाठ लावून चालतात व एकच वस्तु दर्शवितात. म्हणून वर्ण नुसत्या गुणानें सिद्ध होत नाहीं किंवा नुसत्या कर्मानेंहि होत नाहीं. गुण × कर्म=वर्ण. असा वर्ण कसा उद्भवतो ? तर गतीचा नियमच असा आहे कीं, ती सुरू झाली कीं तिच्या सुरवातीला ध्वनि आणि तेज हीं उत्पन्न होतात. ध्वनीलाहि वर्ण शब्द लागतो तसाच तेजालाहि लागतो. व्याकरणांत अ आ इत्यादींना आपण वर्ण म्हणतों व तेजांत जो तांबडा व पिंवळा रंग त्यालाहि वर्ण म्हणतों. येथें भगवंतांनीं जगताचा नियम ‘ चातुर्वर्ण्य ’ सांगितला आहे. व ‘ चातुर्वर्ण्य ’ या पदाच्या स्पष्टीकरणार्थ पुढील दुसरा पाद ‘गुणकर्मविभागशः’ हा आला आहे. असें हें ‘ चातुर्वर्ण्य ’ मीं निर्माण केलें नाहीं तर तें माझ्याकडून निर्माण केलें गेलें, म्हणजे तें प्रकृतिपुरुषांप्रमाणें निसर्गांत आपोआप सिद्ध झालें, असा येथें या पहिल्या पादाचा अभिप्राय आहे. ‘ मया ’ या पदाला धरून ‘ तस्य कर्तारमपिमाम् ’ हा तृतीय पाद आला आहे. यांत मी जरी कर्ता असलों तरी पुढें ‘ सृष्टं ’ हें पद घालून त्याचें निराकरण केलें आहे. ‘ सृष्टं ’ या पदाला धरून ‘ विध्यकर्तारमव्ययम् ’ हा चतुर्थ पाद आला आहे. मी जरी याचा कर्ता दिसलों तरी मी याचा अकर्ता आहें असें येथें मोठें मार्मिकपणानें सांगून हा चातुर्वर्ण्याचा सिद्धांत पूर्ण केला आहे. असें जें चातुर्वर्ण्य त्यांतील वर्णांना ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र न म्हणतां पांढरा, तांबडा, पिंवळा, काळा अशीं रंगांतील वर्णनामें द्या म्हणजे तीं सृष्टींतील चातुर्वर्ण्याशीं पूर्णपणें मिळून दिसतील. त्रिगुणां-पुढें हे चार वर्ण सांगितल्यानंतर मग सांख्यांनीं पुढें आकाश, वायु, अग्नि, पाणी आणि पृथ्वी ही पंचमहाभूतांची पांच संख्या सांगून सृष्टीची उत्क्रांति पुढें चालविली. पुढें नानात्वांत ही संख्या पंचवीस तत्त्वांपर्यंत सांख्यांनीं नेली आहे. सांख्यांना धरून गीतारहस्यांत लोकमान्य टिळकांनीं एक कोष्टक दिलें आहे. ते सांख्यशास्त्रांत फार खोल गेले नाहींत.

या कोष्टकांत प्रकृतिपुरुष हे डोक्यावर दर्शविले आहेत. प्रकृतीला अव्यक्त म्हटली आहे; पुरुषाला कांहींच म्हटलें नाहीं. प्रकृति जर अव्यक्त तर द्वंद्वाच्या नियमाप्रमाणेंच पुरुषाला व्यक्त म्हटलें पाहिजे. त्यांच्या हें लक्षांत आलें नाहीं. जिवंत असते तर विचारलें असतें. पुरुष नाना म्हणून प्रकृति एक ही सांख्यांची कल्पना आहे. प्रकृतिपुरुषद्वंद्वांत प्रकृति एक म्हणून पुरुष नाना केले. प्रकृति एक म्हणून ती अव्यक्त व पुरुष नाना म्हणून ते व्यक्त. व्यक्त नाना व अव्यक्त एक हें द्वंद्व आहे. सांख्य सर्वत्र जगतांत द्वंद्व पाहतात. हें सांख्यांचें द्वंद्वाचें तत्त्व सर्व जगतांत पसरलें आहे. गीता सांख्यांवर उभी राहते आणि मग आपलें स्वतःचें म्हणून सांख्यांच्या द्वंद्वापलीकडे निराळें ' निर्द्वंद्व ' सांगते.

येथें एक गोष्ट स्पष्ट करून सांगितली पाहिजे. षड्दर्शनांवर व गीतेवर गेलीं १५०० वर्षे द्वैताद्वैताचा पडदा पडला आहे. गीता शुद्ध राहिली नाहीं. तींत द्वैताद्वैत घुसडलें गेलें आहे. द्वैताद्वैत हे शब्दहि गीतेंत आलेले नाहींत. तींत सर्वत्र द्वंद्वनिर्द्वंद्वतत्त्वज्ञान ओतप्रोत भरलें आहे. 'मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः' याप्रकारें इंद्रियांचा त्यांच्या विषयाशीं स्पर्श झाला कीं, अन्तर् व बाहिर् अशीं दोन द्वंद्वें व्यक्तीच्या ठिकाणीं उत्पन्न होतात. यांतील अन्तर्द्वंद्व सुखदुःखाचें व बहिर्द्वंद्व शीतोष्णाचें असतें. अहमिदं या द्वंद्वाला अनुसरूनच हीं मात्रास्पर्शांतील द्वंद्वें आहेत. जगत् सुखदुःखादि द्वंद्वांवर चालतें. प्रकृति-पुरुष, शीतोष्ण, सुखदुःख हीं द्वंद्वें सर्व जगतांत भरून राहिलेलीं आहेत. जगतांत केवळ एक एक कोटी राहूं शकत नाहीं. बुद्धानें ' सर्वं दुःखं दुःखं ' अशी एकांगी कोटी घेतली. गीता सांख्यांचा द्वंद्वाचा सिद्धान्त घेऊन त्यांतील दोन्ही कोटी संभाळून त्यापलीकडे जाते. ' सुखदुःखे समे कृत्वा ——समत्वं योग उच्यते ' ही गीतेनें सांगितलेली सुखदुःख समसमान मानण्याची समत्वाची वृत्ति कशी आणावी ? तर ' दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ' दुःखाच्या ठिकाणीं मन अनुद्विग्न ठेवून व सुखाच्या ठिकाणीं विगतस्पृह

होऊन ती आणतां येते.: दोन्ही कोटी तराजूच्या दोन पारड्या सारख्या ठेवावयाच्या आणि त्यावरील कांट्याच्या बिंदूप्रमाणें तीं दोन्हीं सारखीं धारण करावयाचीं. हा कांट्यावरील बिंदु ' एकमद्वितीयम् ' असतो; पण तो पारड्यांच्या द्वंद्वाला सोडून नसतो. याला गीतेनें फार सुंदर शब्द 'निर्द्वंद्व' हा योजला आहे. हा शब्द वेदान्तदर्शनांत येत नाहीं. तो फक्त महाभारतांत व गीतेंत आला आहे. भगवंत अर्जुनाला ' निर्द्वंद्वोहि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते' याप्रकारें तूं निर्द्वंद्व हो असें सांगतात, 'अद्वैत हो' असें सांगत नाहींत. गीता ही निर्द्वंद्ववादी आहे. द्वंद्ववादी सांख्यांबद्दल तिला अत्यंत आदर आहे. सांख्यदर्शनकार जे कपिल त्यांबद्दल 'सिद्धानां कपिलो मुनिः ' सिद्धांमध्यें कपिलमुनि मी असें म्हणून गीतेनें अत्यंत आदर दर्शविला आहे. गीता प्रथम सांख्यांना नमस्कार करून मग त्यांच्या द्वंद्वापलीकडील निर्द्वंद्व स्वतः सांगते. सांख्यांप्रमाणें वैशेषिक व इतर दर्शनकार यांनीं जो जगताबद्दल विचार केला आहे, तो उद्यां सांगून ही लहानशी व्याख्यानमाला समाप्त करूं.

---

## व्याख्यान ६ वें

वैदिक धर्माला आश्रयभूत असे जे चार वेद व सहा शास्त्रें यांचा जो आपण उलगडा चालविला आहे तो जरी स्थूलमानानें असला तरी त्याला काळ किती लागतो हें आपल्या लक्षांत आलेंच असेल. षड्दर्शनांचा विषय काल सुरू झाला. प्रत्येकावर विस्तृत विवेचन करूं म्हटलें तर प्रत्येकाला दोन दोन दिवस दिल्याशिवाय तें पुरें होणार नाहीं. आतां सर्वांचा थोडक्यांत निर्देश केल्यावांचून इलाज नाहीं. सांख्य, वैशेषिक वगैरे सहा दर्शनांतील तत्त्वज्ञानाचें स्वरूप आपण पहात आहों. साहीं दर्शनांचीं जीं सूत्रें आपल्याला दिसतात तीं जरी अलीकडे झालेलीं

असलीं तरी त्यांतील तत्त्वज्ञान फार प्राचीन काळापासून चालत आलें आहे. सांख्यांचें द्वंद्व व त्रिगुण ऋग्वेदांतील नासदीय सूक्तांत आले आहेत. तोच प्रकार इतर दर्शनांबद्दल सांगतां येईल. सांख्यांचें तत्त्वज्ञान संख्येंत सांगितलेलें आहे. जगताचा उलगडा संख्येंत ( Quantity ) व गुणांत ( Quality ) केला कीं तो पूर्णत्वानें होतो. सांख्यांनीं संख्येवर भर देऊन आपलीं तत्त्वें सांगितलीं; वैशेषिकांनीं गुणांना धरून त्यांचा अधिक उलगडा केला. प्रकृति-पुरुष हें जें सांख्यद्वंद्व त्यांत पहिली संख्या सिद्ध होते. या द्वंद्वाला वेदांत आधार आहे. परमेश्वरापासून जें पहिलें द्वंद्व झालें तें ' ऋतंच सत्यंचाभीद्धात्तपसोऽध्यजायत ' या ऋचेंत सांगितलेलें ऋतसत्याचें होय. ऋत आणि सत्य हीं दोन्हीं एकदम निर्माण झालीं. ऋत हा शब्द ऋ=गमन करणें यापासून झाला; सत्य हा सत्=असणें यापासून झाला. ऋत—सत्य हे दोन्ही शब्द गति—स्थिति—वाचक आहेत. या दोहीं पलीकडे जें एकमेवाद्वितीयं त्याला नांव देतां येत नाहीं. यावयाचेंच असलें तर ऋतसत्यांपैकीं कोणतें तरी एक द्यावें लागेल. सत्य= असणें ( Being ), आणि ऋत = होणें ( Becoming ) हें द्वंद्व आहे. एकांत स्थिति आहे तर दुसऱ्यांत गति आहे. यांतच सांख्यांचें प्रकृति-पुरुषद्वंद्व येतें. हेंच जगताच्या मूलारंभींचें द्वंद्व होय.

हें द्वंद्व घेतल्याबरोबर नाना द्वंद्वें डोळ्यापुढें येतात. एक विरुद्ध नाना, आणि अव्यक्त विरुद्ध व्यक्त या द्वंद्वाच्याच जोड्या आहेत. जगत् द्वंद्वांत चालतें व द्वंद्व नानात्वांत चालतें. सॅम्युएल लँग याचा ' Law of Polarity ' वर ग्रंथ आहे. त्यांत तो म्हणतो, झोरोआस्ट्रियन धर्म हा सर्वस्वीं द्वंद्वावर उभारलेला आहे. सांख्यांनीं आपलें पुरुषप्रकृति द्वंद्व घेतलें. प्रकृति ही एकरूप, अव्यक्त; तर पुरुष नाना व व्यक्त. प्रकृति ही सगुण तर पुरुष नाना असून हि निर्गुण असें ते म्हणतात. येथें पुरुषांचें स्वरूप ते सांगत नाहींत, येथें त्यांना द्वंद्व सांगावयाचें आहे. गतींतहि आकर्षणोत्सारणाचें ( Attraction and Repulsion ) द्वंद्व आहे. पण तेंहि काय

आहे हें नीट सांगतां येत नाहीं. याप्रकारें सांख्यांनीं मूळ द्वंद्व घेऊन त्यांतील विरोधाकडे ( Contradictions ) लक्ष न देतां जगताचा विचार केला आहे. द्वंद्वाचा विचार नेहेमीं विरोधांत ( Paradox ) च चालतो. संपूर्ण भगवद्गीता अशा परस्परविरोधी भाषेंत लिहिलेली आहे. ती समजणें फार कठीण आहे. ती सर्वांना समजते व शहाण्यांतल्या शहाण्यांनाहि समजत नाहीं. ' कर्मण्यकर्मयः पश्येत्, ' ' योगांत सांख्य व सांख्यांत योग, ' ' तस्य कर्तारमपि मां विध्यकर्तारमव्ययम् ' हे सर्व परस्परविरोधी (Paradoxical) सिद्धान्त आहेत. जगत् असल्या विरोधात्मक गोष्टींतच नित्य चालतें. त्यासंबंधीं दुसरी भाषाच बोलतां येत नाहीं. जर्मन तत्त्ववेत्ता फ्रेड्रिक निट्झ्शे हा शेवटीं जसा वैदिक मार्गावर आला तसा ' Paradox ' बोलूं लागला. त्याच्या एका ग्रंथाचें नांव ' A book for all and none ' असें आहे. ही भाषा निट्झ्शेला करतां आली. हल्लीं कांहीं नाटककार ही त्याची भाषा उचलतात. त्याचें अनुकरण करणारे बर्नार्ड शॉ व आस्कर वाईल्ड हे होत; पण या नाटककारांनीं त्याचा 'Paradox' जाणला आहे कीं नाहीं कोण जाणें ! जगत् या 'Paradoxes' मध्यें म्हणजे द्वंद्वांत चालतें. त्यांतील दोन कोटींच्या संबंधाला शास्त्रांत अयुतसंबंध म्हणतात. प्रकृति–पुरुषांना एकमेकांवांचून स्थान नसतें. जगत् व्यक्तमध्यांत चालतें म्हणून त्याचेंच आपल्याला ज्ञान होतें. कारण ' अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ ' असें गीतेंत व्यक्तमध्याला धरून वर्णन आलें आहे. हें जें व्यक्तमध्याचें ज्ञान तें द्वंद्वांत चालतें. सांख्यांनीं जगत् नानांत सांगितलें आहे. त्यांनीं ही नानाची संख्या वाढवतांना प्रथम द्वंद्व घेऊन त्यापासून त्रिगुण सांगितले, त्रिगुणांपुढें चार वर्ण सांगितले, चार वर्णांनंतर पंचमहाभूतें सांगितलीं; अशी संख्या वाढवीत वाढवीत त्यांनीं ती पंचवीस तत्त्वांपर्यंत नेली. या पंचविसांत पंचमहाभूतें, पंचज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, पंचतन्मात्रा, मन, अहंकार, महान्=बुद्धि व प्रकृति-पुरुष द्वंद्व अशीं तत्त्वें घेऊन त्यांनीं

जगताचा संख्येंत उलगडा केला. यांत खोल जाऊन त्यांच्या गुणांचा विचार त्यांनीं केला नाहीं. हल्लीं जसें biologists, psychologists आपआपल्या विषयांत अगदीं टोंकाला जातात, तें त्यांचें कामच असतें, तसेच सांख्य आहेत. शेवटीं या सगळ्या शास्त्रांचा ज्ञानार्थ समन्वय करावा लागतो; एरवीं ज्ञान पूर्णतेला जात नाहीं.

सांख्यांच्या पुढचा भाग वैशेषिकांनीं उचलला. वैशेषिक म्हणजे पदार्थाचा विशेष किंवा गुण (quality) सांगणारे ते. ते प्रत्येक पदार्थाचा गुण सांगूं लागले. वैशेषिक नानापासून सुरवात करतात. ते सांख्यांच्या नानात्वावर उभें राहतात. ते नानात्व अनादि म्हणतात. नाना म्हणजे अनेक म्हटलें कीं, त्यांत वर्गवारी करावी लागते. असे वर्ग पाडून प्रत्येक वस्तूचे गुण दर्शविण्याकरितां त्यांनीं सहा पदार्थ कल्पिले. द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष आणि समवाय हे वैशेषिकांचे सहा पदार्थ होत. पद+अर्थ=पदार्थ. पद म्हणजे गति. तसाच अर्थ हा शब्दहि गतिवाचकच आहे. द्रव्य, गुण, कर्म हे तीन मुख्य पदार्थ; पुढचे तीन उपपदार्थ होत. यांत वैशेषिक प्रधान व गौण असे दोन भाग पाडतात. वैशेषिकांत सांख्यांची प्रक्रिया नाहीं. त्यांत सांख्यांचे प्रकृति-पुरुष नाहींत. ते त्यांना आतां काय करावयाचे ? कोयींतून अंकुर बाहेर आल्यावर कोय नाहींशी होते. आतां पुढें अंकुराचाच विचार करावयाचा. तसें आतां प्रकृति–पुरुष जाऊन तेथें प्रकृतीच्या जागीं द्रव्य, गुण, कर्म हे तीन पदार्थ आले. प्रकृति चल असून तीन गुणांनीं युक्त आहे. त्या तीन गुणांत प्रमाणसमता (balance) राहण्याकरितां तिला स्थिर अशा पुरुषकोटीचा आश्रय केल्यावांचून गत्यंतर नसतें. हे पुरुष अनेक आहेत व ते निर्गुण आहेत. येथें सांख्यांत polyandry म्हणजे एका स्त्रीशीं अनेक पुरुषांचा संयोग होतो. पण सांख्यांच्या द्वंद्वाच्या तत्त्वांप्रमाणें तो युक्तच आहे. आकर्षणोत्सारण कसें चालतें याबद्दल अर्वाचीन शास्त्राला कांहीं सांगतां येत नाहीं. मूळ पुरुष काय आहे हें वेदान्तशास्त्राला तरी कोठें सांगतां येतें ? याचप्रमाणें हे सांख्यांचे अनेक निर्गुण पुरुष आहेत.

वैशेषिकांनीं हें जें नानात्व घेतलें त्यांत त्यांनीं द्रव्य, गुण, कर्मादि सहा भाग केले. हे सर्व प्रकृतीच्या गुणकर्मांनीं युक्त आहेत. प्रकृति=प्र+कृति=प्रकृष्ट कृति, कर्माचा प्रकर्ष. प्रकृति, गुण, कर्म हे तीन शब्द भगवद्गीतेंत आले आहेत. सांख्यांनीं हे तिन्ही आपल्या एका प्रकृतींत दाखविले आहेत. प्रकृति, गुण, कर्म हे नाना पुरुषांशीं संयोग पावून त्यांच्या संबंधांत पुढें सामान्य, विशेष आणि समवाय हे तीन पदार्थ निर्माण होतात. हे साही पदार्थ भाववाचक आहेत. वैशेषिक हे प्रत्यक्षवादी ( positivists ) आहेत. जें प्रत्यक्ष दिसेल त्यावर त्यांचा भर आहे. अनुमानप्रमाण ते अगदीं जरूर पडेल तेव्हां घेतात. ते सहा भावपदार्थ घेतात व द्रव्यादि साहींचें रूप काय आहे तें सांगतात. त्यांनीं द्रव्य नऊ प्रकारचें, गुण चोवीस प्रकारचे, कर्म पांच प्रकारचें, सामान्य दोन प्रकारचें, विशेष अनंत प्रकारचा व समवाय एक प्रकारचा सांगितला आहे. नऊ प्रकारच्या द्रव्यांत त्यांनीं सांख्यांचीं पंचमहाभूतें घेतलीं. आपला मानवदेह हा पांचभौतिक आहे. सृष्टींतील सर्व घटक अंशरूपानें या मानवदेहांत वास करतात. त्यांना मन व आत्मा जोडून मानवशरीर सिद्ध झालें. पुनः जगत् गतिमान् आहे. गतींत दिक् आणि काल या दोन कोटी निर्माण होतात. वैशेषिकांना त्यांची जरूर म्हणून त्यांनीं हीं दोन्हीं तत्त्वें घेतलीं आहेत. या प्रकारें पंचमहाभूतें, दिक् व काल, मन आणि आत्मा हीं वैशेषिकांचीं नऊ प्रकारचीं द्रव्यें होत. पंचमहाभूतें जगतांत चालतात जगत् गतिमान् आहे. गति प्रकर्षाला गेली कीं, तींत उष्णता व तेज हीं दोन तत्त्वें निर्माण होतात. जें तेज समंतात् पसरतें तेंच आकाश होय. याप्रकारें गतीबरोबरच आकाश, दिक् व काल निर्माण होतात. या गतीच्या conditions अथवा तिचे results आहेत. जीवशास्त्रांत जो मूळ एकपिंडात्मक देह असतो त्याला ' आमीबा ' म्हणतात. हा अन्न खाऊन फुगतो व त्याचे फुटून दोन भाग होतात. यांत आई कोण व मुलगी कोण हें सांगतां येत नाहीं; कारण ते अगदीं सारखे असतात.

त्याप्रमाणें दिक्कालापासून गति निर्माण झाली, का गतींत दिक्काल निर्माण झाले हें बीजांकुरन्यायाप्रमाणें सांगतां येत नाहीं. दिक्काल नाहीं तर गतीहि नाहीं. मी उठून चालूं लागल्याबरोबर या स्थळापासून त्या स्थळीं जाईपर्यंत जी जागा आक्रमण्यांत आली ती 'दिक्' झाली व जाण्याला जो वेळ लागला तो 'काल' झाला.

जगतापासून तीन कोटी निर्माण होतात. त्या आकाशादि पंचमहाभूतें, दिक् व काल या होत. पंचमहाभूतांतील जें आकाश त्याला आपल्याकडे विभु म्हटलें आहे. तें ब्रह्माप्रमाणेंच अवर्णनीय आहे. त्याचे गुण वैशेषिक सांगत नाहींत. बाकीचीं चार परमाणुरूप आहेत असें ते म्हणतात. आकाश मात्र अभेद्य आहे. अभेद्य घेतल्यावांचून अर्वाचीन सायन्सलाहि गत्यंतर नाहीं. इलेक्ट्रॉन फोडून त्या पलीकडे कांहीं आहे कीं नाहीं हें पाहण्याचा सायन्सनें पुष्कळ प्रयत्न केला पण त्याचा उलगडा त्याला अद्याप झाला नाहीं. कोठेंतरी कांहीं आहे असें म्हटल्यावांचून शास्त्राची सुरुवातच होत नाहीं. अभेद्य अशा 'Atom' च्या व 'Electron' च्याहि पलीकडे म्हणजे अर्वाचीन भौतिक शास्त्राच्या पलीकडे गेलेला हा परमाणुवाद वैशेषिकांत दिसेल. ते वायूपासून पृथ्वीपर्यंत सर्व परमाणुरूप आहे असें मानतात. हल्लींचें ईथर तरी परमाणुरूप आहे कीं नाहीं तें शास्त्रज्ञांना सांगतां येत नाहीं. तें आकाशसदृश आहे आणि त्याची व्याख्या 'Pushes and Pulls are exerted through the Ether' (निष्क्रमणं प्रवेशनं यत्तदाकाशस्य लिंगम्) अशी त्यांनीं केली आहे. हल्लीं विद्युत्‌हि परमाणुरूप आहे म्हणतात; पण ते परमाणु पृथ्वीरूप आहेत का वायुरूप आहेत हें समजत नाहीं. प्राचीनांनीं विद्युत् न घेतां वायु, अग्नि वगैरे तत्त्वें घेतलीं. हीं वायवादि चार तत्त्वें भौतिक शास्त्राला पुरेशीं आहेत.

दिक्काल, आकाशादि पंचमहाभूतें वगैरेंना जोडून वैशेषिकांनीं आत्मा आणला. असा आत्मा सांख्यांत नाहीं, तर वैशेषिकांत प्रकृतिपुरुष नाहींत. सांख्यांवर वैशेषिक उभे असल्यानें व सांख्यांत पुरुष अनेक असल्यानें

वैशेषिकांत आत्मे अनेक म्हटले आहेत. त्या प्रत्येक आत्म्याबरोबर मन जाऊन त्याला सचेतन करतें. वैशेषिकांनीं मनालाहि परमाणुरूप कल्पिलें आहे. वैशेषिक हे भौतिकशास्त्री. ते आत्म्याच्या समवेत मन घेऊन त्या मनाचा आत्म्याशीं संयोग झाला कीं त्यांत संवेदन सुरू होतें असें म्हणतात. वेदान्ती आपल्या चष्म्यांतून आत्म्याकडे पाहतात. ज्या त्या शास्त्राकडे त्याच्या त्याच्या चष्म्यांतूनच पाहिलें पाहिजे. कवीची सहृदयता जर आपल्याला नसली तर त्याच्या काव्याचा आस्वाद आपल्यास घेतां येणार नाहीं. तें काव्य वाचूनहि फुकट होईल. एकदां एक कवि व मीमांसक मिळून चालले होते. मीमांसकानें कवीचें काव्य पाहिलें. मीमांसकच तो. त्यानें काव्याचा आस्वाद न घेतां त्यांत एक व्याकरणाची चूक दाखविली ? कवीनें त्याला 'अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख' म्हणून नमस्कार केला ! ! शास्त्रज्ञहि आपल्या शुद्ध शास्त्रीय चष्म्यांतून शास्त्राकडे पाहतो. त्याप्रमाणें वैशेषिकांची व सांख्यांची स्थिति आहे. या शुद्ध भौतिक शास्त्रज्ञांना वेदान्ती तुमच्या शास्त्रांत ईश्वराला कोठें स्थान आहे म्हणून विचारतात. पण असें विचारणें योग्य नाहीं, कारण तो त्यांचा विषयच नाहीं. आत्म्याचा मनाशीं संयोग होऊन त्यांत चैतन्य निर्माण होतें व त्यांतच त्याला सुखदुःखात्मक स्थिति येते असें वैशेषिक म्हणतात. वेदान्ती वैशेषिकाचा आत्मा जड आहे म्हणून टाकून देतो. पण अर्वाचीन भौतिक शास्त्राच्या दृष्टीनें वैशेषिकांकडे पहा म्हणजे तेच तुम्हांला अधिक बरोबर दिसतील. वैशेषिकांचे सिद्धान्त इतके अचूक आहेत कीं हल्लींच्या भौतिक शास्त्रज्ञांनीं त्यांच्यापुढें नमस्कारच घालावा. हल्लींच्या भौतिकशास्त्राला वैशेषिकांचे सिद्धान्त घेतल्यावांचून त्यांचें चालावयाचेंच नाहीं.

वैशेषिक म्हणतात आत्मा जड आहे व मन हें संवेदनात्मक आहे. त्या दोहोंच्या संयोगांत चैतन्य निर्माण होतें. ही गोष्ट त्यांच्या दृष्टीनें अगदीं बरोबर आहे. कांहीं न जाणतां नुसतें 'सर्वभूतीं आत्मा' म्हणून

चालत नाहीं. आत्म्याला मनाबरोबरच चेतना येते ही गोष्ट गर्भविज्ञान (Embryology) शास्त्राप्रमाणें बरोबर दिसते. मानवगर्भ एकाएकीं वाढत नाहीं; त्याला नऊ महिने व नऊ दिवस लागतात. त्याची रचना कशी बनत जाते हें शास्त्र सांगतें. अंडपिंड व रेतपिंड (ovum and sperm) या दोहोंपासून तो मूळांत बनतो. या दोहोंत आकर्षणोत्सारणरूप (anabolic and katabolic) शक्ति असतात. गर्भांतहि हीं दोन शक्तितत्त्वें येतात. हीं दोन अनुक्रमें पोषणात्मक व विच्छेदनात्मक असतात. मूळ जो दोहोंचा एक पिंड बनतो त्याचेच फुटून अनेक पिंड होत होत शेवटीं ते परार्धवारी बनतात. पहिल्या महिन्यांतच त्यांत मोठमोठ्या इंद्रियांची रचना होऊं लागते. त्यांत मनाचा संबंध नर्व्हस् सिस्टीमशीं येतो. ही संस्था मानवशरीरांत केव्हां निर्माण होते ? तर प्रथम स्त्रीपिंड व पुरुषपिंड या दोन पिंडांचें जुगट (Zygot) दोहोंच्या एकत्रीकरणांत बनतें. या गर्भीभूत पिंडाचेच फुटून परार्धवारी पिंड होतात. मग त्यांत इंद्रियरचना सुरू होते. त्यांत मूळ वृक्क निर्माण होतो. त्यांत दोन सिस्टिम्स् दिसूं लागतात. पैकीं एक प्रजननेंद्रियद्वारां व दुसरी मूत्रेंद्रियद्वारां चालते. समूत्रजननेंद्रियाला मूलवृक्क म्हणतात. त्यांत दोन नळ्या असतात. एकीला वोल्फीयन् डक्ट व दुसरीला मुल्लेरियन् डक्ट म्हणतात. मुल्लेरियन् डक्ट हा स्त्रीतत्त्व वाहून नेतो व दुसरा पुरुषतत्त्व वाहून नेतो. या दोन नळ्यांची रचना मानवदेहांत मज्जासंस्था निर्माण होण्याच्या पूर्वीं होते. मूत्राशय व मलाशय त्यानंतर निर्माण होतात. म्हणून या मलमूत्राशयाच्या सिस्टिमशीं मनाचा संबंध प्रथमपासून येतो. मानवाला मलमूत्राचें संवेदन ज्ञात होतें. पण स्त्रीला अंडपिंडवहनाचें संवेदन होत नाहीं. तसेंच पुरुषालाहि वृषणांतून रेत बाहेर पडण्याचें संवेदन होऊं शकत नाहीं.

वैशेषिकांनीं आत्म्याला जड म्हटलें व मनाला संवेदनयुक्त मानलें यांत चूक काय आहे ? मन व इतर चोवीस तत्त्वें घेऊन त्यांत वैशेषिकांनीं आपला आत्मा बसविला. ते भाववादी आहेत. प्रत्येक व्यक्तीला घेऊन ते तिला आपले सहा भावपदार्थ लावून पहातात. वैशेषिक हे

अर्वाचीन परमाणुवादाला फार पोषक आहेत. कणाद हें नांव काय दर्शविते ? ते कणाला 'पीलु' असें नांव देतात. कणांनींच हें सर्व जगत् बनतें असें ते म्हणतात. कण कसा बनला हें ते सांगत नाहींत. वैशेषिकदर्शनाला औलुक्यदर्शन असें नांव आहे. उलूक=घुबड, या गोत्रांत तो जन्मला कीं काय समजत नाहीं. वेदांत गोतम, वत्स वगैरे एतत्सदृश गोत्रें आहेत. घुबड हें आपल्यांत वाईट समजतात; ग्रीकांत तें उत्तम समजत. रात्रीं त्याला दिसतें. 'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ' या गीतावचनाप्रमाणें तें राहणारें आहे ? विद्यारण्यांनीं या दर्शनावर टीका केली आहे. तथापि वैशेषिक हे वेदान्त्यांचे शत्रु आहेत. वेदान्ती त्यांचें तत्त्व घेतांना त्यांचा नामनिर्देश करीत नाहींत पण त्यांवर टीका करतांना मात्र हटकून करतात. वेदान्त्यांनीं वैशेषिकांना बुडविलें. वैशेषिक हे कोणालाहि भिणारे नाहींत. एक काणाद मरतांनाहि ईश्वर मानीना; जगताचे बुडाशीं परमाणु आहेत, ईश्वर वगैरे कांहीं नाहीं, असें तो म्हणाला. वेदान्त्यांनीं मग त्यावर ' पीलवः पीलवः ' करीत तो मेला, अशा कोट्या केल्या आहेत. वैशेषिक हे नानात्ववादी म्हणून व्यक्तिवादी (individualists) आहेत. ' यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः' ज्यापासून अभ्युदय व निःश्रेयस यांची सिद्धि होते तो धर्म, अशी वैशेषिकांची धर्माची व्याख्या आहे. ती वेदान्त्यांनीं त्यांतील एक शब्द बदलून जशीच्या तशी घेतली आहे. ही व्याख्या शुद्ध व्यक्तिदर्शक आहे.

अति मोठीं दर्शनें जीं सांख्य व वैशेषिक त्यांनीं जगताचें पूर्ण विवरण केलें आहे. हें त्यांनीं द्रव्य, गुण, कर्मांत केलें. गुणी व गुण यांत जो अयुतसंबंध त्याला समवाय म्हणतात. यांत द्वंद्वांतून निर्द्वंद्वाकडे दृष्टि आहे. हें सर्व भाषेंत आणतांना निराळेंच शास्त्र लागतें तें व्याकरणशास्त्र होय. तें वैशेषिकाला आधार मानून बनलें आहे. वैशेषिक हें व्याकरणशास्त्राच्या पितृस्थानीं आहे. वैशेषिकांचीं द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष आणि समवाय अशीं सहा तत्त्वें. त्यांवरच व्याकरण-

कारांनीं आपल्या नाम-वचनादि आख्या लावून दिल्या. द्रव्यावर त्यांनीं नाम लावलें, गुणावर विशेषण लावलें, कर्मावर क्रियापद लावलें; पुढें सामान्यावर द्विवचन, विशेषावर बहुवचन आणि समवायावर एकवचन लावलें. व्याकरणांतील हे भेद त्यांनीं वैशेषिकांपासून घेतले. व्याकरणाचें शास्त्र सांगणारे मूळ वैशेषिकच होत. व्याकरणांत शब्दांचा विचार केला जातो. प्रत्येक शब्द नाम आहे, सर्वनाम आहे, विशेषण आहे का क्रियापद आहे हें बरोबर सांगण्याचें व्याकरणाचें काम. पण नाम म्हणजे कांहीं वाक्य नव्हे. शब्दांचें वाक्य बनल्याशिवाय त्यांचा उपयोग नाहीं. सारांश, वैशेषिकांनीं आपल्या शास्त्रांत ज्ञानाचा सर्व विचार व्यक्तिदृष्ट्या केला आहे.

अनेक शब्द मिळून जें वाक्य बनतें, अनेक पुरुषांच्या एकत्रीकरणांत जो विराट् पुरुष बनतो त्याचा विचार करणारें मीमांसाशास्त्र आतां पुढें आलें. मीमांसाशास्त्र हें केवळ यज्ञाचें शास्त्र नव्हे. त्यांत सिद्धांत सांगतांना यज्ञाचीं उदाहरणें घेतलीं आहेत. याला धरून जें शास्त्र झालें त्याला वाक्यार्थमीमांसा ( exegetics ) म्हणतात. शब्द ही व्याष्टि म्हटली तर अनेक शब्दांनीं मिळून होणारें जें वाक्य तीं समष्टि होय. व्यष्टीचा ( शब्दाचा ) विचार व्याकरणांत ( analytics ) केल्यानंतर पुढें समष्टीचा ( वाक्याचा ) विचार करावयाचा. समष्टीचा किंवा वाक्याचा विचार करतांना त्यांतील प्रत्येक शब्दांत अर्थ कोणता आहे, तो शब्द नाम आहे, का विशेषण आहे, का क्रियापद आहे, इत्यादिकांचा विचार मीमांसेंत येतो. अशा अनेक शब्दांनीं बनणाऱ्या वाक्याची सिद्धि झाल्यानंतर पुढें अनेक वाक्यांतील न्यायसंगति ( syllogism ) दाखवितांना त्यांत जें argument करावें लागतें, व त्याकरितां जें वादशास्त्र येतें त्यांत न्याय-शास्त्र निर्माण होतें. न्यायशास्त्र हें भावाभाववादी आहे. त्यांत ज्ञात व अज्ञात असे भेद नैय्यायिकांनीं केले आहेत. जें समजलें त्याला नांव देऊन भावांत ठेवावयाचें व जें समजलें नाहीं त्याला अभावांत टाकावयाचें.

ही अन्यन्यावृत्तविभागपद्धति ( Division by dichotomy ) होय. म्हणून न्यायाला अभाव पाहिजे. अज्ञात प्रदेश दिसला कीं त्यांत शिरावयाचें, तो आपल्या ज्ञानाच्या कक्षेंत आणावयाचा, आणि याप्रकारें अज्ञात प्रदेशाचा ठाव घेत घेत त्यांत अति खोल जावयाचें. नैय्यायिकांनीं वैशेषिकांचे सहा पदार्थ घेऊन त्याला आपला अभाव जोडून एकंदर सात पदार्थ कल्पिले आहेत. त्यांनीं आपल्या शास्त्राची वाढ करून प्रमाण-प्रमेयादि सोळा पदार्थ सांगितले आहेत. हेतु, हेत्वाभास वगैरे सर्व न्याय-शास्त्रांतच येतात. अनेक वाक्यांतून एक अर्थ कसा काढावा, सामान्यांतून विशेष कसें निवडावें, सर्वसामान्य गुणांतून विशेष गुण कसा सांगावा वगैरेबद्दल सर्व विचार न्यायशास्त्रांत येतो. म्हणून नैय्यायिकांना भावा-भाववादी व वैशेषिकांना शुद्ध भाववादी म्हणतात. मीमांसकहि भाववादी, पण ते दृष्टादृष्ट पाहणारे आहेत. ते दिसणारें तें दृष्ट कोटींत व न दिस-णारें तें अदृष्टांत घालतात. त्यांनीं आधिदैविकाचा विचार केला आहे. देव हा शब्द दिव्=चकाकणें (Shine) यापासून झाला आहे. आकाशापासून जें तेज उमटतें त्यांत देव सिद्ध होतो. असे देव अनेक आहेत. म्हणून वेदांत अनेक देव आहेत; कोणी सत्याचा देव, कोणी न्यायाचा देव, कोणी तेजाचा देव, कोणी प्रकाशाचा देव असे अनेक प्रकारें ते वर्णिले आहेत. गुण अनेक म्हणून देवहि अनेक आहेत अशा गुणांच्या प्राप्त्यर्थ मानव त्या देवांची प्रार्थना करतो. मीमांसक मानवाचा व त्याच्या समा-जाचा व्यवहार पहाणारे असल्याकारणानें त्या दोहोंना धरून त्यांनीं आपल्या शास्त्राची रचना केली आहे. ते शरीरयंत्राच्या रचनेचे ( Organization ) नियम सांगतात. अनेकांनीं एकत्र कसें व्हावें, त्यांचे संबंध कसे असावे, त्याचे नियम काय असावे याबद्दल त्यांनीं फार बारकाईनें विचार केला आहे.

हल्लीं आपण जें सरकार किंवा गव्हर्नमेंट म्हणतों त्याचें स्वरूप व रचना तरी काय आहे? तें ब्रह्माप्रमाणेंच निर्गुण आणि निराकार

आहे असें म्हणावें लागेल. त्याचा साक्षात्कार, त्याचे अधिकारी जे गव्हर्नर, कलेक्टर, मामलेदार वगैरे त्यांच्या द्वारांच यावयाचा. हे सर्व अधिकारी आपआपल्या ठिकाणीं आपल्याला सरकार म्हणतात. असें निर्गुण निराकार सरकार जर आकारांत व गुणांत आणलें तर त्यांत हजारों आकारांच्या व हजारों गुणांच्या व्यक्ति दिसतील. अर्थात् मानव हा 'एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः' या ऋचेंत वर्णन केल्याप्रमाणें अग्नि, यम, मातरिश्वादि सर्व देवांच्या पलीकडे असणारें जें एकतत्त्व त्याची कृपा मिळविण्याकरितां अनेक देवांना यज्ञविधीनें पूजा करून संतुष्ट करतो. आपण गव्हर्नमेंटकडे अर्ज करावयाचा तर कसा कराल ? My dear Government म्हणाल कीं काय ? राष्ट्राधिपति जो राजा किंवा त्याचा प्रतिनिधि जो व्हाइसरॉय त्यांच्याकडे तरी एकदम जाल कीं काय ? समजा, तुम्हांला जर वाटेंत मोटारचा धक्का लागला अगर कोणीं लुटलें तर काय एकदम व्हाइसरॉयला पत्र ल्याहाल ? त्याला तुम्ही कोण हें समजणार देखील नाहीं. तो तें पत्र फेंकून देईल व जरकरितां त्यानें मेहेरबानी केलीच तर योग्य अधिकाऱ्यांमार्फत अर्ज पाठवा (Come through proper channel) इतकें तो तुम्हांला कळवील. या गव्हर्नमेंटलाच निरनिराळ्या ठिकाणीं गव्हर्नर, कलेक्टर, मामलेदार, पोलीस वगैरे म्हणतात. आपण अर्ज करावयाचा तो जवळच्या पोलीसलाच केला पाहिजे. तसा मूळ देव एक असेल पण त्याच्या नानात्वानें मूर्ति अनेक होतात. हल्लींच्या शास्त्रांतहि हेंच तत्त्व येत आहे. डॉ. हेकेल्‌चा जो एकतत्त्ववाद (Monism) त्या एकतत्त्वाचें वर्णन 'One, Homogeneous, Continuous Substance' असें त्यानें केलें आहे. त्याला धरून त्यानें सर्वदेववाद (Pantheism) आपल्या तत्त्वज्ञानांत आणला आहे. आम्हीहि संध्येच्या वेळीं सर्व दिशांना देव आहेत असें समजून नमस्कार करतों. प्रल्हादाच्या बापानें त्याला तुझा देव कोठें आहे म्हणून जेव्हां विचारलें तेव्हां तो म्हणाला, माझा देव जळीं स्थळीं काष्ठीं

पाषाणीं सर्वत्र भरलेला आहे. मानव हा नीतिमान् प्राणी आहे (Man is a moral animal). नीतींत सदसत्, चांगलें—वाईट वगैरे येतें. म्हणून नीतीला धरून जेवढा अंश तेवढाच देव असें मानवानें 'यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छत्वं ममतेजोंशसंभवम् ॥ ' जेथें जेथें माझें विभूतिमत्व दिसेल तो तो देव या न्यायानें ठरविलें. याला धरूनच गीतेंत 'वृष्णीनां वासुदेवोऽस्मि, पांडवानां धनंजयः' वगैरे वचनें आलीं आहेत. अनेक गुणांना धरून अनेक तऱ्हेचे देव, सरकारी अधिकाऱ्याप्रमाणें त्यांत लहान मोठे असा प्रकार असावयाचाच. सर्वांना एकच गोष्ट चालावयाची नाहीं, जसें सर्वांना एकच वाहन नसतें. राजाला विमान, अगदीं खालच्याला बैलगाडीच असावयाची. आपआपल्या शक्तीप्रमाणें जो तो वाहनांतून जातो. 'आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् । सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति ॥' या न्यायानें निर्गुण, निराकार एकाला धरून सगुण, साकार अनेक देव असणें हें युक्तच आहे. सरकारची स्तुति करावयाची तर ती जशी त्याच्या अधिकाऱ्यांची करावी लागते, सरकारला संतुष्ट करावयाचें म्हणजे जसें गव्हर्नर-कलेक्टरांना संतुष्ट करावें लागतें, तशी मीमांसा मूळ तत्त्व जें अव्यक्त ब्रह्म त्याची प्राप्ति होण्यास त्याचे प्रतिनिधि जे व्यक्त देव त्यांची कृपा व्हावी म्हणून यज्ञद्वारां त्यांचें पूजन करावयास सांगते. या प्रमाणें व्याकरणशास्त्र (Analytics), न्याय किंवा तर्कशास्त्र (Dialectics), आणि मीमांसाशास्त्र (Exegetics) या तीहींच्या दृष्टीनें आतांपर्यंत विचार झाला. सांख्य-वैशेषिक दर्शनांचें विवेचन स्थूल मानानें पूर्वीं झालेंच आहे.

सांख्यांच्या ज्ञानमार्गाबरोबर योगाचाहि कर्ममार्ग पाहिला पाहिजे. योगांत जें कर्म येतें तें वैयष्टिक स्वरूपाचें असतें. मीमांसेंतील कर्म सामष्टिक स्वरूपाचें असतें. वैशेषिक आणि योग हीं वैयष्टिक स्वरूपाचीं दर्शनें आहेत तर न्याय आणि मीमांसा हीं सामष्टिक स्वरूपाचीं आहेत.

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे; व त्याचा समाज 'सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा' या न्यायानें सहयज्ञ म्हणजे यज्ञावर निर्माण झालेला आहे. अनेकांचें एकत्रीकरण कसें होतें याचा एकच नियम आहे तो यज्ञ होय. मीमांसाशास्त्र हें एका बाजूनें शब्दांचें वाक्य जुळवितें व दुसऱ्या बाजूनें अनेक व्यक्तींना एकत्रित करणारा जो यज्ञ त्याचें स्वरूप सांगतें. यज्ञाचा अर्थ येथें दान आहे. तैत्तिरीय आरण्यकांत 'दानेन द्विषन्तो मित्रा भवन्ति' किंवा 'यज्ञेन द्विषन्तो मित्रा भवन्ति' असें दानाचें वा दानरूप यज्ञाचें माहात्म्य सांगितलें आहे. दानाच्या किंवा दानरूप यज्ञाच्या योगानें द्विषन्त म्हणजे शत्रु जे असतात ते मित्र होतात. समाज हा व्यक्तिव्यक्तींतील मैत्रीवर बनतो असें आरिस्टॉटल या ग्रीक तत्त्ववेत्त्यानेंहि म्हटलें आहे. यज्ञीय दान म्हणजे आपल्या जवळची तत्काळ प्रिय वाटणारी वस्तु भविष्यकाळच्या अधिक प्रिय वस्तूच्या प्राप्तीकरितां दुसऱ्याला द्यावयाची हें होय. असें दान हें स्वतःला व दुसऱ्याला उपकारक होतें म्हणून यज्ञाचा अर्थ नुसता त्याग असा मीमांसकांनीं दिला नाहीं; त्यांनीं त्याचा अर्थ दान असा दिला आहे. बौद्धधर्म हा नुसत्या त्यागावर स्थापन झालेला आहे. त्याग व दान यांत महदंतर आहे. सर्व दान त्यागरूप असतें पण सर्व त्याग दानरूप नसतो. रस्त्यानें जातांना एखाद्या चोरानें आपल्या जवळची वस्तु हिसकावून घेतली तर त्या वस्तूचा आपल्या जवळून त्याग होईल पण तें दान होणार नाहीं. भविष्यकाळाच्या अधिक सुखाच्या प्रीत्यर्थ वर्तमानसुखाचा त्याग म्हणजे यज्ञीय दान होय. असें त्याग व दान यांत अंतर आहे. वेद मानवाला दानरूप यज्ञ सांगतात. यज्ञाच्या योगानें समाज बनतो. व्यक्तीच्या वरतीं समाज किंवा समष्टि व त्यावर परमेष्ठी असे तीन पर्याय आपल्या वैदिकतत्त्वज्ञानाला धरून निघाले आहेत.

अर्वाचीनांनीं जो उत्क्रांतीचा विचार चालविला आहे तो डार्विनपासून होय. डार्विनपूर्वीं तो युरोपांत नुकताच निघाला होता. व्हिको हा

इटालिअन् शास्त्रज्ञ उत्क्रांति चक्रनेमिक्रमानें चालली आहे असें म्हणतो. त्याच्या मतें ती एकाच वर्तुळांत फिरते. पुढें जर्मन पंडित गटे यानें विचार करून असें ठरविलें कीं उत्क्रांति ही एका वर्तुळांत फिरणारी म्हणजे Circular नाहीं तर Spiral म्हणजे भोंवऱ्यासारखी आहे. बर्गसाँ हा फ्रेंच तत्त्वज्ञ ती अनंतावधीपर्यंत चालणारी आहे असें म्हणतो. त्याचप्रमाणें गटेचेंहि मत आहे. हें उत्क्रांतीचें रूप अखंड कर्मांत राहतें. तें कर्म म्हणजे यज्ञ होय. ' यज्ञः कर्मसमुद्भवः ' यज्ञ हा कर्मसमुद्भव आहे असें गीता कंठरवानें सांगते. सर्व कर्म यज्ञरूप नसतें; कांहीं यज्ञरूप तर कांहीं अयज्ञरूप असतें. यज्ञरूप कर्म उत्क्रांतींत चाललेलें दिसतें. आकाशाचा यज्ञ व्हावा तेव्हां वायु निर्माण होतो, वायूचा यज्ञ व्हावा तेव्हां अग्नि, अग्नीचा यज्ञ व्हावा तेव्हां पाणी, पाण्याचा यज्ञ व्हावा तेव्हां पृथ्वी निर्माण होते. पृथ्वीवर ज्या वनस्पति निर्माण होतात त्या मागच्या पंचमहाभूतांना खाऊन जगतात. वनस्पति प्राण्यांचें अन्न होतात. प्राणी व वनस्पति हीं दोन्हीं मानवाचें अन्न होतात. मानवहि अन्नरूप आहे. तैत्तिरीय उपनिषदाच्या शेवटीं ' अहमन्नं, अहमन्नं, अहमन्नं, अहमन्नादः अहमन्नादः अहमन्नादः ' असें एक साम आहे. मी स्वतः अन्न आहे व अन्न खाणारा आहे असा त्याचा अर्थ आहे. सर्व सृष्टिच अन्नमय म्हणजे यज्ञमय आहे. मागच्याचा यज्ञ झाल्यावांचून पुढची पर निर्माण होत नाहीं. मनुष्याकरितां खालच्या सर्व जातींनीं यज्ञ केला. त्याच न्यायानें या मानवाचा यज्ञ झाल्यावांचून पुढचा देव होणार नाहीं. नेपोलियन, शिवाजी हे वीर अनेक मानवांचा यज्ञ करून देव बनले. नेपोलियनजवळ जें बादशाही सैन्य ( imperial army ) होतें त्यांत युरोपांतील सर्व जातींचे लोक होते. एकदां रशियावर स्वारी करीत असतां वाटेंत एका नदीला पूर आला होता. उतरून जावयास वाटहि नव्हती. तरी पण तसेंच पलीकडे चला म्हणून ऑर्डर देऊन त्यानें पलटणी मागून पलटणी पुरांत घातल्या. तेव्हां एकानें हें काय चाललें आहे म्हणून विचारलें. त्यानें तात्काळ उत्तर

दिलें कीं हें सैन्य म्हणजे ‘ food for cannon ’ तोफेचें अन्न आहे. परमेश्वर हा व्यक्तींच्या द्वारांच देवावतार घेऊन अशीं अचाट कृत्यें घडवून आणतो. देव मानवाला अन्न करतात, मानव प्राण्यांना अन्न करतात, प्राणी वनस्पतींना अन्न करतात. खालच्यांनीं वरच्याकरितां मेलें पाहिजे. आईबापांचा मृत्यु होतो तेव्हां प्रजा जन्माला येते. प्र+जा=प्रकर्षानें जन्म. प्रजा=propagation upwards पाहिजे. ती forwards किंवा downwards नको. आम्हांला देवतुल्य प्रजा पाहिजे. यज्ञाशिवाय प्रजाप्राप्ति नाहीं. माझें सौंदर्य कमी होतें, तारुण्य जातें, म्हणून प्रजा नको असें हल्लीं युरोपांत बायका बोलत आहेत. त्याचे परिणामहि राष्ट्रावर घडत आहेत. आपल्या सुखाचा प्रजेकरितां यज्ञ करण्याची तयारी नाहीं आणि ‘ सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा ’ हा तर प्रजेचा नियम आहे. प्रजेंतच समाजाचा प्रकर्ष आहे. हें समाजाचें व यज्ञाचें तत्त्व मीमांसेंत अति उत्तम रीतीनें दाखविलें आहे. मीमांसेनें समाजाचें कर्म ‘ यज्ञ ’ सांगितलें तर योगसूत्रांतील विवरणांत सूत्रकार व्यक्तीचें कर्म ‘ योग ’ सांगतात. पतंजली हा जसा महाभाष्यकार तसाच योगसूत्रकारहि आहे. दोन्ही ग्रंथांचा उपक्रम अनुक्रमें ‘ अथ शब्दानुशासनम् ’ व ‘ अथ योगानुशासनम् ’ असा आहे. महाभाष्य म्हणजे व्याकरणमहाभाष्य होय. त्याचा कर्ता पतंजली हा महावैय्याकरण होता. तसाच तो योगदर्शनकारहि आहे. या योगरूपी वैयक्तिक कर्मांत व्यक्तीला समाजाची जरूर नाहीं. योगांत व्यक्तीला आसन, प्राणायाम, ध्यान, धारणा, ........करीत करीत शेवटीं समाधींत जावयाचें असतें. या समाधींत व्यक्तीला ‘अहं ब्रह्मास्मि’ कळेल पण ‘ तत्त्वमसि ’ कळणार नाहीं. येथें बाहेरच्या जगताचें ज्ञान नाहीं. तें ज्ञान वैशेषिकांजवळ आहे. जो खरा ज्ञानी व योगी असतो तो ज्ञान आंत आणि बाहेर सारखेंच पाहतो. त्यालाच ‘ सर्वं खल्विदं ब्रह्म ’ हें तत्त्व कळतें. त्यालाच ‘ इज्याचारदमाहिंसादानस्वाध्याय-

कर्मणां । अयं तु परमोधर्मो यद्योगेनात्मदर्शनम् ॥ ' वगैरे सांगतां येतें. असा महान् ज्ञानी योगीश्वर याज्ञवल्क्य होय. त्यानें ब्रह्मचर्य आचरून ज्ञान संपादन केलें आणि विवाह करून गृहस्थाश्रम प्रतिपाळला. त्यानें बाहेरच्या जगताचा पूर्ण साक्षात्कार घेतला व शेवटीं संन्यास घेऊन तो मोक्षार्थ अरण्यांत निघून गेला. बाहेरच्या जगताच्या साक्षात्कारावांचून आत्मसुखहि पूर्ण होत नाहीं.

सांख्यांनीं अंतिम सुख मानलें आहे; वैशेषिकांनीं निःश्रेयसाधिगम, न्यायानें अपवर्ग, मीमांसकांनीं स्वर्ग व योग्यांनीं कैवल्य अशीं अंतिमें मानलीं आहेत. मोक्ष ही भाषा यांत कोठें येत नाहीं. ती व्यक्तीच्या कर्ममार्गावर, व्यष्टि-समष्टींच्या संबंधांत निर्माण होते. त्याकरितां सहाव्वें वेदान्तदर्शन आहे. त्यांत मोक्षफल सांगितलें आहे. पण मोक्षफल जगद्वृक्षावर उत्पन्न होणारें आहे. आधीं बंधनें असतील तर पुढें मोक्ष. त्यांतच शुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभावब्रह्म सिद्ध होतें. मोक्ष हा शब्द अकरणरूपानें (negative) तेथें आला आहे. असें ब्रह्मफल जें शेवटीं प्राप्त होतें त्यांतहि आत्मबीज धारण केलेलें असतेंच. आत्म्याकडून ब्रह्माकडे जातांना मध्यंतरीं जगद्वृक्ष वाढावा लागतो. त्याचा उलगडा करण्याकरितां जगच्छास्त्रें लागतात. सर्व दर्शनशास्त्रांतील ज्ञानाचा शेवट मानवाचें अंतिमसाध्य जें ब्रह्म त्या ब्रह्मप्राप्तींत आहे.

व्याख्यानमाला समाप्त झाली. सर्व दर्शनांचें रूप आपण पाहिलें. आतां व्यावहारिक शब्दांत थोडक्यांत सर्वांचे आभार मानावयाचे. आपल्या युनिव्हर्सिटीनें आमच्या सारख्या आहिताग्नीला बोलावून षड्दर्शनांच्या आधारें वैदिक धर्मावर बोलण्याचा जो योग आणला त्याबद्दल आम्ही तिचे अत्यंत आभारी आहों. ज्या महाभागाच्या स्मरणार्थ त्यांच्या सुपुत्रानें या विद्यापीठांत पारितोषिक ठेवलें व ज्यामुळें आम्हांला येथें येण्याचा योग आला त्यांचेहि मनःपूर्वक आभार मानतों. विद्यापीठाच्या उपकुलपतींनीं आपलीं कामें बाजूला ठेवून रोज येथें येण्याचे व अध्यक्षस्थान मंडित करण्याचे

जे श्रम घेतले त्याबद्दल त्यांचेहि आम्ही अगत्यपूर्वक आभार मानतों. तसेंच ज्यांनीं आम्हांस आमच्या घरून येथें येण्याच्या सुखसोई करून दिल्या व ज्यांच्या कडून आम्हांला हें पारितोषिक मिळावयाचें आहे असे जे विद्यापीठाचे खजिनदार त्यांचेहि आम्ही अत्यंत आभारी आहों. शेवटीं येथील जागेची ज्यांनीं व्यवस्था ठेविली त्यांचे व आपण श्रोत्यांनीं रोज वेळेवर येथें येऊन जे श्रवणाचे श्रम घेतलेत व ज्यामुळें आम्हांला रोज बोलतांना प्रोत्साहन मिळत गेलें त्या आपणां सर्व विद्वान् श्रोत्यांचे आम्ही फार फार आभारी आहों. शेवटीं ज्या जगन्नियंत्यानें हा उत्कृष्ट प्रसंग शेवटपर्यंत यशस्वी रीतीनें पार पाडला त्याला कृतांजलिपूर्वक प्रणाम करून अखेरच्या भरतवाक्यानंतर आम्ही तूर्त जवनिकेंत अन्तर्धान पावतों.

सहनाववतु । सहनौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै । तेजस्वीनावधीतमस्तु । माविद्विषावहै । ॐ शांतिः शांतिः शांतिः

---

षड्दर्शनांचा वैदिक धर्माशीं, तत्त्वज्ञानाशीं व व्यावहारिक शास्त्रांशीं काय संबंध आहे तो दाखविणारा वंशपट सोबत जोडला आहे. हा वंशपट आहिताग्नि राजवाडे यांच्या लवकरच प्रसिद्ध होणाऱ्या नासदीयसूक्तभाष्याच्या उत्तरार्धातून त्यांच्या परवानगीनें उद्धृत करून घेतला आहे.

१ सांख्यदर्शन

- कर्ममार्ग
  - २ योगदर्शन—समाधिविद्या
  - ४ मीमांसादर्शन—यज्ञविद्या
- ज्ञानमार्ग
  - ३ वैशेषिकदर्शन—पदार्थविद्या
  - ५ न्यायदर्शन—प्रमाणविद्या
  - ६ वेदान्तदर्शन—ब्रह्मविद्या

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पुरुषार्थ— | (१) धर्म, | (२) अर्थ, | (३) काम, | (४) मोक्ष, |
| शास्त्रें— | मानवधर्मशास्त्र | कौटिलीय अर्थशास्त्र | वात्स्यायनीय कामशास्त्र | बादरायणीय ब्रह्मसूत्रें |
| प्रणेते— | मनु | चाणक्य | मल्लनाग | वेदव्यास |
| | Religion and Ethics | Science of Governance or Politics | Science of conjugal happiness or Errotics | Metaphysics |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| विद्या— | (१) वार्ता | (२) दंडनीति | (३) त्रयी | (४) आन्वीक्षिकी |
| विषय— | धनशास्त्र | शासनशास्त्र | वेदविद्या | |
| | Economics | Law and Jurisprudence | Theology and Religion | Inductive and deductive Logic |